
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ... पो. वा
दा. क्र. 2085



BVBK-0402085

# पन्हाळगड

वाचनालय बा.वा.
२०८५
१८/८/८८

क. मं. मं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
क्र. २०८५ दिनांक १८/८/८८
विषय. बा.वा. क्र. . . .

BVBK-0402085

# पन्हाळगड

बाबासाहेब पुरंदरे

प्रकाशक :

पुरंदरे प्रकाशन
१२२८, सदाशिव पेठ,
पुणे ३०

सर्व अधिकार स्वाधीन

पुनर्मुद्रण : १९६३
पुनर्मुद्रण : १९६९
पुनर्मुद्रण : १९७२
पुनर्मुद्रण : १९८६

मूल्य पंधरा रुपये

मुद्रक :
नगिन बी. शहा,
संगम प्रेस प्रा. लि.,
१७ ब, कोथरूड,
पुणे ४११ ०२९.

# आवाहन :

स्वराज्याचा घास घेण्यासाठी शत्रू जर चाल करून आला तर स्वराज्यासाठी आपले प्राणही अर्पण करावयाचे असतात. अगदी हसत हसत ! मातृभूमीच्या भक्तीने ! हिंदवी स्वराज्यासाठी शिवाजीमहाराजांच्या हजारो जिवलगांनी स्वतःचे प्राण असेच अर्पण केले. त्या हजारो जिवलगांची नावेसुद्धा इतिहासाला माहीत नाहीत. फक्त पराक्रम माहीत आहेत. परिणाम माहीत आहे. नावे माहीत आहेत फार थोड्यांची. बाजीप्रभू देशपांडे हा त्यांतील एक अर्घ्य ! महाराज सिद्दी जौहरच्या प्रचंड व अभेद्य वेढ्यातून विशाळगडाकडे निसटले. जणू स्वराज्याचा हा बालकृष्णच कंसाच्या कैदेतून निसटला. परंतु शत्रूला चाहूल लागली. पाठलाग सुरू झाला. शत्रूने जवळजवळ गाठलेच ! पावनखिंडीच्या अरुंद घशात हिंदवी स्वराज्य घटसर्पाच्या तडाख्यात सापडण्याची वेळ आली. त्या भयंकर प्रसंगी ह्या थोर जिवलगाने स्वतःचा प्राण देऊन हिंदवी स्वराज्याच्या पंचप्राणांचे रक्षण केले.

मित्रांनो, स्वराज्यासाठी कसे जगायचे असते आणि कसे मरायचे असते हे ही पावनखिंड आपल्याला सांगते आहे. इतिहास इथे निर्माण झाला, तो रक्ताच्या आणि घामाच्या थेंबांतून !

आजही आपल्या हिंदवी स्वराज्यासाठी आपल्याला अशाच खिंडी खिंडी आणि दऱ्याकपाऱ्या झुंजवायच्या आहेत. बाजीप्रभूंच्या स्वराज्यनिष्ठेचा वारसाहक्क आपल्याकडे आहे. तो कसा बजवावयाचा असतो, ते समजण्यासाठी ही पावनखिंडीची सनद आपल्याला मी वाचून दाखवीत आहे. मित्रांनो, चित्त एकाग्र करून ऐका.

— बाबासाहेब पुरंदरे

BVBK-0402085

# पन्हाळगड

बाबासाहेब पुरंदरे

# अनुक्रम :

जावळीच्या अरण्यात

विजापुरात

सिद्दी जौहर

पन्हाळगड

शाहिस्ताखान

आईसाहेब

नेताजी पालकर

सिद्दी जौहरच्या शामियान्यात

पावनखिंड

क्र. २०१४५ ७४१४२
वि. ०११.८१

# जावळीच्या अरण्यात

वैरी चिंतीत नाही ते मन चिंतीत असते.

आणि मनातही येणार नाही ते आज वैरी चिंतीत होता.

अफझलखानाच्या भेटीस जाण्यासाठी महाराज तयार झाले. प्रतापगडावर चिंताक्रांत गांभीर्य दाट पसरले होते. काळजातून उठणारा हुंदका प्रत्येकजण मोठ्या कष्टाने रोधीत होता, मग आईसाहेबांची स्थिती तर कोणत्या शब्दांत सांगावी ? त्या माउलीला सहा पुत्र झाले. बाकीचे सर्व गेले. एवढा एकच उरला. ह्या गेलेल्या मुलांतील संभाजीराजांना तर ह्याच अफझलखानाने आठ वर्षांपूर्वी कनकगिरीच्या लढाईत घात करून मारले. आईसाहेबांची एक सून ह्यानेच विधवा केली आणि आता उरलेल्या ह्या एकुलत्या एक लेकराची कायमची ताटातूट करण्याकरिता हा निर्दय कुऱ्हाड पाजळीत पाजळीत आला होता. आयुष्याच्या सायंकाळी एकुलता एक लेक आपल्या डोळ्यांदेखत स्वतःच्या पावलांनी कायमचा जाणार—?–निघालाच—! काय यातना होत असतील त्या मातृहृदयाला ! त्या पाहावत नव्हत्या. ते हुंदके ऐकवत नव्हते.

महाराजांनी जगदंबेस दंडवत घातले.

" जगदंब जगदंब ! उदयोस्तु अंबे उदयोस्तु ! "

उपाध्यायाने महाराजांच्या हातावर तीर्थ घातले. तीर्थ घेतले आणि महाराज आईसाहेबांकडे वळले.

" आईऽ ! " महाराजांनी घट्ट पाय धरले. मस्तक टेकविले.

" बाऽळ ! " आईसाहेबांनी महाराजांस पोटाशी घट्ट धरले.

काळजात भाला घुसला, तर तोही सहन करता येईल—पण पोटच्या पोराने अखेरची मारलेली ' आई ' ही हाक सहन करता येणार नाही.

" बाळ, यशवंत हो. लौकर ये. मी तुझ्याकडे डोळे लावून वाट पाहात आहे. शिवबा, नाही रे सहन होत ! " टप् टप् अश्रू महाराजांच्या मस्तकावर पडले.

पंताजी गोपिनाथांबरोबर महाराज निघाले. गडावरचे लोक गहिंवरून मुजरे करीत होते.

" येतो आम्ही ! सांभाळा ! ".

महाराजांनी गडाच्या दरवाजाचा उंबरा ओलांडला.

अफझलखान भेटीच्या शामियान्यात केव्हाच येऊन बसला होता. त्याने महाराजांस गड उतरताना पाहिले. आसुरी आनंदाची मुस्कराहट त्याच्या चेहऱ्यावर खेळू लागली. महाराजांच्या गर्दनीचा कब्जा घेण्यासाठी खान बेइस्तकलाल झाला होता.

जावळीच्या जंगलात खानाची पंधरा हजार फौज चैनीत दंग होती. अगदी गाफील. शिवाजीला हमखास खानसाहेब तशरूफ करणार. जिंदा वा जखमी ! अन् मग विजापुरास जायचे ते वाजतगाजत शाही दिमाखात अशीच प्रत्येक हशमाची खात्री होती. ढोलकी बडवीत गाण्या-नाचण्यात, हसण्या–खिदळण्यात अन् खाण्या–पिण्यात सारे रंगराव रंगून गेले होते.

पण ऐन गर्द जंगलाच्या मध्यावर असलेली ही अफाट फौज कोंडली गेली होती. महाराजांच्या चलाख मावळ्यांनी पहाटेच्या काळोखात त्या निबिड अरण्याच्या सर्व बारीकसारीक वाटाही झाडांच्या मोठ्या फांद्या तोडून बंद करून टाकल्या होत्या. शिवाय मोरोपंत पिंगळे, कान्होजी जेधे, येसाजी कंक, बाबाजी भोसले, शामराजपंत पद्मनाभी, बांदल, हैबतराव शिलीमकर, झुंजारराव देशमुख, तान्हाजी, नेताजी पालकर वगैरे मंडळी सूडाच्या भयंकर निश्चयाने संतापून आपआपल्या मावळी टोळ्यांसह गर्द झाडीत, करवंदीच्या जाळ्यांत, झाडाझाडांच्या डोल्यांत, खाचखळग्यांत नागासारखी अंग चोरून लपून बसली होती. अगदी गुपचूप. ह्याची चाहूल त्याला नाही. ह्या सर्वांचे महाराजांवर विलक्षण प्रेम. तलवारी परजून अन् कान–डोळे टवकारून ते बसले होते.

खानाच्या फौजेला पत्ताही नव्हता.

—महाराज भेटीच्या शामियान्यापाशी येऊन पोहोचले. खान हजर झाला. हवा असलेला हरामखोर सांपडला अखेर ! खानाला स्वर्ग फक्त दोनच बोटे उरला !

खानाच्या फौजेत अन् भेटीच्या शामियान्यात जवळजवळ एक कोसाचे अंतर होते. खानाच्या फौजेत गझल-कवाल्यांच्या ताना भिरभिरत होत्या. दडलेल्या मराठ्यांची पापणीही लवत नव्हती. दात मात्र त्वेषाने करकरत होते.

—खानाने आलिंगनपूर्वक भेट घेण्याकरिता आपले ते कराल पोलादी हात पसरले !

—आईसाहेबांनी गडावर जगदंबेपुढे अंग टाकून पदर पसरला, "आई ऽ ! "

—शामियान्याची कनात फडफडली ! आतून एकदम भयंकर, प्राणांतिक किंकाळी फुटली, "ऑऽऽऽऽऽऽऽऽऽऽ ! दगाऽऽ ! मुझे बचाव......बचाऽव ! दगाऽऽऽ ! "

बाहेर एकदम धावत येऊन पंताजी गोपिनाथांनी शिंगाड्याला टाळी वाजवून म्हटले, " अरे फुंक फुंक ! "

शिंगाचा आवाज झणाणून उठला.

गडावरच्या मावळ्याने तोफेला बत्ती दिली. धडाड् धड् ड् ड् ड् ड् ड् ! तोफेने अस्मानभेदी किंकाळी फोडली. दरी-खोरी घुमली.

खानाच्या फौजेला वाटले, भेटीनंतर ही मुबारकबादीची तोफ उडाली. तेही आनंदाने ओरडले, ढोलकी झोडली. रुमाल उडविले. इतक्यात दात करकरीत आठही दिशांनी संतापलेले चित्ते ताड् ताड् झेपा टाकीत खानाच्या फौजेवर तुटून पडले. तोफेचा आवाज कानी पडतोय् न पडतोय् तोच मारेजण चवताळून धावले आणि खानाच्या फौजेची बेहाय कत्तल सुरू झाली. अस्मान टरारा फाडणारा भयंकर आक्रोश सुरू झाला. कान्होजी, तान्हाजी, येसाजी, मोरोपंत भयंकरच अक्राळविक्राळ दिसत होते. साऱ्याच मराठ्यांनी सपासप मुंडकी उडविण्याचा धडाका लावला. प्रचंड रणकुंड पेटले. खानाची फौज खांडोळी होऊन मरत होती. आरडाओरडा तर बेसुमार. झाडावरची पांखरे घाबरून पार उडून गेली. रक्ताचे पाट घळघळू लागले. मराठ्यांना दया-माया उरली नव्हती. भेटीत काय झाले, याचा त्यांना पत्ता नव्हता, त्यामुळे तर ते जास्तच चेवले होते. महाराष्ट्राची कडकडीत बाराही दैवते त्यांच्या जणू एकदम अंगात संचारली होती. गडावरून अविरत तोफा धडाडत

होत्या. यमसभेत चित्रगुप्तही बावचळून गेला असावा. त्याच्या जल-कुंडांतल्या हजारो घटका 'घुङ्ङ्ङ् घुङ्ईऽऽ' असा ध्वनी करीत बुडत असाव्या.

पूर्वी अर्जुनाने खांडववन जाळले, तेव्हा जो भयंकर कल्लोळ उडाला, त्या नंतर अरण्यात उडालेला हा पहिलाच हाहा:कार !

हत्ती-घोडे वगैरे जनावरे बुझून बिथरली होती. खानाच्या फौजेत धीर उरलाच नव्हता. प्राण वाचवायची जो तो धडपड करीत होता.

तेवढ्यात खानाला महाराजांनी ठार केल्याची खबर आली अन् वणव्यासारखी पसरली अन् मग मावळ्यांना अन् कान्होजी, तान्हाजी वगैरे मंडळींना काय अवसान चढले म्हणून सांगावे ! नेताजी पालकराने तर तुफान उसळवून दिले.

मराठ्यांचा त्वेष अन् आवेश इतका भयंकर होता की, हत्यारे टाकायलाही त्यांनी दुश्मनांस सवड दिली नाही. पण नंतर अगदी थोड्या वेळात जे जे हत्यारे टाकून अन् भुईला नाक लावून शरण आले, त्यांना मराठ्यांनी जीवदान दिले. नि:शस्त्र शरणागतांत जे मातबर होते, त्यांना मराठ्यांनी कैद करण्यास सुरुवात केली.

त्या भयंकर दंगलीतून कित्येकजण दाट जंगलात घुसत होते. प्रतापराव मोरे आपल्याबरोबर तीन-चार माणसे घेऊन झाडीत घुसला. त्याला त्या निबिड अरण्याची पुरेपूर माहिती होती. त्याच्याच सल्यावरून खानाने ही आपली फौज त्या घनदाट वनात आणली होती. तोच एकमेव वाटाड्या होता. तोच पळाला. चंद्रराव मोऱ्याचा तो भाऊबंद होता. चंद्रराव मोऱ्याच्या वधाचा सूड घेण्यासाठी तो अफझलखानास सामील होऊन, विजापुरापासून सारखा सल्लामसलत देत होता.

फाजलखान, मुसेखान. हसनखान, याकूतखान, अंकुशखान वगैरे बडे सरदारही भांबावले, भेदरले. फाजलखानाच्या पायावर जखमा झाल्या. सर्वांसच फटकारे बसले होते. फाजलखान म्हणजे अफझलखानाचा थोरला मुलगा. हे सारे लढत होते, पण मराठी भुतावळीपुढे टिकाव लागेना. धीर सुटला. एवढ्यात फाजलखानाचे दोघेही धाकटे भाऊ म्हणजे अफझलखानाचे धाकटे मुलगे मराठ्यांनी पकडले. फाजलच्या नजरेदेखत. मराठ्यांनी शेमल्यांनी त्यांचे हात पाठीमागे बांधले. मदतीकरता ते ओरडत होते, पण कोण जाणार काळाच्या दाढेत !

फाजलखान, मुसेखान वगैरे रडकुंडीला आले. मरण नाहीतर शरण याशिवाय मार्गच उरला नाही. सूर्य मावळला. अंधार पडत चालला, मराठ्यांची कत्तलबाजी चालूच होती. फाजलखान वगैरे खानांनी एकदम जिवाचा निर्धार करून दाट झाडीकडे धूम ठोकली अन् ते झाडीत घुसले. वाट नव्हतीच. अंग घुसेल तिकडे पळत सुटले. मुख्य कत्तलखान्यातून तर निसटले. त्यांचे तकदीर केवळ शिकंदर. मोठ्या मुश्किलीने वचावले आणि मग भयभीत नजरेने दाही दिशांस टकाटका पाहात त्या दाट झाडीतून फांद्या, पारंब्या, बुंधे ओलांडीत, एकमेकांना घाई करीत, पळत सुटले. पळता येतच नव्हते. जीव मुठीत धरला होता. कोणत्या झाडाआडून सपकन् वार पडेल याचा नेम नव्हता, कोणत्या वृक्षावरून अंगावर धडाधड उड्या पडतील याचा अंदाज नव्हता, कुठे जात आहोत हे त्यांचे त्यांनाही समजत नव्हते. हे एवढे मिजासी शेर इतके घाबरले होते की, जरा कुठे पाचोळा वाजला की, " खु ऽ खु खुदा ऽऽ। " म्हणून एकदम एकमेकांना मिठ्या मारीत होते अन् कोणी नाही असे दिसल्यावर " कु--कुच नही ! भागो भागो जल्दी ! " मग पुन्हा भागाकार सुरू करीत होते !

दाट झाडीमुळे या सरदारांची फारच दैना उडत होती. काट्या-फाट्यांनी अंगावरचे सर्व कपडे ओरबाडून फाटले होते, जखमांतून रक्त गळत होते. ठेचकाळात, धडपडत चालावे लागत होते. त्यामुळे ढुंगणाची अन् गुडघ्यांची साले सोलून निघत होती, शरिरात त्राण उरले नव्हते. घसे कोरडे पडले होते. दिशा समजत नव्हत्या. हळूहळू उजेड नाहीसा होत होता. सर्वजण दुःखाने व यातनांनी होरपळत होते. फाजलखानाच्या दुःखाला तर सीमा नव्हती. बिचाऱ्याचा बाप गेला. सारी दौलत गेली. फौज बुडाली. सख्खे भाऊ कैद झाले आणि आता या यातना.

दचकून एकदम फाजलखान थबकला. बाकीचेही थांबले. ते जास्तच घाबरले. " क--क--क्या ? "

" वो वो ऽऽ ! " फाजलखानाने तलवारीने लांब झाडीकडे खूण केली. लांबवर झाडीत चार-पाच मराठे दिसले ! हरे राम ! --चुकले ! --या अल्ला ! आता कुठे पळायचे ? इथेही मराठे आहेतच ! जिभा टाळ्याला चिकटल्या. चेहरे रडवे झाले. डोळे ताणताणून सारे त्या मराठ्यांच्या अस्पष्ट टोळक्याकडे पाहात होते. रोखून पाहाता पाहाता

फाजलखान एकदम वारे संचारल्यासारखा उसळून म्हणाला, " वो देखो! वो देखो! साला पाजी-बदमाष बेवकूफ-हरामखोर- ! " आणि तसाच लंगडत लंगडत तो त्या मराठयांच्या टोळक्याकडे धावत सुटला. नवलच! एवढे अवसान कुठून आले एकदम ? बाकीच्यांना उमजेना.

" चलो ! जल्दी करो ! "–अन् मग बाकीचीही खानं फाजलच्या मागोमाग पळत निघाली.

ते मराठयांचे टोळके स्पष्ट दिसू लागले. दिसले. त्यात प्रतापराव मोरे होता. साऱ्याच खानांना आता अवसान चढले. ह्या प्रतापरावामुळेच ह्या गहन अरण्यात आपण येऊन पडलो. ह्यानेच अफझलखानाला बदसल्ला दिला. हाच पाजी. हाच हरामखोर. कापा याला!

" ठैरो ऽ ! तुम ठैरो वहाँ ऽ ऽ ! " फाजल ओरडला. घाबरलेला प्रतापराव जास्तच घाबरला. तो लटलटत थांबला. सर्वांनी त्याला गाठले. मुसेखान मात्र सर्वांस शांत करण्याचा प्रयत्न करीत होता.

" इसको कत्लही कर डालना चाहिये ! " चिडून फाझल म्हणाला अन् त्याने तरवार उगारलीही, पण मुसेखानाने त्याला आवरले.

" ठैरो ठैरो ! इसे न मारो ! मेरी सुनो ! " मुसेखान म्हणाला.

" इसे क्यँव जिंदा छोडे ? इसने ही जालसाजीसे मेरे वालीद-साहबको इस घने जंगलमें आनेकी सलाह दी और ला फसाया ! इसीके सबब हमारी बर्बादी हुई ! इसीने ही मराठोंकी भडकी हुई आगमें हमारी कुर्बानी दी ! इसकू कत्ल ही कर डालना चाहिये ! "

प्रतापराव काकुळतीने मुजरे करीत गयावया करीत होता.

" ये सब् सच् है ! इसीने ही गलती की ! लेकीन अगर तुमने इसीको ही मार डाला तो हमें इस जंगलसे खैरीयतके साथ वाईतक कौन ले जायेगा ? वरना हमे इसी जंगलमे मरना होगा ! " मुसेखान म्हणाला.

" व्हाेय व्हाेय. मी दावतो वाट. तुम्ही माझे मायबाप ! मी तरी काय करू ? नशीब उपडं झालं. आता येळ नका गमाऊ न्हाई तर गलीम वाईत जाऊन पवचंल अन् मग-" प्रतापराव लाचारीतही युक्तीचे बोलत होता.

" हाँ हाँ यार-सच है ! " सर्वांनाच पटले. याला मारून चांगलाच आत्मघात करीत होतो, हे फाजललाही पटले.

मुसेखान हलक्या व गोड शब्दांत प्रतापरावास म्हणाला, " इस घने जंगलसे अब तुमही जल्द अज् जल्द बाहर वाईतक ले चलो ! "

" हाँ यार, माफ करो ! हम बडा ही गुनाह कर रहे थे ! तुम तो हमारे भाई हो ! हम तुम्हे कभी न भुलेंगे ! जल्दी करो ! " फाजल ओशाळून म्हणाला.

आणि मग प्रतापरावाच्या मागोमाग ही मंडळी निघाली. शिवाजीची फौज वाईत पोहोचायच्या आत वाईत आपण जाऊन पोहोचले पाहिजे. नाहीतर बेअब्रू. वाईतही आपल्या राहत्या वाड्यात अफझलखानाने खूप खजाना, बरेच हत्ती, घोडे-आणि विशेष म्हणजे आपला जनाना ठेवला होता ! जनाना जर शिवाजीच्या हाती पडला तर —

" जल्दी, जल्दी चलो ! " फाजलने घाई चालविली.

वेळूच्या बेटांतून, करंवदीच्या जाळ्यांतून, बोरीसांवरीच्या फांद्या-फांद्यांतून ही मंडळी चालली होती—येथील झाड न् झाड महाराजांशी निष्ठावंत होते. ह्या मंडळीस सहजासहजी चालता येत नव्हते. अंधार वाढत होता. खाली वेलींच्या वेटोळ्यांत पाय अडकून ते पडत होते. काटेरी फांद्यांनी तर प्रत्येकाला ओरबाडून, ओरबाडून रक्तबंबाळ केले. अंगावरील कपड्यांच्या चिंध्या-लोंब्रू लागल्या.

अंधार फारच दाटला. पुढे येणाऱ्या आडव्या फांद्या दिसेनाशा झाल्या.

थडाथड त्या फांद्यांच्या थपडा बसत होत्या. जीव हैराण झाला. आणि अजून वाई खूपच दूर होती. अजून पाच कोस जंगल तुडवायचे होते ! अल्लाचे नाव घेत अन् शिवाजीला शिव्या देत, आदळत, आपटत ते प्रतापरावाच्या मागोमाग चालले होते. प्रतापरावही त्यांस घाई करीत होता. पहाटेच्या आत वाईतून पसार झाले पाहिजे, नाहीतर मराठे फाडून काढतील ही भीती होती.

जंगली रातकिड्यांनी कर्कश सूर धरला होता. किर्रर्र र्र र्र र्र र्र ! डोळ्यांपुढे काजवे चमकत होते. पायांचे तुकडे पडायची वेळ आली. प्रत्येक अडथळ्यासरशी ते झाड अन् झुडूप त्यांना जाब विचारीत होते, " काय, याल पुन्हा आमच्या वाटेत ? हे स्वराज्य आहे ! " अन् मग घाल एक पायात चाट, हाण एक थप्पड अन दे एक गचांडी ! अशा यातना सहन करीत ते अरण्य आक्रमीत होते.

" आता थोडे राहिले ! " प्रतापराव धीर देत होता. पोरांची जावळे करताना न्हावी त्यांची डोसकी आपल्या गुडघ्यावर धरून ताशीत असतो अन् पोरे केकाटत असतात अन् न्हावी म्हणतो, " आता थोडं राहिलं ! "–अगदी अस्सेच चालले होते. जावळीच्या जंगलांत चांगलेच जावळ होत होते ह्या मंडळींचे.

आणि असे भयंकर हाल सोशीत सोशीत, ऐन मध्यरात्री ही मंडळी पसरणीचा डोंगर उतरू लागली. काळाकुट्ट अंधार. खडी उतरण. बिकट वाट. शत्रूची चाहूल भेडसावीत होतीच. भयाने डोळे मिटून घ्यावेसे–पण डोळे मिटले काय आणि उघडे ठेवले काय, सारखेच होते. अंधारात काही दिसतच नव्हते !

हा डोंगर उतरताना तर त्यांचे कोण हाल ! गड गड गड धुडुप् ! " हाय अल्ला ! " " मैं मर गया रे ! ऽ " " हाय रे मेरी माँ ! " " आतां थोडं राहिलं ! " कण्हणं न् कुथणं !

आणि अखेर एकदाचे ते उघडया व सपाट मुलुखात आले. इतके बिचारे श्रमांनी, भुकेने, तहानेने व जखमांच्या वेदनांनी कासावीस झाले होते की, केवळ जीव शिल्लक राहिला होता. पाय इतके बधिर झाले होते की, ठेच कोणत्या पायाला लागली व जखम कोणत्या पायावर आहे, हेही समजेनासे झाले होते. एकदम मरू तर बरे, असे त्यांना वाटत होते, पण मरवत नव्हते म्हणून तर ह्या साऱ्या यातना.

झोकांडया खात खात, पण शक्य तेवढया जलदीने ही सर्व मंडळी वाईत आली. वाईचे रहिवासी महाराजांना औक्ष चिंतीत अंधारात जीव धरून बसले होते. प्रतापगडाखाली काय झाले हे अद्याप वाईत काहीच समजलेले नव्हते. खानाच्या वाडयात अगदी प्रसन्न शांतता होती. बिचारा जनाना साखरझोपेत होता. पहारेकऱ्यांची गस्त चालू होती.

हे सारे घायाळ, रक्ताळलेले, अर्धमेले जीव झोकांडया खात वाडयावर आले. पहाऱ्यावरच्या लोकांनी पाहिले.

वाडयात एकदम गडबड उडाली. खान मेला हे समजताच जनान्यात आकांत उडाला, पण रडायला सवड नव्हती. फाजलखानाने ताबडतोब तेथल्या फौजेला पळण्याची तयारी तांतडीने करण्याचा हुकूम केला. सबंध खजिना बरोबर घेणे अशक्य होते. नेता येण्याइतका खजिना

घेतला. हत्ती, पागा सर्व घेणे अशक्यच. कुऱ्हाडच कोसळली होती आणि पुढचा घाव चुकवायचा होता. प्रतापरावाची घाई कूच करण्याची चालू होती.

फाजलने तातडतोब हुकूम दिला. जनाना घोड्यावर घालून सारे दौडत सुटले. वाईच्या बाहेर त्यांचे घोडे पडतात न पडतात तोच पसरणीच्या डोंगरावर हजारो मशाली दिसल्या. मराठ्यांची फौज प्रतापगडाहून वाईकडे येत होती. फाजलने ती पाहिली.

" दौडो दौडो ! दुश्मन आ रहा है ! "

पळत सुटले. जीव अन् अब्रू—जी थोडी उरली होती ती वाचविण्या करिता.

ह्या सगळ्या गडबडीने वाई खडबडून उठली. पसरणीचा घाट उतरून हजारो मशाली खाली येत होत्या.

मशालवाले स्वार जवळ आले. काय प्रकार आहे हे वाईकरांस समजेना. खाड् खाड् टापा वाजवीत मशालवाले वाईत शिरले. मराठे ! प्रत्यक्ष नेताजी पालकर आघाडीस होता.

खान मेला ! खान मेल्याची खबर त्या अंधाऱ्या रात्री वाईत पसरली अन् एकदम आनंद पसरला. घराघरात दिवे लागले. लोक उठून बाहेर आले. कृष्णाने नरकासूर मारला. तसाच महाराजांनी खान मारला. दिवाळी आली ! आनंद मावेना.

नेताजीने एकदम वाड्याला गराडा घातला. सारा खजाना, हत्ती, पागा व इतर प्रचंड मालमत्ता नेताजीस सापडली—एवढ्यात फाजलखान वगैरे पसार झाल्याचे समजताच नेताजीने एकदम घोड्यावर उडी टाकली. त्याची फौजही निघाली. पाठलाग सुरू झाला

फाजलखान खूप खूपच दूर गेला होता. जिवाच्या आशेने तो बेहाय दौडत होता. काय वाटेल ते झाले तरी चालेल, दौडता दौडता छाती फुटून मरण आलेले परवडेल, पण मराठ्यांच्या कचाट्यात सापडणं नको, म्हणून तो सारी ताकद एकवटून दौडत होता. सारा जनाना अन् फौजही दौडत होती. बिचारे. काय ही दैना !

नेताजी आनंदाने पाठलागावर दौडत होता. फाजलच्या फौजेचा काहीही सुगावा लागत नव्हता. खूप वेगाने दौड मारली, तरीही माग

लागेना. अखेर नेताजीस वाटले आपणच रस्ता चुकलो.–नाही तर एव्हाना सापडावयास हवे होते. तो थांबला.

"फिरा माघारी!" नेताजीने हुकूम दिला. साऱ्या मशाली माघारी फिरल्या.

फाजलखानाचे किस्मत तालेवार म्हणूनच तो बचावला. जर नेताजीने नेट धरून आणखी चार कोस धांव घेतली असती, तर धडगत नव्हती. अंधारात मफासला समजेना. नेताजी वाईकडे पुन्हा दौडत निघाला.

जावळीच्या अरण्यात मराठ्यानी विजापुरी फौजेची पार दाणादाण उडविली. रात्र झाली, तरीही मराठ्यांचा त्या जंगलातील धिंगाणा संपला नव्हता. मशाली पेटवून ते लपलेल्या दुश्मनांना ढोसढोसून बाहेर काढीत होते. आरडाओरडा अन् धांवपळ करीत, ही वेताळ फौज तांडव करीत होती. लुटीचे प्रचंड ढीग लावीत होती. विथरून सैरावैरा धांवत असलेल्या हत्तींना घोड्यांना व उंटांना पकडण्याकरिता ती आटयापाट्या खेळत होती. रात्रभर हा कल्लोळ चालू होता. महाराजांनी दुपारी जगदंबेची महापूजा केली होती. नेताजी, कान्होजी, मोरोपंत वगैरेंनी नंतर शतचंडी होम केला होता आणि आता रात्री हे गोंधळी मशाली नाचवीत गोंधळ घालीत होते.

लुटीची दौलत पेटारे भरभरून प्रतापगडाकडे रवाना होत होती. प्रतापगडावर रात्रभर नौबत झडत होती. झांजा झणझणत होत्या. मराठ्यांच्या सलतनतीची अस्मानी फत्ते झाली होती. आईसाहेब संतुष्ट झाल्या होत्या. जगदंबेवर दुधाच्या धारा झरझरत होत्या. महाराजांच्या डोक्यांत पुढच्या राजकारणाचे फासे पडत होते. सोंगट्या मागे-पुढे सरकत होत्या.

मध्यरात्री फाजलखानाच्या तारांबळीने वाई दचकून उठली, पण जेव्हा खान मेल्याची खबर गावभर पसरली, तेव्हा आनंदीआनंद उसळला. नेताजीची फौज वाईत शिरल्याबर तर, नवी भरती आनंदाला आली. नेताजी फाजलच्या पाठलागावर गेला, त्या वेळी मध्यरात्र उलटून गेली होती. चार घटका गेल्या. उषःकाल झाला. पूर्वा तांबडा लाल शालू नेसून हसत हसत सह्याद्रीच्या पायऱ्या चढू लागली. तिच्या विशाल भालप्रदेशावर शुक्र चांदणीची बिंदी चमचम करीत होती. वाईत घरघरांपुढे सडे

पडले होते. रांगोळ्या रंगल्या होत्या. गोपद्मे उमटली होती. वृन्दावनांतल्या तुळशी डोलत होत्या. पक्ष्यांनाही आनंद झाला होता. कृष्णाबाईच्या तीरावरील वृक्षराजी त्यांच्या किलबिलीने गजबजली होती. वारा मंद अन् प्रसन्न वाहात होता. कृष्णेच्या घाटावर स्नानसंध्येकरिता गर्दी उडाली होती. ग्रहण सुटले. आता स्नान ! लंगोटी पोरे दणादण उड्या फेकून डुबत होती. आजपर्यंत घरांच्या चार भिंतीत भीतीने दडून बसलेल्या युवती, घागरी कमरेवर घेऊन ओचे सावरीत अन् आपसात हसत–बोलत घाटाच्या पायऱ्या उतरत होत्या. त्या गोड गोड बोलत होत्या. खुदकन् हसत होत्या. त्यांच्या हातातली कांकणे किणकिणत होती. पायांतली जोडवी पायऱ्यांवर खट् खटक् खटक् असा आवाज करीत होती. वेणीत सोन्याच्या मुदी गुंफून खोपा घातलेल्या प्रसन्न प्रौढा खांद्यावर धुण्याचे पिळे टाकून आपल्या घागरी जलप्रवाहात बुडवीत होत्या. घुड् घुड् घुड् घुड्. पोट भरले. पोट भरले. त्या घागरीही म्हणत होत्या. जो तो मुखी शिवस्तोत्र गात होता.

प्रभा उजळली. किरणांचे झोत क्षितिजावर चढले. उषा लाजत लाजत किरणांआड दडली आणि आपल्या तेजाचा सुवर्णध्वज फडकवीत तो प्रतापवंत सूर्यनारायण हसत हसत वर आला.

आणि कोणाला कल्पनाही नव्हती. वाईच्या पश्चिमेकडून घोड्यांच्या टापांचा फार मोठा खडखडाट ऐकू येऊ लागला. शिंगांचे आवाज उठले, धूसर धुरळा आकाशात चढला. सारी वाई हातची कामे टाकून धावली. आनंदात आनंद मिसळला ! महाराज आले ! महाराज ! पाच हजार स्वारांची हुजरात पाठीशी घेऊन आले ! लोक आसुसल्या डोळ्यांनी तिकडे पहात राहिले. राजा आला. देव आला. वाईच्या बुरुजबंद पश्चिम वेशीतून सात-आठ घोडेस्वार छाती काढून, मोठ्या दिमाखात दौडत दौडत आंत प्रवेशले. त्यांच्या मुखावर आनंद अन् उत्साह ओसंडत होता. त्यांच्या मागोमाग चार-पाच शिंगाडे शिंग फुंकीत फुंकीत प्रवेशले. त्यांच्या मागून भगवा झेंडा घेतलेला स्वार दौडत आला. झेंडा वाऱ्यावर फडफडत होता. शिंगांच्या ललकाऱ्यांनी वाई भारावली अन् झेंड्याच्या मागोमागच महाराज वेशीतून आत प्रवेशले. पांढराशुभ्र घोडा रुबाबात धावत होता. महाराजांच्या जिरेटोपाचा तुरा नाचत होता. विशाल

छातीवरचा आडवा भरजरी शेला झगमगत होता. गळ्यातला मोत्यांचा कंठा सळसळत होता. कमानदार भिवयांखाली ते पाणीदार डोळे चमकत होते आणि त्या गव्हाळ मुखकांतीवर संयमित स्मित विलसत होते. महाराजांच्या मागोमाग पाच हजार अवखळ स्वार टापा टाकीत होते.

सगळी वाई महाराजांस सामोरी आली. ब्राह्मणांनी हर्षाने हात उभारले. महाराजांनी लगाम खेचला. चटकन् त्यांनी घोड्यावरून उडी टाकली. पायातले चढाव उतरून आणि हात जोडून महाराज त्या ब्रह्मवृंदापुढे चार पावले गेले.

आनंदित झालेल्या त्या ब्राह्मणांनी दोन्ही हात उंचावून महाराजांस आशीर्वाद दिले. मायबहिणींनी न बोलता महाराजांवर लक्ष शुभेच्छांची उधळण केली. थकल्याभागलेल्या वृद्ध आयांनी कानशिलावर दृष्टीची बोटे मोडली. त्यांच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावर आनंदाचे अन् कौतुकाचे हास्य पसरले होते. दाट दाट दुधावरची सायच जशी!

एवढ्यात फाजलखानाच्या पाठलागावर गेलेला नेताजी फौजेसह माघारी वाईत दाखल झाला. आनंदाची आणखी एक सागरलाट नाचत आली. हर हर महादेवाच्या गर्जनेने आकाश भरून गेले.

घोड्यावरून उडी टाकून नेताजी, महाराजांस मुजरा घालीत पुढे झाला. त्याचे मराठी लष्करही मुजरे घालीत आले.

काल खानाच्या वधानंतर नेताजीने अचाट पराक्रम करून विजापुरी फौजेची दाणादाण उडविली होती. महाराजांस हे कळले होते.

"शाब्बास सरनौबत! शाब्बास तुमची अन् तुमच्या बहाद्दरांची!" महाराजांनी शाबासकी देऊन नेताजीच्या अन् त्याच्या शूर सैनिकांच्या फुरफुरत्या उत्साहाच्या मशालीवर जणू तेलाचा शिपकावा दिला. त्या मशाली उत्साहाने अधिकच चेतल्या.

महाराज प्रतापगडाहून निघाले ते डोक्यात खूप खूप नवे डाव योजूनच. पराभवाने दाणादाण झालेल्या, सैरावैरा पळत सुटलेल्या, घाबरलेल्या शत्रूवर इतक्या त्वरेने, इतकी जोराची चाल करायची की, आपला विक्राळ आवेश पाहूनच शत्रू भरगळला पाहिजे. सिंहाने झाडाखाली त्वेषाने आरोळी मारताच झाडावरची माकडे कशी पटापट आपोआप कोलमडून पडतात—बस्स् तेच करायचे. शत्रूला अंग साव-

रायलाही सवड द्यायची नाही. एकदम चढाई ! एकदम लढाई ! आता घटकेचीच काय, क्षणाचीही अवास्तव विश्रांती घ्यायची नाही. अदिलशाहीला काल भगदाड पडले आहे, यातच साधून घ्यायचे असे महाराजांनी ठरविले.

महाराजांनी नंतर नेताजी पालकर, बाघोजी तुपे, गोदाजी जगताप, महाडीक वगैरे मंडळींशी एकांतात खलबत केले. आपला डाव त्यांना समजाविला. ते सारे गडी तर बेहद्द खूष झाले. न कळत मांडीवर थाप पडली.

महाराजांनी स्वतः सातारा प्रांतात घुसून थेट कोल्हापूर गाठायचे ठरविले. आता कोणात ताकद नाही आडवा हात घालून रोखायची. आलाच कोणी, तर चुराडाच उडेल. सारा मुलुख स्वराज्यात दाखल करायचा अन् नेताजी पालकरने जे उठायचे ते थेट विजापूरपर्यंत लुटालूट करीत सारा शाही मुलुख तख्ततारा़ज करून टाकायचा. ठरले !

तावडतोब सारे उठले. इशाऱ्याचे शिंग फुंकले. कूचाची नौबत झडली. नेताजीची अन् महाराजांची फौज घोड्यावर चढली. महाराजांनी वाईच्या बंदोबस्ताकरिता थोडी फौज ठेवली. एका तुकडीला वाईपासून पाच कोसावर असलेले चंदनगड व वंदनगड हे जुळे किल्ले काबीज करण्याचा हुकूम दिला.

नेताजीने व त्याच्या फौजेने महाराजांस मुजरे केले.

" जय भवानी ! " महाराजांनी समशेर उंचावून निरोप दिला.

हर हर महादेवाचा प्रचंड पडसाद देऊन, नेताजीच्या फौजेने टाच मारली. महाराजाच्या समशेरीचे टोक विजापुराकडे टवकारलेले होते. चदन-वदनकडेही स्वार दौडले. महाराज लगेच स्वतःही निघाले. फौज इशारतीची वाटच पाहत होती. घोडे फुरफुरत जमीन टापांनी उकरीत होते.

" हर हर हर हर ! "

" महा ऽ ऽ दे ऽ व ! " सूर्याच्या तळपत्या तेजात भाले झलले गेले. महाराजांचा घोडा ताड् ताड् झेपा टाकीत चौखूर निघाला. त्यांच्या मागोमाग शिवगंगा !

प्रतापगडाहून निघण्यापूर्वीच महाराजांनी दोरोजी नावाच्या आपल्या मराठा सरदारास कोकणातील अदिलशाही मुलुखावर चालून

जाऊन, तुफान तांडव करण्याचा हुकूम केला होता. तोही तसाच अदिलशाही कोकणात घुसला. त्याचे तर जमिनीवरील घोडदौडीने समाधान होईना. त्याने समुद्रावरही पालाण घातले. सारी कोकणची शाही ठाणी थरकापू लागली. त्यातच त्याने राजापूरच्या वखारवाल्या इंग्रज टोपीकरांचे मालाने गच्च भरलेले जहाज पकडले. तो हजारो रुपयांचा माल जप्त केला. एका इंग्रज दलालाला आणि गीफर्ड नावाच्या इंग्रज अधिकाऱ्याला दोरोजीने गिरफदार केले.

इंग्रजांच्या राजापूरच्या हेन्री रीव्हिंग्टन नावाच्या वखारीच्या अधिकाऱ्यास हे समजल्यावर तर त्याला चक्करच आली. जहाजासकट हजारो रुपयांचा माल गडप झाला. शिवाय लोक कैदेत पडले, हे पाहिल्यावर काय करावे हे त्याला सुचेना, पण त्याने अत्यंत नम्रपणे एक पत्र महाराजांस लिहून, आपल्या दोन इंग्रज गृहस्थांस महाराजांकडे रवाना करण्याचे ठरविले.

महाराज, नेताजी आणि दोरोजी हे तिघेही तीन वाटांनी अदिलशाहीत घुसले. दशदर दुष्मनाची दाली तोडण्याकरिता मुस्तकीम चढाई ! पाहूच कोण करतो त्याची हिफाजत ! आता ही चढाई रोखायची ताकद कोणातही नव्हती.

## विजापुरात

बडचा बेगमने दोन्ही हातांनी कान घट्ट दाबून दुःखाने किंकाळी फोडली. तिला ती खबर ऐकवेचना. तिने धाडकन् पलंगावर अंग टाकले. ती ओक्साबोक्शी रडू लागली. कपाळावर थडाथड मारून घेऊ लागली.

" या अल्ला ! या खुदा ! सुलतान पीर पैगंबर परवरदिगार ! रेहमाननुर्रहीम ! ये तुमने क्या किया ? मेरा लाल मारा गया ! अब्

मैं क्या करूं ? तुम्हारी नाराजगीहीसे अदिलशाही सल्तनत आज खाकमे मिल गई ! अब ये हरामखोर सीवाजी दारूस्सल्तनत बीजापुरपरभी चढ आयेगा ! या खुदा ! "

ती आक्रोश करू लागली. तिच्या दुःखाला हद्द राहिली नाही. तिच्या सहेल्या तिला सावरण्याचा यत्न करू लागल्या.

खुद्द बादशाह अली अदिलशाहाच्या डोक्यावर पेश्मानीचे अस्मान फाटले. शिवाजीचे मुंडके भर दरबारात पाहायला मिळेल, हे त्याचे स्वप्न होते, पण झाले साफ उलट ! अफझलखानाचे मुंडकेदेखील परत आले नाही. येवढा तोलदार सरदार हकनाक बुडाला. लाखो रुपयांची दौलत बरबाद झाली. अदिलशाही शुजअत नामोहरम झाली. एका डोंगरी उंदराने ढाण्या वाघ मारला ! हाय रे हाय !

एकदम साऱ्या शहरात खळबळ गोंधळ अन् रडारड सुरू झाली, दुःखात शहर बुडाले !

वजीरे आझम इख्लासखान याने शाही नगारखान्यास हुकूम फर्मावला, " बंद करो ! "

नौबत बंद झाली. नौबतवाले नौबत पालथी घालून अन् माना खाली घालून उभे राहिले.

बेगमने अन्नपाणी वर्ज केले. बादशहाने दरबार बंद केला. तख्ता-वर चादर पांघरली. केवळ शाही हवेल्यांतच नव्हे तर सबंध शहरभर सुनकी हवा पसरली. घरोघर विब्या अन् बेगमा रडत होत्या. महा-राजाच्या नावाने शिव्यांची बरसात बरसत होती.

फाजलखान, मुसेखान, अंकुशखान वगैरे मंडळीही जनान्यासह विजापूराशी येऊन पोहोचली. सर्वजण गलितगात्र झाले होते. हालांनी हैराण झाले होते.

शहरात दुःखाचा नवा उमाळा आला. फाजलखान सर्वांसह शह-रात प्रवेशला. सर्वांच्या माना खाली वाकल्या होत्या. घोड्यांच्या टापांशिवाय दुसरा आवाज उमटत नव्हता. रस्त्यावरचे लोकही दुःखी मुद्रेने पाहात होते. माड्यांच्या दाराखिडक्यात पडद्याआडून स्त्रिया हुंदके देत होत्या. घोडे मंद चालले होते. फाजलखानास सर्वांत जास्त दुःख होत होते. अपमान, बेअब्रू, हाल अन् नुकसानी ! त्याची मान वर

होईना. पायाला जखमा झाल्या होत्या. त्यावर बांधलेल्या चिध्या लोंबत होत्या. अनेकांच्या कपड्यांची फाटून लक्तरे झाली होती. चेहरे भकास झाले होते. अदिलशाहीच्या अलीशान इमारतीची स्मशानयात्रा संपवूनच जणू ते परत आले होते.

दुसऱ्या दिवशी मोठ्या दुःखाने फाजलखान बादशहास भेटावयास गेला. त्याने आपले हात रुमालात झाकले होते. सदरेवर रुस्तुमेजमान्, मलिक इतबार, सादातखान वगैरे सरदार होते. बोलायला कुणाशीच शब्द नव्हते. फाजलने उदास मुद्रा न उचलता कुर्निसात केला. अर्जबेगीने मातमपुर्सीची चादर तबकात घालून बादशहापुढे धरली. बादशहाने तबकास स्पर्श केला. मातमपुर्सीची म्हणजे दुखवट्याची निदर्शक अशी चादर. अर्जबेगीने नंतर ती चादर फाजलास पेश केली. निरोप झाला. गुलाबअत्तर न होताच सदर बरखास्त झाली. सर्वत्र खिन्नतेचे साम्राज्य पसरले होते.

—तीन दिवस लोटले अन् शहरात पुन्हा भयंकर खळबळ उडाली. कोल्हापूरच्या ठाण्याहून स्वार भयंकर खबर घेऊन आले. स्वार दौडत विजापूरच्या हमरस्त्यांवरून शाही इमारतीकडे गेले.

वाईपासून कोल्हापूरपर्यंतचा मुलुख शिवाजीने काबीज केला ही खबर ऐकून बादशहाचे धाबे दणाणले !

—सारी दुनिया अजून प्रतापगडाकडे नजर लावून बसली होती. अफझलखानाच्या पंजातून शिवाजी बचावत नाही, अशी प्रत्येकाची खात्री होती. इंग्रज, डच, फ्रेंच, पोर्तुगीज, कुतुबशाह, औरंगजेब, जंजिऱ्याचा सिद्दी, खुद्द विजापूरचा आदिलशाहासुद्धा. ह्या सर्वांचे किल्लेदार, ठाणेदार, सुभेदार, अमीन वगैरे सर्वजण यामुळे खुशीत होते. गाफील होते.

परंतु प्रत्यक्ष झाले वेगळेच ! परंतु अद्याप खानाच्या साफ बर्बादीची मुस्तकीम खबर कोणालाच कळली नव्हती. प्रतापगडाच्या अगदी जवळच्या मुलुखात फक्त पोहोचली होती.

कोकणात उठलेला महाराजांचा सरदार दोरोजी, अदिलशाही गलबते पकडू लागला. याच वेळी जंजिऱ्याच्या सिद्दीने तळे आणि घोसाळे या मराठ्यांच्या ठाण्यांस वेढा दिला होता. त्याला वाटत होते शिवाजी मरणार—मेलाही असेल—आता कोकणपट्टी आपलीच, पण एक

दिवस त्याच्या जासुदाने खबर आणली की, खानच मेला ! अन् मग सिद्दीसाहेबांची इतकी विलक्षण गाळण उडाली की, ताबडतोब वेढा उठवून त्यांनी जंजिऱ्याकडे धूम ठोकली.

महाराज वाईहून निघाले. आता त्यांना अडविण्याची हिंमत कोणातच नव्हती. वादळी चढाई करीत झपाट्याने ते मुलुख जिंकीत चालले होते. शिवाजी आपल्यावर चालून येईल हे कोणाला स्वप्नातही खरे वाटत नव्हते.

एक ठाणे जिंकायचे, झटपट त्याचा बंदोबस्त करायचा, चार घटका विश्रांती घ्यायची, कूचाची आरोळी झाली की, उठलीच सारी फौज. अशी ऊगबग करीत महाराज चालले होते. मराठ्यांच्या घोड्यांना बसता येत नव्हते ! खटावानंतर मायणीवर छापा घातला. मायणी घेतली. लगेच रामपूर. तेथून कलेढोण, वाळवे, अष्टी. मागच्या ठाण्यावर काढलेले बंदुकीचे बार हवेत विरायच्या आत पुढच्या ठाण्यावर झडप पडत होती. अष्टे–वडगांव वेळापूर–औदुंबर–मसूर–कऱ्हाडपर्यंतचा प्रदेश घेतला. कऱ्हाडची उत्तरालक्ष्मी प्रसन्न झाली.

नेताजी, तान्हाजी, कान्होजी वगैरेंच्या पराक्रमाची अन् विजापुरी फौजेच्या फजितीची गम्मत सांगायला कृष्णाबाई वाईहून लगबगीने आली होती. खान कसा मेला हे सांगायला कोयनाबाई आली होती. एकमेकीला मिठ्या मारून महाराजांचे यश गात होत्या, पण दोघींच्या आधी महाराज कऱ्हाडला दाखल झाले होते.

तेथून महाराजांनी सुपे गाठले. तांबे, पाली, नेर्ले, कामेरी, विसापूर, सावे, उरण, कोळे हा सबंध मुलुख घेतला–खानाच्या वधानंतर अवघ्या तेरा दिवसात ! गरुडाची भरारी, सागराची लाट आणि महाराजांची दौड सारखीच ! कोण अडविणार ?

—आणि महाराज मार्गशीर्ष व. ६ (दिनांक २५ नोव्हेंबर १६५९) रोजी कोल्हापुरांत घुसले. कोल्हापूर जिंकले ! महाराजांची नजर पन्हाळ्याकडे गेली. तेथून अवघा तीन कोस. पन्हाळगड ! पन्हाळगड !

महाराजांच्या समशेरीचे टोक पन्हाळ्याच्या छाताडाकडे रोखले गेले. मराठी फौज तिकडे दौडत निघाली.

—कोल्हापुरात शिवाजी घुसला, ही खबर ऐकताच दचकून अदिलशहानें छातीवर हात ठेवला. दरबारची छाती धडधडू लागली. आता काय करायचे तरी काय ?

—मराठ्यांचा सरनौबत नेताजी पालकर याने गदग, तिकोटे, हुकेरी; गोकाक ही ठाणी लुटली. लक्ष्मेश्वर लुटीत आहे; आता विजापुरात घुसणार, अशी बातमी विजापुरात थडकली !

लगेच तिसरी बातमी आली-शिवाजीने पन्हाळ्याला वेढा घातला !

—धुळीचे लोट उसळले. महाराज आपल्या फौजेसह पन्हाळ्याच्या पायथ्याशी थडकले. महाराजांनी भराभर हुकूम फर्मावले. एका घटकेत गडाला वेढा पडला.

गडावर धावपळ उडाली. गडाला फास पडला. हा आला तरी कोण ? कोठून कधी ? कसा ? किल्लेदाराचे पाय लटपटले. मराठे गडाला बिलगले. गुळाच्या ढेपीला जशा मुंग्या. गडावर अगदीच तयारी नव्हती. शिवाजीचाच वेढा पडला असल्याचे त्याला समजले. तो आश्चर्याने गडबडला. घाबरला. शिवाजी ? आँ ? मग आपल्या खानसाहेबांचे काय झाले ?—ते वारले !

गडावर गडबड, गोंधळ, धावपळ सुरू झाली. किल्लेदाराने भराभर तोफा चढवल्या. डागल्या. मारा सुरू केला. आस्मान धुराने भरून गेले. मराठे तरीही वर वर सरकत होतेच. खालूनही बंदुकांचा मारा चालू होता. गडाचा घेर केवढा अफाट ! एका बाजूस रोखावयास धावावे, तर दुसऱ्या बाजूने मराठे तुरुतुरु वर चढत. किल्लेदार भांबावून गेला. डायाडोल झाला.

—नेताजी पालकर लक्ष्मेश्वरपर्यंतची प्रचंड लूट घेऊन कोल्हापुराकडे पसार झाल्याचे दरबारला कळले.

नेताजी सारी लूट घेऊन कोल्हापुरात दाखल झाला. त्याने गेल्या चौदा दिवसांत अदिलशाहीमुलुख अक्षरशः नागडा करून टाकला.

पन्हाळ्याच्या वेढ्याची दुसरी रात्र उगवली. किल्ल्याचा जीव गळ्याशी आला. गडावरून सुटणारे तोफांचे गोळे अंधारात तुटणाऱ्या ताऱ्यांप्रमाणे दिसत होते. मराठे गडाच्या गळ्याशी भिडू पाहात होते. ही वानरे अंधारात किती पुढे सरकली हे समजत नव्हते.

मराठे तटाच्या टप्प्यात आले. तटावरून मशाली घेऊन धावपळ करणाऱ्या गनिमी हशमांस गोळ्यांनी व तिरंदाजीने अचूक टिपून घेण्याचा मराठ्यांनी सपाटा लावला. तोफा बंद पडल्या. मेहताबा विझल्या. मराठे तटाला भिडले. माळा करून भराभर तटावर चढले. भयंकर कापाकाप चालली. आतून दरवाजा उघडला गेला. मराठी फौजेचा लोंढा गडात घुसला. मशालींचा पाठलाग सुरू झाला. आवाजाने कानांचे पडदे फाटले. गनिमाचे असंख्य लोक ठार झाले. राहिलेल्यांचा धीर पार पार सुटला. हत्यारे टाकून ते शरण आले. गड काबीज झाला ! शिंगे-नौबती वाजू लागल्या. दरवाजावर भगवा झेंडा फडफडू लागला. विजयाच्या तोफा उडू लागल्या. महाराज पायथ्यास होते. त्यांस विजयाची मशाल गेली. ते गडावर लगेच आले. मशालीच्या नाचऱ्या उजेडात, गर्जत गर्जत मराठ्यांनी महाराजांचे स्वागत केले. (दि. २८–११–१६५९)

महाराज खूष झाले. सबंध रात्रभर जागून, महाराजांनी त्या अप्रतीम गडाची पाहाणी केली.

नेताजीही गडावर येऊन दाखल झाला.

चढती शीग होती पराक्रमाची, उत्साहाची, धाडसाची, विजयाची !

अफझलखानाला मारल्यापासून अवघ्या अठरा दिवसात वाईपासून पन्हाळ्यापर्यंतचा पट्टा हस्तगत झाला. वसंतगड, वर्धनगड, कऱ्हाडचा कोट, मच्छिंद्रगड अन् कल्याणगडासारखे अवघड गड फत्ते झाले.

बापाच्या वधामुळे फाजलखानाची आतल्याआत संतापाने लाही होत होती. खरोखरच जर महाराज त्याच्या तावडीत सापडले असते तर त्याने त्यांचे काय केले असते कोण जाणे. सूड घेण्याकरिता तो तळमळत होता. शिवाजीचा नाश व्हावा अन् तो आपल्याच हातून व्हावा, हे त्याचे अन् प्रत्येकाचेच आवडते मनोराज्य होते, पण–?

आता फाजलखानाच्या जोडीला समदुःखी सरदार मिळाला. त्याचे नाव रूस्तुमेजमान. महाराजांनी कोल्हापूर घेतले. पन्हाळा घेतला. नेताजीने रायबागवर छापा घातला. ह्या बातम्या विजापुरात आल्यावर फारच खळबळ उडाली. रूस्तुमेजमानची उलघाल झाली, कारण त्याच्या जहागिरीच्या मुलखातच महाराज शिरले होते.

रायबाग, कोल्हापूर, राजापूर व कारवार ह्या मुलखाची जहागीर त्याची होती. पन्हाळा गेला हे कळल्यावर त्याची झोप उडाली. फाजल-

खानाला रडायला, चिडायला अन् लढायला दोस्त मिळाला. दोघांनीही बादशहापाशी तातडीने जाऊन मागणी केली की, शिवाजीवर ताबडतोब आम्हाला रवाना करा ! बादशहानेही ताबडतोब हे दोन पेटलेले बाण महाराजांवर सोडले,

विजापुराहून रुस्तुम आणि फाजल दहा हजार फौज, हत्ती, तोफा, उंट वगैरे सारा थाट घेऊन निघाले. मलिक इतबार, सादातखान, फत्तेखान, मुल्ला हय, घोरपडे, सर्जेराव घाटगे वगैरे सरदार त्यात होते. मोठ्या रागावेगात निघाले होते, पण प्रत्येकाला आतून भीती वाटत होती.

फाजलखानाचे सैन्य अगदीच भेदरट होते. वाई–प्रतापगडाहून थपडा खाऊन आलेले वीर तेथे झालेल्या ' समारंभाची ' वर्णने सांगत होते आणि आता त्या शिवाजीशीच प्रत्यक्ष गाठ म्हणजे मरणच, अशी फाजलच्या फौजेची पक्की समजूत झाली होती. केवढा विश्वास !

महाराजांच्या हेरानी पन्हाळगडावर खबर आणली. महाराजांनी रायबागेकडे गेलेली आपली फौज ताबडतोब माघारी बोलावली. गोदाजी जगताप, वाघोजी तुपे, हिरोजी इंगळे, भीमाजी वाघ, सिधोजी पवार, महाडिक, जाधव, पांढरे, खराटे व सिद्दी हिलाल हे महाराजांचे साथीदार शिकार आली म्हणून उठले. नेताजी पालकर महाराजांच्या उजव्या हाताशी होताच.

अफझलखानाच्या वधापासून प्रत्येक दिवसागणिक मिळत गेलेल्या विजयांनी मराठी लष्कराची ठाम खात्री होती की, आपण आता वाटेल ते करू शकू. जिथे महाराज तिथे यश. महाराजांच्या माथी आईने यशाचा हात ठेवला आहे. अपेश नाहीच यायचे.

रुस्तुमेजमानची फौज मिरजेपाशी आली. लगेच कोल्हापुराकडे दौडत निघाली. हेरांनी लगोलग पन्हाळ्यावर महाराजास खबर दिली.

महाराजांनी कूचाच्या इशाऱ्याकरिता नौबत वाजविण्याचा हुकूम दिला. सबंध किल्ला उठला. घोड्यांवर जिने चढली. कमरेला तलवारी लटकल्या. सारी फौज सज्ज झाली. पन्हाळगडाच्या बंदोबस्ताकरिता आधीच माणसे आणि फौज नेमून दिली होती. त्यांनी गडाचा कडेकोट बंदोबस्त केला.

महाराजांनी जगदंबेचे दर्शन घेतले. आईसाहेबांचे आणि शहाजी-राजांचे पाय स्मरले.

" जय आदिशक्ति ! "

महाराज सज्जाकोठीत आले. समोर पाच हजार मराठे बहाद्दर हुकुमाकरिता कान टवकारून उभे होते. सर्वांनी ' हर हर ' गर्जना केली. महाराजांनी हसून शाबासकीचा हात उंच हलविला. बस्स् ! आग चेतली ! महाराजांस मुजरे करून त्यांनी भराभर घोड्यांवर उड्या टाकल्या. महाराजांची जणू पाच हजार प्रतिबिंबेच घोड्यावर नाचत होती. अदिलशहांनी, कुतुबशहांनी आणि दिल्लीच्या मोंगली बादशहांनी स्वत:ची प्रतिबिंबे पाहायची झाली, तर शाही शीशमहालात पाहावीत वा जनानखान्यांतल्या दो नयनांच्या आयनात पाहावीत ! आम्हा मराठ्यांच्या ह्या महादेवाचे प्रतिबिंब प्रत्येक मराठ्यात दिसत होते !

—महाराज झर झर झर झर सज्जाकोठीच्या पायऱ्या उतरून खाली आले. सरनौबत नेताजी पालकराने इशारत दिली. शिंगकर्णे वाजू लागले. महाराज घोड्यावर स्वार झाले. कूचाची तोफ बुरुजावरून उडाली. गडाचा दरवाजा खोलला. प्रचंड रणगर्जनेत मराठी फौज निघाली. आघाडीला एका पोलादी स्वाराच्या हातात भगवा झेंडा फडकत होता. पाच हजार तलवार महाराजांमागोमाग निघाली.

रुस्तुम अन् फाजल कोल्हापूरनजीक आले. कोल्हापुरात बिनधोक घुसता येणार, असा विश्वास त्यांना वाटू लागला. एवढ्यात त्याने आघाडीस पिटाळलेल्या टेहळणीच्या स्वारांनी खबर आणली की, खुद्द शिवाजी अन् नेताजी पाच हजार फौज घेऊन येत आहेत. प्रत्यक्ष शिवाजी अन् नेताजी ? फाजलने आवंढा गिळला !

रुस्तुमेजमानने लगेच भराभर आपल्या फौजेची लढाईसाठी जय्यत तयारी सुरू केली. त्याने आघाडीस घोड्यावर राहून मोठमोठ्याने आपल्या सरदारांस हुकूम देण्यास सुरुवात केली. त्याच्या एका हातात नागवी तलवार होती.

" वो देखो ! मऱ्हाठोंकी फौज आ रही है । अब तुम्हारी बहादुरीकी कर्तब दिखानेका वख्त है । तुम्हारी हो चुकी हुई बेइज्जतीका बदला आज ले लो । तुम्हारी हिम्मत किसीसे कम नहीं है । तुम अपनी

अपनी फौजोंको ठीक तर्तीब दो। तुम खुद महाजपर डटे रहो। जराभी कदम न डगमगाने पायें। मैं वजाते खुद फौजके मर्कजमे खडा रहूंगा। फाजलखान ! तुम फौजके बाये बाजू रहो। मलीक इतबार ! तुम और सादातखान दोनों मिलकर फौजकी दाये बाजू रहो। घाटगे ! तुम गश्त लगाते रहो। फत्तेखान ! तुम और मुल्ला हय दोनो मिलकर फौजेके पीछेकी तरफ रहो ! जल्दी करो, जल्दी करो। चलो ! "

लगेच अदिलशाही फौजांची हालचाल सुरू झाली. महाराजांच्या चाणाक्ष हेरांनी सर्व बातम्या तपशीलपूर्वक, त्वरेने पोहोचविल्या.

महाराज नजीक आले. मराठी फौजेत महाराजांनी एकेका सरदारास आपआपली कामगिरी वाटून दिली. चढाईसाठी मराठी सेना उत्सुक झाली. वाद्य वाजवणारांनी एकदम हलकल्लोळ सुरू केला. मराठी सेना सज्ज झाली.

महाराजांनी एक पाय रिकिबीत अन् दुसरा पाय घोड्याच्या पाठीवर खोगिरावर ठेवून उभ्याने समशेर उंचावून आरोळी दिली, " जय कोल्हापूरवासिनी ! "

" जय भवानी ! " मराठी फौज गरजली.

रुस्तुमनेही आपल्या फौजेला मराठ्यांवर चालून जाण्याचा हुकूम दिला. ओरडत-गर्जत विजापुरी फौज सुटली.

महाराजांनी तलवारीचे पाते दुष्मनाच्या रोखाने सपकन् फिरविले. मराठी फौज कोल्हापूरवालीचा जयघोष करीत गनिमावर तुटून निघाली. महाराज आघाडीला दौडत होते. त्यांच्या मस्तकावरचा तुरा थयथय नाचत होता.

खुद्द महाराज रुस्तुमवर चालून गेले. नेताजी फाजलखानावर तुटून निघाला. भीमाजी वाघ आणि महाडीक हे पिछाडीस असलेल्या फत्तेखानावर व मुल्ला हयवर दौडत निघाले. हिरोजी इंगळे मलीक इतबारच्या रोखाने लगाम ताणीत होता. गोदाजी जगताप घाटग्यांवर व बाजी घोरपड्यांवर चालून गेला. हणमंतराव खराटे आणि पांढरे रुस्तुमच्या उजव्या बाजूवर आणि जाधवराव व हिलाल मिळून डाव्या बगलेवर तुटून पडले.

धुळीचे पर्वत आकाशात चढले. दोन्ही फौजा भिडल्या. शर्थीचे हत्यार सुरू झाले. रुस्तुमच्या फौजेत हत्ती होते. हातघाईच्या लढाईत

हत्ती ! आटपलाच कारभार ! ते केव्हा बिथरतील याचा काय नेम ? भयंकर लढाई सुरू झाली.

नेताजी चालून येत असलेला पाहिल्यावरच फाजलखान गडबडला, तरीही तसे न दाखविता तो लढत होता. भीमाजी वाघ व महाडीक यांनी पिछाडीवरच्या फत्तेखानास अन् मुल्लास झोडपण्यास सुरुवात केली. आघाडीच्या बाजूने महाराज अन् नेताजी; डाव्या बाजूने खराटे अन् पांढरे; उजव्या बाजूने जाधवराव अन् हिलाल आणि पिछाडीवर हे दोघे; म्हणजे रुस्तुमची फौज चारी बाजूंनी वेढली गेली.

नेताजीला तोंड देता देता फाजलच्या नाकी नऊ आले. त्याला जमेना. त्याची स्वतःची फौज आधीच घाबरून गेली होती अन् त्यातून नेताजीशी गाठ पडली. अखेर व्हायचे तेच झाले ! फाजलची फळी फुटली. नेताजी आत गनिमी फौजेत घुसला. महाराजांनी तेच केले. रूस्तुमच्या तोंडचे पाणी आटले. फाजलची भीतीने गाळण उडाली. त्याची फौज वारेमाप पळत सुटली. सादात, इतबार वगैरे सर्वजण घाबरले होते. अवघ्या एका घटकेत मराठ्यांनी चिक्कार कापाकाप केली होती. फाजल-खानाला एक क्षणही धीर निघना. तो पळत सुटला. फाजलसारख्या मातबरास जीव घेऊन पळताना बघताच सादातलाही पळून जाण्यास धीर आला. तोही पळत सुटला. मलीक इतबाराने धूम ठोकली रुस्तुमेजमानला हे एक भयंकर चित्र दिसत होते. तो ओरडत होता, पण त्याचे कोण ऐकतो ? मराठे तर जास्तच फोफावले. फत्तेखान पळाला. चौफेर दाणादाण उडाली.

आणि केवढी फजिती ! खुद्द रुस्तुमेजमानच पळत सुटला ! त्याची स्वतःची फौज महाराजांच्या तलवारीखाली साफ उडाली होती. आता पळालेच पाहिजे, नाहीतर कैदेत पडायची पाळी यईल हे जाणून उरलेसुरले सारे पळत सुटले. रुस्तुम पळत सुटला, तेव्हा त्याचेबरोबर फक्त पाच-सहा स्वार शिल्लक होते, तेवढे पळाले. महाराजांचे लोक रूस्तुमचा पाठलाग करू लागले, पण महाराजांनी त्यांना थांबविले. महा-राज हसत हसत ती पळापळ पाहात होते.

" पळू द्या त्याला ! खास बादशहाला तुमचा आजचा पराक्रम ह्याच्याच तोंडून ऐकू द्या ! " महाराज म्हणाले.

जयजयकाराने दाही दिशा धुंद झाल्या. सारी विजापुरी फौज पळाली. फक्त ठार झालेले अन् जखमी झालेले तेवढे रणांगणात उरले. विजापूर–दरबारचा हा आणखी एक अगडबंब पराभव झाला. सर्व युद्धसामग्री महाराजांस मिळाली. शिवाय बारा हत्ती, दोन हजार घोडे वगैरे किंमतवान लूट स्वराज्यात दाखल झाली.

तिकडे चंदन–वंदन किल्ल्यांवरही झेंडे लागले. कोंकणातही दाभोळ बंदर काबीज झाले. अफझलखानाचा पायगुण फार मोठा लाभदायक ठरला ! महाराजांस, नेताजीस अन् दोरोजीस कुठेही अपयश आले नाही. पराक्रम भरधाव दौडत होता. धाडस वणव्याची पर्वा न करता उड्या घेत होते. उत्साहाला जांभई माहीत नव्हती. जय आणि श्री महाराजांस शोधीत धावत येत होती.

## सिद्दी जौहर

डोके अगदी सुन्न झाले ! मेंदू बधिर झाला ! काय करावे तरी काय, हे अली अदिलशहा बादशहास समजेना. दरबारच्या मुत्सद्यांची अक्कल चालेना. बडी बेगम तर वैतागली. मक्केला निघून जाण्याच्या गोष्टी बोलू लागली. विजापूरचे सारे जंग बहादूर नामोहरम झाले. कुणी मेले, कुणी कैदेत पडले हार खाऊन कुणी समशेरी टाकून पळून आले. आता शिवाजीवर स्वारी करण्याची कुणी मनोराज्येही करीत नव्हता. महाराजांनी एकेकाचे हात असे पिरगाळले होते की, आता कुणालाही महाराजांविरुद्ध समशेर धरायचे धारिष्टचच उरले नव्हते. जेवढ्या वेगाने रुस्तुमेजमान व फाजलखान गेले होते, त्याच्या पंचवीसपट वेगाने परत आले, साफ धुव्वा उडाला !

आता कोणाला शिवाजीवर पाठवावे हे बादशहास समजेना. खास जातीने जाऊन ह्या शिवाजीला तोफेच्या तोंडी द्यावे, असे बादशहास

सारखे वाटत होते. कल्पना रम्य होती! पण जमायचे कसे? पण—हां. आठवला! बादशहाला एकदम एका आडमाप गड्याची आठवण झाली. झरकन् तो काळकभिन्न, लोखंडाचा जिवंत पुतळा, त्याच्या नजरेपुढे आला. कर्नूळचा नबाब सलाबतखान सिद्दी जौहर! बस्स्! ठरले!

लगेच बादशहाने वजिरास बोलावून घेतले. वजिरास तर ही नामजादी एकदम निहायत पसंत पडली. ताबडतोब बादशहाने आपल्या अदिलशाही शिक्क्याचे खास फर्मान जौहरकरिता तय्यार केले. वजिराने जासुदास हाजीर होण्यास फर्माविले. गुर्झबारदारासही हुकूम झाला. एका खोजा एकाने चांदीच्या नक्षीदार तबकात अस्सल चंदनाची उटी उगाळून आणली. ते तबक त्याने बादशहापुढे धरले. बादशहाने आपला उजवा पंजा त्या चंदनात बुडविला. वजिराने फर्मान उलगडून बादशहापुढे चौरंगावर ठेविले. बादशहाने चंदनाने भिजलेला आपला पंजा त्या फर्मानावर उमटविला. जौहरचा केवढा मान! बादशहाच्या खास पंजाचे फर्मान त्याला जाणार होते.

वजिराने किनखापी थैलीत ते फर्मान घातले व जासुदांचे हाती थैली दिली आणि जासुदांबरोबर जाणाऱ्या गुर्झबारदारास फर्माविले, "नवाबे-आझम सलाबतजंग सिद्दी जौहर—!"

"ज्यो हुक्म!" पोटाशी हात नेऊन अन् शीर लववून गुर्झबार म्हणाला.

सिद्दी जौहरचा मुक्काम कर्नुळास होता. फर्मानात आणि गुर्झबारदाराबरोबर बादशहाने जौहरला मुलाखतीसाठी तश्रीफ फर्माविली होती. फर्मानाची थैली घेऊन जासूद-जोडी आणि गुर्झबारदार कर्नूळकडे तडक रवाना झाले.

सारा प्रवास संपवून जासूद व गुर्झबारदार कर्नूळानजीक येऊन दाखल झाले. आपल्याकरिता खास गुर्झबारदार शाही फर्मान घेऊन येत असल्याची खबर सिद्दी जौहरास समजली. जौहर ताबडतोब हातचे काम टाकून उठला. जौहरच्या वाड्यातही गडबड, धावपळ उडून गेली. शाही फर्मान आले! शाही फर्मान आले!

डोक्यावर कीमांश अन् शिरपात्र घाईघाईने चढवीत जौहरने आपल्याभोवती असलेल्या आपल्या दिवाण, फडणीस, चिटणीस वगैरे



2054 98840

मंडळीस आपल्याबरोबर चलण्यास फर्माविले. त्याच्या वाड्यावरच्या नौबतखान्यात डंका सुरू झाला. जौहरने रुमालाने स्वतःचे हात बांधले आणि आपल्या मंडळीसह तो कर्नूळच्या वेशीकडे फर्मानास आणि गुर्झबारदारास अनवाणी सामोरा निघाला. कर्नूळची जनता कुतूहलाने पाहात होती.

बादशाही फर्मान आले वा बादशहाचा गुर्झबारदार आला म्हणजे त्याचे स्वागत इतक्या आदबीने अन् मानाने केलेच पाहिजे, असा सक्त कायदा होता. जर न केले, तर तो माणूस दरबारचा गुन्हेगार समजला जात असे. कित्येकदा अशा फर्मानाचे स्वागत शामियाना ..नाबाहेर उभा करून करीत. त्याला फर्मानबाडी म्हणत.

गुर्झबारदार व जासूद कर्नूळच्या वेशीत आले. गुर्झबारदाराच्या हातात सोन्याची नक्षीदार काठी होती. काठीच्या वरच्या टोकावर रत्नखचित चाँदतारा लखाखत होता. एक भरजरी हिरवा शेमला काठीला बांधला होता. ही काठी उजव्या हातात घेऊन, गुर्झबारदार संथ पावले मोठ्या दिमाखात टाकत चालत होता. त्याचे कपडेही भरजरी होते.

मान लववून, बांधलेले हात पोटाशी धरून, अत्यंत अदबीने जौहर सामोरा आला. जौहर नजीक येताच, गुर्झबारदाराने आपल्या हातातील काठी उंचावून उच्च सुरात आरोळी दिली, " शहेनशाह जिल्हे सुभानी परवरदिगार आलमपन्हा जिल्हे इलाहीका हुक्म है, आप कदमबोसीके लिये चलीये ! "

" हुक्म मंजूर है ! आलीजाहके हुक्मकी तामिली जल्द अन् जलद हो जायेगी ! " जौहर अदबीने म्हणाला.

जासुदाजवळची फर्मानाची थैली गुर्झबारदाराने जौहरच्या हाती दिली. गुडघे टेकून जौहरने थैली ओंजळीत घेतली. अदिलशाह जिंदाबाद ! " अशी गर्जना करून, त्याने ती थैली मस्तकावर घेतली आणि सर्वांसह आपल्या वाड्याकडे निघाला. फर्मानाच्या सन्मानार्थ तोफखाना सुरू झाला.

सिद्दी जौहारने लगेच आपल्या दिवाणास शहराच्या दरपेश पेशखाना उभा करण्यास फर्मावले. आपल्या साऱ्या फौजेस मोहीमनशीन होण्यासाठी हुकूम सोडले.

नवाब सलाबतखान सिद्दी जौहर. केवढी आसामी ! तो धिप्पाड देह कमरेवर हात ठेवून उभा राहिला की, भीतीने घामच सुटावा. रंग काळा कुट्ट, ओठ गांधीलमाशा चावल्यासारखे जाड अन् लाल. डोळे टप्पोरे, भिवया राकट, केस कुरळे, मान घड्या घड्या पडलेली अन् भली जाडजूड. एवढ्या मोठ्या काळ्याभोर जबड्यावर डोळ्यांची हालती बुबुळेच फक्त पांढरी ! आणि हसला म्हणजे दातांची पलटणही. असा हा आडमाप अन् भयानक आदमी होता. पण शूरही तसाच. दरारा दांडगा.

त्याचा सर्वत्र दरारा होता, पण त्याच्याबद्दल आकर्षण नव्हते, कारण त्याचा वंश वेगळा. अंग–रंग हा असा, पण त्याला त्याची पर्वा नव्हती. सरळ नाकापुढचा शिपाईगडी. विजापुरास जाण्यास जौहर फौजेसह डेरेदाखल झाला.

—रुस्तुमेजमानच्या पराभवानंतर महाराजांनी नेताजीस पुन्हा अदिलशाही मुलुखात धुमाकूळ घालण्यास मोकळे सोडले. विजापुरी फौज ह्या भागात फार थोडी होती अन् तीही भेदरलेली

नेताजीने कोल्हापुराहून कूच केले. त्याने कवठे, बोरगाव, मालगाव, कुंडल, अंबुप, घोगाव, सत्तीकीर, आड, सांगली, मायील, पारगाव ही गावे अगदी आसानीने घेतली. पण एक ठाणे जबरदस्त होते. ते म्हणजे मिरजेचे. मिरजेचा किल्ला भुईकोट, पण खूप अवाढव्य. भोवती खंदक अन् त्यात पाणी. किल्ल्यात घुसायला वावच नव्हता. तट होता मातीच्या भेंड्यांचा. नेताजीला किल्ल्याला वेढा घालून बसायला वेळच नव्हता. लांब लांबच्या मजली मारून, सारी आदीलशाही लूटून 'बे' चैन करायची होती. म्हणून नेताजीच्या मागोमाग वेढ्याच्या उद्योगासाठी महाराज स्वतःच निघाले. नेताजीने मिरज गाव घेतले. आपल्या चौक्या-पहारे बसविले अन् तो पुढे गेला. किल्ल्यात किल्लेदाराने लढाईची तयारी सुरू केली.

महाराज मिरजेत दाखल झाले आणि लगेच त्यांनी किल्ल्याला वेढा घातला.

—सिद्दी जौहर आपल्या फौजेसह विजापुरात दाखल झाला. खुद्द वजीर त्याला सामोरा आला. मोठ्या गौरवाने त्याने जौहरला दरबारात

आणले. तो दरबारात येताच, जो तो खुषी व्यक्त करू लागला. चोपदाराने जौहरच्या नावाची ललकारी दिली. दरबारात चौगीर्द जौहरच्या शुक्रगुजारीचा मजकूर उमटत होता. जौहरची तबियत केवळ यामुळेच खूष होऊन गेली. खुद्द बादशहानेही करमबक्षी उधळणारी भरजरी भाषा वापरून, जौहरचे आलीशान स्वागत केले. बडी बेगम पडद्यात बसली होती.

जौहरने आदब बजावून तसलमात पेश केली. मोठी कीमतवान जियाफत नजर करून, सत्का ठेवला आणि बआदब उभा राहिला. बादशहाने जौहरची मोठीच ताजीमत करीमत केली. बादशहा बोलतच होता, " आदिलशाही तख्तको जिसपर नाझ है ऐसी हस्ती आज दरबारमें जन्वा अफरोज देखकर मावदौलतको दिली मुसर्रत हो रही है ! परवरदिगारकी खास नजरे करमसे वजूदमे आयी हुई इस आदिलशाही रियासतकी खिदमत करनेके लिये इस शुजाअ्, मर्देमैदान, सरफरोष, समशीरबहादूर, बावफा, निहायत आकलमंद सिपह सालारकी खुदा उम्र दराज करे ! और दौलतसे भी मालामाल करे ! सलाबतखान—"

" झिंदाबाद ! " सारा दरबार ओरडला.

सिद्दी जौहर ह्या शुक्रगुजारीने अगदी भारावून गेला. त्याने अदिलशाहास बार बार कुर्निसात केले. एवढी स्तुती आजवर त्याची कधीच झाली नव्हती. आपण एवढे मोठे कधी झालो हे त्यालाही समजेना. सारा दरबार त्याची वाहवा करीत होता.

" सलाबतखान ! मावदौलतने तुम्हें बडी उम्मीदसे दरबारमें खास मुलाकातके लिये तलब किया है । आजतक तुमने जो कुच नादीर खिदमत की है, वो मावदौलतपर रोशन है । तुम्हारी जितनीभी इज्जत अफजाई करे कम है । तुम्हारी रुस्तूमीकी शान रूमशामसे लेकर दख्खनके आखरी सीरेतक झलक रही है । गुजरे कई दीनोंसे सीवाजी भोसलेनें हमारी सल्तनतसे बडी दगाबाजी करके हमे जक पोंहचा रहा है । तुम्हारी तेगके आगे उस डरपोक सीवाजीकी मजालही क्या है ! मावदौलतने ये तै कर लिया है के सारी फौज व काफी खजाना और जबरदस्त तोफखाना तुम्हारे करके सीवाजीकी ताकदको पूरी तरह जड पेडसे उखेडनेके लिये भेजा दिया जाय ! " बादशहा म्हणाला.

" जरूर जरूर खुदावद ! मैं सर हथेलीपर लेकर ये बाजी जीत जाउंगा ! सीवाजीको सजा देनेकी जिम्मेदारी मुझ नाचीजपर सोंप दी

ये जिल्हे इलाहीकी जर्रा नवाजी है । तख्तके हर सू फली हुई तारिकीको मैं चाक करदूंगा । मेरी शमशीरे–आबदार सीवाजीके खूनसे रंग कर जिल्हे सुबहानीके कदमोंपर निछावर करदूंगा । हुजूर जराभी फिक्र न करे ! " सिद्दी जौहर आदबीने म्हणाला.

"शाब्बास बहादूर ! तुझे कामयाबी हासील होगी ।" खूष होऊन बादशहा म्हणाला अन् त्याने दरबारवर नजर फिरवून सरदाराचे नाव उच्चारण्यास सुरुवात केली, " रुस्तुमेजमान ! सादतखान ! सिद्दी मसूद ! राजे बाजी घोरपडे ! भाईखान ! "–नाव उच्चारताच प्रत्येकजण पुढे येऊन कुर्निसात करीत होता.

" ये सब हिम्मतबहाद्दर तुम्हारे साथ आयेंगे । और फाजलखानभी आयेंगे ! "

आता प्रत्येकजण जौहरबरोबर जाण्यास अर्जुमंद होता. मोठाच उत्साह दरबारात दरवळत होता.

नंतर बादशहाने शिरपेच, जेगा, कंठा, कट्यार, शमशीर, ढाल व शिरपाव तबकात घालून वजिराकडून आणविला. बादशहाने तबकास हस्तस्पर्श केला. वजिराने ती तबके जौहारास पेश केली.

" सलाबतखान ! इस नई मोहीमपर रवानगीकी खुषीमे माबदौलत तुम्हे शिरपाव और खीलत इनायत करते है ! वजीरेआझम ! इन्हें खास पायगाहसे दो अस्प और एक फाल इनायत करो. "

" हुजूरकी नवाजीशोका शुक्रिया ! " लवून जौहर म्हणाला.

" तुम और तुम्हारे साथ आनेवाली फौज फौरन तय्यार रहे ! और माबदौलतका हुक्म पातेही कूच करे ! "

" हुजूरका हुक्म सर आंखोपर ! " जौहर म्हणाला. अत्तर गुलाब झाले आणि बादशहाच्या परवानगीने जाहीर केले, " बरखास्त बरखास्त ! "

जो तो जौहरची स्तुती करीत होता. ह्या एवढ्या सिर्फराजीने जौहरलाही स्फुरण चढले.

विजापूर पुन्हा एकदा गजबजून गेले. चाळीस हजार फौजेचा तळ शहराबाहेर पडला. अफझलखानापेक्षाही प्रचंड तयारी. आता अनुभवाने शहाणे झालेले लोक बरोबर होते. प्रख्यात सेनापतीचे नेतृत्व होते. आता शिवाजी हमखास हासिल होणार ! अशी प्रत्येकाला खात्री वाटू लागली.

जौहर आणि फाजलखान जातीनें प्रत्येक गोष्टीत लक्ष घालीत होते. तोफा भुई चेपीत धावत होत्या. गवताच्या गंजीने भरलेल्या गाड्या डगमग डोलत छावणीकडे रांग धरून चालत होत्या. हत्तींची मोठीथोरली रांग छावणीच्या तोंडावर उभी होती. तंबू, शामियाने, राहुट्या, पाले, दाटीदाटीने ठोकली होती. दारूगोळ्याचे पेटारे सख्त पहाऱ्यात रचून ठेवले होते. साराच पसारा प्रचंड होता.

शिवाय बादशहाने खास फर्माने पाठवून शृंगारपूरच्या सूर्यरावास, पालीच्या जसवंतरावास, वाडीच्या सावंतास व इतर अनेक लहानमोठ्या सरदारांस सलाबतखान सिद्दी जौहरास फौजेसह सामील होण्यास फर्माविले. कोकणातले सर्व शत्रु महाराजाविरुद्ध एकदम उठावेत, अशीही तर्तूद केली. एवढे करून बादशहा थांबला नाही. एकवटून ह्या शिवाजीला चिरडून–भरडून टाकायचेच असे त्याने ठाम ठरविले होते. त्याने दिल्लीस औरंगजेबास विनंतीचा अर्ज पाठविला की, आम्हास मदतीसाठी मोंगली फौज पाठवा किंवा एखादा मातबर सरदार स्वतंत्ररीत्या स्वारी करण्यास पाठवून द्या. ही अर्जी मोठी आर्जवाची होती. पत्रांच्या थैल्या घेऊन सांडणीस्वार केव्हाच दिल्लीच्या वाटेला लागले होते.

—राजापूरकर इंग्रजांचे टोपीवाले प्रतिनिधी व त्यांचा एक शेणवी दुभाष्या असे मिरजेच्या वेढ्यात हजर झाले. इंग्रजांकडून काही बोलणी करावयास प्रतिनिधी आले आहेत, अशी खबर गंगाधरपंतांनी महाराजांस दिली. महाराजांनी त्या सर्वांस सदरेवर आणण्याचा हुकूम दिला.

दोरोजीने कोकणात इंग्रजांची जहाजे मालासकट जप्त करून, गीफर्ड वगैरे इंग्रजांस कैद केले होते, याबद्दल रदबदल करावयास हे इंग्रज आले होते.

इंग्रज–प्रतिनिधी व त्यांचा दुभाष्या गंगाधरपंतांबरोबर महाराजांपुढे आले. टोप्या काढून इंग्रजांनी अत्यंत अदबीने महाराजांस सलाम केले.

"काय म्हणणं आहे यांचं पंत ?"

"महाराज ! हे राजापुराहून आले आहेत आणि यांचा अर्ज आहे की–" पंतांनी सर्व हकीकत निवेदन केली.

इंग्रज–प्रतिनिधी लगेच इंग्रजीत बोलले की, "आम्ही निरपराध व्यापारी आहोत. आम्ही कोणत्याही राजकीय भानगडीत भाग घेत

नसतो. फक्त व्यापार करतो, मग ही शिक्षा आम्हास का ?–" शेणवी दुभाष्याने मराठीत हे भाषांतर करून, महाराजांस निवेदिले.

"आमची सल्तनत म्हणजे निरुपद्रवी शरीफ सज्जनांना त्रास देणारी चोरदरवडेखोरांची टोळी नव्हे ! तुम्ही म्हणता इतके साधेभोळे हे इंग्रज नाहीत ! आम्ही यांना पक्के ओळखतो ! " महाराज म्हणाले.

दुभाष्याने ही अचूक नाडीपरीक्षा इंग्रजांस ऐकविली ! ते साळसूदपणाचा आव आणून, आपसात पुट्पुटू लागले, पण ते समजून चुकले की, अरे, याने आपल्याला ओळखलंय् रे ओळखलंय् !

"तुम्ही जंजिऱ्याच्या सिद्दीला अन् आमच्या इतर दुष्मनांना दारूगोळा आणि हत्यारे पुरविता की नाही ? " महाराज नजर रोखून मोठ्याने म्हणाले. इंग्रज गडबडले ! " युवर मॅजेस्टी–युवर मॅजेस्टी !" म्हणत गयावया करू लागले.

"पंत ! जर अंग्रेजी टोपीकर अशाप्रकारे आमच्याशी हरामखोरी न करता, निव्वळ उद्योगधंदा करून आमच्याशी निष्ठेने वागण्याचे लेखी दस्तखत करून देत असतील, तरच त्यांच्या अर्जाचा विचार आमच्या मर्जीस येईल ! नाहीतर आत्ताच्या आत्ता टोपीकरास निरोप द्या ! " महाराज गंगाधरपंतास म्हणाले.

इंग्रजांस महाराजांचे म्हणणे मान्य करण्याशिवाय गत्यंतर नव्हते. त्यांनी मुकाट्याने लेखी करार करून दिला.

महाराजांनीही दोरोजीस आज्ञापत्र पाठविले की, टोपीकरांचा माल व माणसे त्यांच्या स्वाधीन करा.

विजापूरचे सांडणीस्वार दिल्लीत पोहोचलेही. औरंगजेबास हेच हवे होते. मराठ्यांची काफिरी दौलत त्याच्या डोळ्यात सलत होती. त्याने अदिलशहाचा अर्ज एकदम मंजूर केला. जौहर आणि फाजलखान प्रचंड फौज घेऊन शिवाजीवर जात आहेत, तेव्हा शिवाजीला हमखास नेस्तनाबूद करायला हीच संधी उत्तम आहे हे जाणून, औरंगजेबाने अगदी स्वतंत्ररीत्या आपला एक बडा सरदार बडी फौज घेऊन रवाना करण्याचे ठरविले. त्याने आपल्या एका प्रख्यात सरदारास अठ्याहत्तर हजार (७८००० !) स्वार, शिवाय बख्सारी पायदळ आणि जगड्व्याळ तोफखाना इमदाद करून, दख्खनवर रवाना होण्याचा हुकूम केला.

हा प्रख्यात सरदार म्हणजे औरंगजेबाचा प्रत्यक्ष मामा—अमीरउल्-उमरा शाहिस्ताखान !

आता मात्र आठही दिशांनी संकटांचे ढग स्वराज्यावर गोळा होऊ लागले. हजारो तोफांचा आणि शस्त्रास्त्रांचा सर्व बाजूंनी मराठ्यांवर मारा करून, शिवाजीराजांसकट साऱ्यांस कागदाच्या चिटोऱ्याप्रमाणे हवेत उडवून देण्याचा हा असुरी डाव किती भयंकर होता !

—अन् महाराजांचे बळ किती ? अगदीच थोडे. कशीबशी सर्व मिळून बारा–तेरा हजार फौज ! ना मोठमोठ्या तोफा, ना आडदांड हत्तीघोडे. बसायला आखूड बांध्याचे भिमथडी घोडे अन् खांद्यावर घोंगडे ! अन् स्वराज्याचा पसारा तरी किती होता ? चाकणपासून विशाळगडापर्यंत अन् इंदापुरापासून दाभोळापर्यंत. यातला पाऊणपट मुलुख गेल्या दोन महिन्यातच घेतलेला होता. आता शत्रूची ही वाळू दळणारी घाणीची हजारो अजस्र दगडी चाके जर आठही दिशांनी धडाडत स्वराज्यावर आली, तर व्हायचे तरी कसे ?

शाहस्ताखान एवढे मोठे बळ घेऊन निघाल्याची खबर विजापुरात आली. जौहरच्या फौजेला त्यामुळे जास्तच जोश चढला. बादशहा खूप झाला. चडफडत हात चोळणारे आता टाळ्या वाजवू लागले.

बादशहाचा निरोप घेऊन सलाबतखान, सिद्दी जौहर आणि फाजलखान निघाले. झिंदाबादच्या आरोळ्यांनी अस्मान भरून गेले. वाद्यांनी काहूर उठविले. तोफांची सरबत्ती झडली. अदिलशाही झेंडे नाचवीत चाळीस हजार फौज निघाली.

शाहिस्ताखानही याच्या दुप्पट फौज अन् सरंजाम घेऊन निघाला. राहू आणि केतू दोघेही एकाच वेळी दोन्ही बाजूंनी स्वराज्याचा सूर्य गिळून टाकायला धावत निघाले.

महाराज मिरजेला वेढा घालून बसले होते. विजापूरहून जौहर आणि फाजलखान अफाट फौज घेऊन निघाल्याची बातमी हेरांनी महाराजांस धावऱ्या धावऱ्या सांगितली. महाराज थोडा विचार करताहेत तोच पुण्याकडून हेर आले. तेही असेच.

"महाराज ! मोंगल सरदार शाहिस्ताखान फौजेचा समिंदर घेऊन निघालाय् ! औरंगाबादेहून पुढे आला !"

आता एवढ्या मोठ्या दुहेरी बळाला तोंड कसे द्यायचे? महाराज विचारात गढून गेले. खरोखर केवढे भयंकर वादळ होते! नेताजी लांबच्या मुलुखात होता. महाराजांनी अखेर निर्णय ठरविला. पन्हाळ्यावर आपण राहून, जौहरवर छापे घालायचे. नेताजीने बाहेरून छापे घालायचे. तसे नेताजीस कळवायचे. पन्हाळाच महाराजांनी मुकर्रर केला. स्वराज्याच्या दक्षिण सरहद्दीवर तोच बळकट गड होता. जर आपण पुण्याकडे किंवा राजगड, प्रतापगड, किंवा कोठेही स्वराज्याच्या अंतर्गत भागात गेलो, तर जौहर आपल्या मागोमाग स्वराज्यात घुसेल. तिकडून शाहिस्तेखानही घुसेल, मग एवढ्या अफाट शत्रूच्या पायदळी सगळे स्वराज्य चिरडेल. तसे होता कामा नये. जौहरचा काटा निघेपर्यंत शाहिस्ताखानाला शक्य तेवढा विरोध आपल्या तिकडच्या फौजा नेटाने करीत राहतीलच; अन् मग जौहरचा काटा निघाला की, वळू शाहिस्तेखानाकडे! बाहेरून नेताजीसारखा मोहरा आहेच लचके तोडायला, चला–!

महाराजांनी ताबडतोब मिरजकिल्ल्याचा वेढा उठवून, पन्हाळ्याकडे कूच करायचे ठरविले. मराठी फौजेस हुकूम झाला. मराठी फौज जय्यत तयार झाली. महाराजांनी घोडा पिटाळला. मागोमाग मराठी फौज दौडत गेली. मिरजेच्या किल्लेदाराच्या मिशा अभिमानाने वाऱ्यावर उडू लागल्या. काय आपला पराक्रम! शिवाजी भिऊन पळाला! ह्या दिवशी फाल्गुन वद्य अवस होती. (ता. १ मार्च १६६०)

दुसऱ्या दिवशी गुढी पाडवा होता (ता. २ मार्च १६६०). महाराज कोल्हापुराहून जगदंबेचे दर्शन घेऊन निघाले आणि पन्हाळगडावर आले. पाडवा होता. गडावर झेंडे अन् गुढ्या फडफडत होत्या.

महाराजांनी पन्हाळ्याचा कडक बंदोवस्त सुरू केला. सारख्या नव्या नव्या बातम्या येत होत्या. जौहरच्या युद्धसाहित्याचा तपशील छाती दडपून टाकीत होता. शाहिस्ताखानाच्या तुफानी स्वारीने तर श्वासच रोधला जात होता. आता आपल्या वाईटावर असलेले सारे स्वकीय–परकीय दावेदार ह्या संधीत आपला डाव साधून घेणार, हे महाराजांस स्पष्ट दिसत होते. स्वराज्यासारख्या पवित्र अन् पुण्यकारक परमेश्वरी कार्यातही, एवढी पर्वतप्राय संकटे यावीत ना!

सिद्दी जौहर पन्हाळ्याच्या रोखाने येत होता. त्याचा जोम भयंकर होता. पूर्वीच्या अनुभवांचे चटके बसलेले फाजलखान अन् रुस्तुमेजमान वगैरे सरदार पोळलेली बोटे फुंकीत, तरी दौडत होते, पण तिकडे तो शाहिस्ताखान महाराजास अजिबात किंमत देत नव्हता ! शिवाजी ? त्या भ्याड बंडखोराची काय किंमत ? बोटांच्या वाढलेल्या नखाएवढीच किंमत फक्त ! ही बोचरी नखे कापायला तलवारी अन् कटयारी हव्यातच कशाला ? क्षुल्लक ! क्षुद्र ! दातांनी सोलपटून थु: करून टाकण्याइतकी सोपी गोष्ट ! खानसाहेबांची ही खात्री होती. आणि आता आपल्या बादशाही बोटांचा असा ते बंदोबस्त करणार होते की, पुन्हा असली बोचरी नखे वाढूच नयेत पुन्हा कधीही, कधीही !

शाहिस्तेखान आपल्या अफाट सेनासमिंदरासह अहमदनगरास येऊन दाखल झाला.

# पन्हाळगड

एक एक दिवस चिंतेचा जात होता. महाराजांनी नेताजीस निरोप पाठविला, परंतु तो खूपच लांब—गोकाकपर्यंत गेला होता.

—आणि एके दिवशी—पन्हाळगडावर एकदम इशारतीच्या आरोळ्या उठू लागल्या. मेटकऱ्यांचे खुणेचे कर्णे वाजू लागले. किल्लेदार त्र्यंबक भास्करांचा सबनीस धावतच महाराजांकडे आला.

" महाराज ! गनिमाची फौज आली ! " सबनिसाने वर्दी दिली.

" गनीम ? जौहरच ! पंत चला ! "

महाराज लगेच घोड्यावर स्वार होऊन गडाच्या बंदोबस्ताची पाहणी करण्यास निघाले. त्र्यंबकपंत किल्लेदारही बरोबर निघाले.

कोल्हापूराकडून धुळीचे लोट पन्हाळ्याकडे सरकत होते. महाराजांनी ते पाहिले. गडाच्या प्रत्येक भागातून पाहाणी करीत महाराज

दौडत होते. ठिकठिकाणच्या मावळी टोळ्या महाराजांस मुजरे करीत होत्या. महाराज त्यांना लगेच जरूर ते हुकूम देत होते. अन् पुढे दौडत होते. मोठमोठ्या तोफा बुरुजावर ठासून तयार होत्या. तटाच्या जाग्यां-तून मावळे टेहळणी करीत होते.

अदिलशाही फौज गडाच्या दिशेला दौडत होती. समोर पन्हाळा आपल्या बुरुजाच्या अव्वल मुठीत भगवा झेंडा फडफडवीत ताठ छाती काढून उभा होता. पन्हाळा दिसू लागताच जौहरच्या फौजेला नवाच उन्माद चढला. त्याची फौज ओरडत होती. दौडत होती.

" डटके चलो ! डटके चलो ! डटके चलो ! "

एकदम हल्ला करून गड घेणे अशक्य आहे हे जौहर पक्के जाणून होता. म्हणूनच गडावरची धान्य–वैरण संपून शिवाजी शरण येईपर्यंत गडाला पक्का वेढा घालून बसायचे त्याने ठरविले होते. वेढा इतका पक्का घालायचा की, गडाच्या कोणत्याही बाजूने मुंगीसुद्धा आत–बाहेर जाता कामा नये. मग जाईल कुठे शिवाजी ? मुठीत नाक धरून शरण येईल. जौहरने ही खात्री धरली.

पावसाळा नजीक येऊन ठेपला होता. तरीही ही जी मोहीम बादशहाने काढली होती ती उगीच नव्हे. शिवाजीला मारायचेच किंवा धरायचेच ह्या निर्धाराने तो अन् सारे पेटले होते.

मावळ्यांची गडाच्या तटातटावरून लपतछपत धावपळ चालू होती.

जौहरने लगेच छावणी ठोकली आणि वेढ्याच्या कामालाही सुरुवात केली. एका बाजूस त्याच्या छावणीचे पांढरे तंबू, राहूटया, शामियाने पंख पसरीत होते अन् त्याच वेळी फाजलखान आपल्या सर-दारांस गडास वेढा घालण्याकरिता जागा नेमून देत होता. गडाला सर्व बाजूने वेढा घालण्याचा बेत होता. त्याप्रमाणे भराभर फौजांची रवा-नगी करण्यात आली. गडाच्या भोवती चाळीस हजार फौज पसरली. लहान लहान पाले ठोकण्यात आली. तोफा जागोजाग गडाकडे आ करून उभ्या राहू लागल्या. जौहरच्या फौजांनी गडाभोवती मोर्चे उभे केले.

जौहरचा कोणताही मोर्चा अद्याप गडावरील तोफेच्या किंवा बंदुकीच्या किरणात आला नव्हता, म्हणूनच अजूनपर्यंत गड गप्प होता.

गडाला पुरता वळसा पडला. खुद्द जौहर, फाजलखान, बडेखान आणि रुस्तुमेजमान यांनी गडाच्या पूर्व बाजूस व सादातखान, मसूद,

बाजी घोरपडे, भाईखान यांनी पश्चिम बाजूने वेढा घातला. तळ ठोकले, मोर्चे उभे केले.

वेढ्याची मांडणी पुरी झाली आणि जौहरने गडावर मारा सुरू करण्याकरिता तोफा-बंदुकांचे मोर्चे पुढे पुढे सरकावीत नेण्याचा हुकूम सोडला.

वेढ्यातले लोक धीर धरून, हळूहळू पुढे सरकू लागले. तोफाही हळूहळू पुढे सरकू लागल्या. गडावर महाराज एका तोफेपाशी उभे होते. सर्व मावळे बंदुका ठासून अन् किरण साधून, तटावर तयार होते. जौहरचे लोक आणखी पुढे सरकले. तोफाही.

महाराजांनी निरखले अन् हात उंचावून ते उद्गारले, 'जय भवानी ऽ!'

एकदम तोफेला बत्ती मिळाली. धडाड धड्ड्ड्ड्ड् ! अन् मग सटासट बंदुकीच्या फैरी झडू लागल्या. तोफांची सरबत्ती सुरू झाली. खालूनही तोफा-बंदुकांचा धडाका सुरू झाला अन् वरून झालेला मारा अचूक ठरला. विजापुरी फौज जितकी पुढे सरकली होती त्याच्या दहापट मागे हटली. तोफा गडगडत माघारी गेल्या. एका विशिष्ट टप्प्याच्या पुढे जौहरच्या फौजेला जाता येईना. लक्ष्मणरेषा ! जरा कुणाची पाउले पुढे पडली की, उडालीच गडावरून तोफ ! सूं सूं करीत सुटलीच गोळी ! मावळे अत्यंत सावध अन् जय्यत होते.

रात्र झाली. जौहरने पुन्हा एकवार चढाईचे हुकूम दिले. जौहरच्या मशालींचे ठिपके टप्प्यात येताच, गडावरून आग बरसली.

जौहरने वेढा अगदी अव्वळ घातला. पावसाची चिन्हे वाढू लागली. थबथबून भरलेल्या मद्याच्या पोवळ्यासारखे काळे ढग आकाशात भटकत होते.

जौहरचे अन् फाजलचे बळ रोज वाढत होते. त्यांच्या फौजेत रोज नव्याने भर पडत होती. शृंगारपूरचा जागीरदार सूर्यराव दळवी फौजेसह गडाच्या पायथ्याशी जौहरच्या फौजेत येऊन दाखल झाला. दोन दिवसांनी वाडीचे सावंतही येऊन दाखल झाले. नंतर एके दिवशी पालीचा जागीरदार जसवंतराव हाही आला.

मराठ्यांनी मात्र कटाक्ष ठेविला होता की, जौहरच्या लोकांना गोळीच्या टप्प्याच्या आत येऊ द्यायचे नाही. जौहरच्या तोफांचे गोळे तटापर्यंत पोहोचू शकेनात. पुढे सरकून मारा करणे अशक्य. शिवाजी

कंटाळून किंवा उपासमार होऊन शरण येईपर्यंत वेढा ठेवणे भाग होते. जौहरची अन् फाजलची धडपड अर्थात् सतत चालू होतीच. शिवाजी लौकर कब्जात येणार, याविषयी मात्र कोणालाही तिळमात्र शंका नव्हती, कारण तिकडे तो शाहिस्ताखानही नगरला येऊन दाखल झाला होता.

सिद्दीच्या डोक्यात आणखी एक युक्ती आली. त्याने चारशे स्वारांची एक तुकडी आपल्या एका वकिलाबरोबर देऊन व आपली खास पत्रे देऊन राजापूरच्या इंग्रज वखारवाल्याकडे रवाना केली. पत्रात त्याने लांब पल्ल्याच्या भारी तोफा व दारूगोळा घेऊन आपल्या कुमकेस येण्याविषयी अत्यंत आग्रहपूर्वक लिहिले. त्याने इंग्रज टोपीकरास असे आश्वासन भरघोस शब्दात दिले होते की, तुम्ही कुमक केल्यास, आमचा दरबार तुम्हास सर्व सवलतीही देईल, तसेच तुम्ही आणाल त्या तोफांचा, दारूगोळ्याचा व तुमचा सर्व खर्च भरमाप दिला जाईल. तुमचे गोलंदाजही यावेत, मग तर बहार होईल. शिवाजी आताच निम्मा जेर झाला आहे. तुमच्या पल्लेदार तोफांसह तुम्ही येऊन मारा सुरू करताच शिवाजी पाखरासारखा तडफडत आपल्या पायाशी येऊन पडेल, तरी त्वरेने यावे.

जौहरची फौज इंग्रजांकडे निघाली. सह्याद्री ओलांडून कोकणात उतरली आणि राजापुरात दाखल झाली. ह्या वेळी राजापूर विजापूरकरांच्याच ताब्यात होते. इंग्रज राजकारणापासून अलिप्त राहून, केवळ व्यापार-धंदा करणारे निरुपद्रवी वाणी होते. फार सज्जन ! फार भोळे ! आपण बरे आपली तागडी बरी ! आता दारूगोळा अन् तोफा-बंदुका ठेवीत ते केवळ त्यांच्या वखारीच्या संरक्षणाकरिता ! एरवी त्या बिचाऱ्यांना दारूगोळा करायचाय् काय !—इतके डाकू लोक जगात कुठ्ठं सापडायचे नाहीत. महालबाड हे इंग्रज ! दिसायला गोरेगोमटे अन् अति साळसूद, पण असे बदमाष की, ज्याचे नाव ते ! तागडी तोलता तोलता सदैव तिरक्या नजरेने त्यांचे लक्ष प्रत्येक राजकीय उलाढालीवर असायचेच. आता तर गिऱ्हाईक घरी चालून आले !

जौहरचा वकील वखारीत गेला. तेथील इंग्रज अधिकारी हेन्री रीव्हिंग्टन हा लगेच सामोरा आला. मोठ्या आदबीने वकिलास त्याने आतल्या हॉलमध्ये नेले.

दुभाष्याच्या मार्फत बोलणी सुरू झाली. जौहरचे पत्र वाचून दाखविण्यात आले. इंग्रजांच्या तोंडाला पाणी सुटले. दीड महिन्यापूर्वी

महाराजांपुढे नाक घासून आपण काय करार कबूल केला हे पक्के लक्षात असूनही हेन्री रीव्हिंग्टनने जौहरच्या वकिलाच्या म्हणण्याला एकदम मान्यता दिली ! जौहर–फाजलच्या अन् शाहिस्ताखानाच्या फौजेच्या लोंढयाखाली शिवाजी अन् त्याचे राज्य साफ वाहून जाईल, प्रतेसुद्धा धडपणी ह्या मराठयांच्या हाती लागणार नाहीत अशी हेन्रीची खात्री झाली. ह्या वेळी शिवाजीच्या शत्रूला प्रत्यक्ष मदत करणे हेच शहाणपणाचे अन् फायद्याचे आहे हे त्याला पुरेपूर दिसून आले आणि त्याने लगेच मान्यता दिली. सुरतेच्या गव्हर्नरची परवानगी घेण्याचीही त्याला जरूर वाटली नाही. ह्या शिवाजीच्या सासुरवासातून केव्हा सुटू, असे इंग्रजांना झाले होते. हेन्रीला अन् इतर इंग्रजांना महाराजांच्या तिखट जागरूकतेमुळे थोडेही चवचाल राजकीय चाळे करायला मिळेनात. आता बरी आली संधी ! हेन्री नेहमी म्हणायचा की, आम्हाला शिवाजी बायकोसारखे वागवितो ! ह्या नव्या निमंत्रणामुळे साहेबमंडळी खूष झाली. चला पन्हाळयाला ! अरे पण शिवाजी काय म्हणेल ? उडत गेला शिवाजी ! दुसऱ्या दिवशी हेन्री रीव्हिंग्टनने लगेच वखारीत ऑर्डर्स सोडल्या. गीफर्ड, वेलची, मींगहॅम वगैरे ऑफिसर्स निघण्याच्या तयारीला लागले. उत्कृष्ट गोलंदाजांचे एक प्लॅटून तयार झाले. दांडगा उत्साह भरला. स्वत: हेन्रीने युनिफॉर्म चढविला. हातात ग्लोव्हज् चढविले. दारूगोळयाच्या व सामानसुमानाच्या गाडया तयार झाल्या. एक प्रचंड तोफ घोडे जोडून तयार केली. प्रत्येक इंग्रजाच्या हाती पल्लेदार बंदूक होती.

ट्रम्पेट वाजली. फॉल्इन् होऊन बंदुका खांद्यावर चढल्या. एका इंग्रजाहाती निशाण फडकत होते. युनियन जॅक ! जौहरचे आलेले स्वारही निघण्याच्या तयारीने उभे राहून, साहेबाचा थाट पाहात होते. हेन्रीने वखारीचा चार्ज दुसऱ्या ऑफिसरला दिला आणि आपल्या प्लॅटूनला ऑर्डर दिली, " प्लॅटून ! क्विक् मार्च ! "

टर्‌ र्‌ र्‌ र्‌ र्‌ ढम् ! ड्रम्स् वाजू लागले. त्या तालावर खाड् खाड् बूट वाजवीत आघाडीला युनियन जॅक फडकावीत इंग्रज तुकडी निघाली. मागोमाग तोफा, दारूगोळा अन् जौहरचे स्वार. पन्हाळयाकडे–रायपाटण, अणस्कुरा या घाटाने–पन्हाळयाकडे जाण्याचा मार्ग हेन्रीने मुकर्रर केला होता.

तिकडे नेताजीस खबर मिळाली की, महाराज पन्हाळ्यात अडकून पडले. गडाला वेढा इतका कडक आहे की, मुंगी फिरकणे अशक्य झाले आहे. पुणे प्रांतात शाहिस्तेखान घुसला आहे.

नेताजीजवळ फक्त पाच हजार फौज होती. महाराजांच्या स्थितीची त्याला पुरेपूर कल्पना आली. आता परस्पर पन्हाळ्याचा वेढा फोडण्यास जाण्यापूर्वी खुद्द विजापुरावर चाल करावी म्हणजे बादशहा गडबडेल व स्वसंरक्षणाकरिता जौहर किंवा फाजल यांपैकी कोणासतरी मदतीस नक्की बोलावील अन् पन्हाळ्याचा वेढा ढिला पडेल, असा नेताजीने विचार केला.

गदगहून नेताजीने कूच केले. विजापूरच्या अगदी नजीक असलेल्या शहापुरावर त्याने रात्रीच्या वेळी आकस्मिक धाड घातली. शहापूर गाढ झोपेत होते. रावणाच्या अशोकवनाची अन् लंकेची जी दैना उडाली, तीच शहापूरची उडाली, जाळून-लुटून साफ केले. नेताजीचा धुमाकूळ विजापुरात ताबडतोब समजला. विजापूरची घाबरगुंडी उडाली. नेताजीने शहापुरात मुल्ला महमद, बाबुलखान व अजाप्पा नाईक यांचा जबर पराभव केला. हे सगळे पळून विजापुरास गेले. खुद्द बादशहा अतिशय घाबरला. ह्या वेळी शहरात बादशहाच्या हिफाजतीसाठी पाच हजार फौज होती. बादशहाने घाबऱ्या घाबऱ्या ह्या फौजेसह खवासखानास नेताजीवर रवाना केले. खवासखान निघाला. आता अगदी गळ्याशी भिडले होते. जर आपण नेताजीला पिटाळले नाही, तर नेताजी–सैतानच तो–विजापुरात घुसेल आणि बादशहाचीच उचलतंगडी करून त्याला घेऊन गेला तर राहिले काय ? आटपलाच कारभार !

खवासखानाचे लोकही चिडून निघाले. नेताजी विजापुराकडे निघाला, पण वाटेतच खवासखानाने त्याला गाठले ! भयंकर रणकंदन सुरू झाले. खवासखानाच्या फौजेत गोवळकोंड्याचीही फौज सामील झाली होती. उभय पक्षांनी पराक्रम कमालीचा चालविला होता, पण नेताजीला पाऊलभरही पुढे सरकता येईना. विजापूरची फौज जिवाच्या पणाने लढत होती. शिवाय ती ताज्या दमाची होती. नेताजीला शिकस्त करूनही पुढे जाता येईना. त्याचे खूप लोक पडले. अखेर नेताजीला माघार घ्यावी लागली. त्याचा मोड झाला नाही, पण पुढेच जाण्याचा हट्ट धरला, तर साफ मोड होण्याची शक्यता मात्र होती. म्हणून नेताजीने माघार घेतली.

नेताजी तीन कोस माघार घेऊन थांबला. खवासखानाने त्याचा पाठलाग केला नाही. तो झाले एवढयावरच खूष होता. आता पुन्हा विजापुरावर चालून न जाता, नेताजी तेथून परत फिरला. कारण त्याची फौज अत्यंत दमलेली होती. बरीच कमीही झाली होती व नवी कुमक येणे शक्य नव्हते. शाहिस्ताखानाने पुणे प्रांतात काय गोंधळ चालविला आहे, हीही एक काळजी होतीच. आता प्रथम राजगडावर जाऊन, आईसाहेबांस भेटून, त्यांच्याच सल्ल्याने पुढचा बेत करावा, असे त्याने ठरविले. तो राजगडास जाण्यासाठी निघाला. विजापुरास शह देऊन पन्हाळयाचा वेढा ढिला करण्याचा त्याचा बेत साफ फसला. या गोष्टीचे त्याला फार वाईट वाटले. या वेळी जर पंधरा–वीस हजार फौज नेताजी-जवळ असती, तर विजापूरच्या तख्ताच्या ठिकऱ्या करून त्या उधळीतच तो महाराजांकडे आला असता, पण एवढी फौज सबंध स्वराज्यात मिळूनसुद्धा नव्हती.

—काळयाकुट्ट ढगांची आकाशात दाटी उडून गेली होती. पन्हा-ळयाच्या वेढयातही जौहरच्या फौजेची दाटी झाली होती. हजारो हात काम करीत होते. हजारो डोळे पहारा करीत होते.

एक दिवस ड्रम्सच्या तालावर इंग्रज टोपीकरांची गोलंदाजांची तुकडी हेन्री रीव्हिग्टनसह कोल्हापुरात येऊन दाखल झाली. जौहरने व फाजलने मोठया उत्साहाने अन् थाटात हेन्रीचे स्वागत केले. नवीनच उत्साहाची ऊर्मी वेढयांत पसरली. आता नवा मारा गडावर करून गडच जिंकू ! वारुळातून नाग बाहेर येण्याची वाट पाहण्यापेक्षा वारूळच फोडून नाग पकडू अशी उमेद सर्वांस आली.

इंग्रजांकरिता स्वतंत्र शामियाने, नोकर-चाकर अन् सामाना-सुमानाची खास व्यवस्था जौहरने केली. चार घटकांनी जौहर, फाजलखान, रुस्तुमेजमान् व हेन्री, गीफर्ड वगैरे सर्व इंग्रज मोर्च्यांच्या पाहाणीसाठी निघाले. दुर्बिणी लावून इंग्रज गडाची ढगाला टेकलेली तटबंदी टेहळू लागले. खूप तपासणी करून, हेन्रीने आपली तोफ डागण्याकरिता जागा मुकर्रर केली. जागा चढावर होती. फाजलखानाने ती तोफ आणण्याचा हुकूम दिला. लगेच पन्नास-पाऊणशे लोकांनी ती प्रचंड तोफ ओढीत-रेटीत तेथे आणली. हेन्री, मिगहॅम, गीफर्ड, वेलजी वगैरे इंग्रजांनी

तटावर अचूक अंदाज साधून तोफ उभी केली. जौहर, फाजल, रुस्तु-मेजमान् वगैरे मंडळीही मोठ्या उत्सुकतेने उभी होती. आपण काय करीत आहोत हे इंग्रजांच्या डोक्यातही येत नव्हते. दोन-अडीच महिन्यांपूर्वी महाराजांना त्यांनी वचन देऊन करार केला होता आणि आज अशी हरामखोरी करतांना त्यांना काहीच दिक्कत वाटत नव्हती. बेफिकीर बनले होते. आता शिवाजी नामशेष होणार, ही त्यांना मुस्तकीम खात्री वाटत होती.

तोफेत दारू ठासण्यास सुरुवात झाली. हेन्री रीव्हिग्टनने आपले युनियन जॅक तोफेशेजारी उंच फडकावले. उघड उघड निशाण लावून इंग्रजांनी महाराजांपाशी वैर जाहीर केले ! विस्तवाशी वैर ! इंग्रज बेभान झाले.

ढग गडगडत होते. विजा कडाडत होत्या. पन्हाळ्याच्या दऱ्या-खोऱ्यातली झाडेझुडपे घो घो वाऱ्यानें लवत होती. पालापाचोळा आकाशात भिरभिरत होता. पन्हाळ्याच्या तटातटावरून गस्तीच्या आरोळ्या घालीत हिंडणाऱ्या मराठी हशमांच्या आरोळ्या वाऱ्यामुळे हवेतच भिरकावल्या जात होत्या. महाराज चिंतेत गढून गेले होते. सर्व दिशांनी वावटळ उठली होती. महालांचे पडदे फडाडत होते. बैठकीवरचे रुजामे, चादरी, जाजमे उडत होती. महाराजांची चिंताक्रांत शतपावली चालू होती.

गडाखाली इंग्रजांनी तोफ ठासून तयार केली. जौहर अन् मसूद मिशात हसत होते. फाजलखान दांत खात गडाकडे पाहात होता. आता तोफेला बत्ती द्यायची. जौहरने दोन्ही हाताच्या मुठी वळून हात उंच केले अन् तो मोठ्यानें ओरडला, " या अली ऽऽ ! खुदा मदद ! खुदा मदद ! "

हेन्री रीव्हिग्टनने तोफेला बत्ती दिली ! धडाड धड्ड्डड्ड्ड् ! केवढा प्रचंड आवाज उठला ! धुराचा लोट उसळला. तटाच्या रोखानें जाऊन गोळा आदळला ! कानठळ्या बसल्या !

महाराज एकदम दचकले ! केवढा प्रचंड आवाज ! दऱ्याखोऱ्यात उठलेले प्रतिध्वनीही प्रचंड होते. गडावरचे सगळेच दचकले. महाराज ताबडतोब तटाकडे निघाले. गंगाधरपंत व त्र्यंबकपंत किल्लेदार बरोबर होतेच. झप्झप् पावले टाकीत महाराज तटावर आले. उडालेल्या तोफेच्या

धुराचा लोट अजून विरला नव्हता. महाराजांची नजर तोफेच्या मोर्च्यावर गेली. तेथे फडकणारे युनियन जॅक अन् विलायती पोशाखातले पाचपंचवीस माणसे महाराजांस दिसली! आग! महाराजांच्या डोळ्यात आग उसळली! भिवया चढल्या. दाताखाली ओठ सापडले. एक पाय तटाच्या भिंतीवर अन् हाताच्या मुठी कमरेवर ठेवून ते संतापाने तिकडे पाहात होते. खाली युनियन जॅक फडकत होते. एवढ्यात गंगाधरपंत बोलले, " महाराज! इंग्रज! राजापूरचे हे वखारवाले टोपीकर दिसतात! दीड महिन्यापूर्वी ह्यांनीच आपल्याला लेखी वचन दिलं होत की—! "

" हरामखोर–बेवकूफ औलाद! ही दगलबाजी आमच्याशी?–" महाराज कडाडले.

" महाराज! हजारो रुपयांची मालमत्ता परत दिली आपण यांची! यांच्या पकडलेल्या टोपीवाल्यांना शिरसलामत सोडून दिलं. त्याची ही फेड!" गंगाधरपंत एवढे म्हणतात तोच इंग्रजी तोफेतून दुसरा गोळा सुटला!

" गाईच्या आचळाला चिकटलेले गोचीड रक्तच पितात! दूध आवडत नाही त्यांना!" महाराज म्हणाले. इंग्रजांवर ते फारच क्रुद्ध झाले.

धुराचा लोट वर वर चढत होता.

" पंत! " महाराज त्र्यंबकपंत किल्लेदारास म्हणाले, " ह्या बाजूची जास्त कदर ठेवा! करोल हशम ठेवून जागती गस्त ठेवा! तट कोसळला, तरी जोहरचा एकही प्यादा वर सरकता कामा नये! "

" हुकूम महाराज! " त्र्यंबकपंताने मुजरा केला. महाराज लगेच तेथून निघून गेले. त्यांच्या डोक्यात काळजीने काहूर केले होते.

इंग्रजांचा तोफखाना सतत गर्जत होता. वरूनही मराठे बंदुकांनी गडाच्या चारही बाजूंनी खाली मारगिरी करीत होते. तोफाही सुटत होत्या. खाली जोहरने अन् फाजलने जबरदस्त नाकेबंदी केली होती.

कोंडून पडल्यामुळे महाराजांची उलघाल होत होती. त्यातच इंग्रजांच्या हरामखोरीमुळे उडालेला कोप.

# शाहिस्ताखान

अमीर उल् उमरा! शहेनशहा अलमगीरची दुसरी प्रतिमाच दख्खनचा काफिरी पुंडावा नेस्तनाबूद करण्याचे फर्मान शाहिस्ताखानाच्या हाती पडताच तो निघाला. अठ्याहत्तर हजार स्वार अन् शिवाय अफाट बख्सारी पायदळ, शेकडो तोफा, हत्ती, उंट अन् काय नाही?—सर्व काही पसारा घेऊन तो निघाला. तो स्वतः शूर होता. अनुभवी होता. त्याची जरब जबर होती. त्याने आणलेल्या फौजेत कझाकी, पठाणी, बलुची, बख्सारी, अरबी मोगली, राजपुती, बुंदेली, वगैरे अत्यंत नामांकित लढाऊ अन् धिप्पाड लोक होते.

त्याने बरोबर आणलेले सरदारही गाजलेले होते. समसखान पठाण, नामदारखान, ग्यासुद्दीनखान, हसनमुनीम, सुलतान मिर्झा, तुरूकताजखान, कुबाहतखान, हौदखान, इमाम बिरुदीखान, लोदीखान, दिलावर मौलद, अब्दुल बेग, जौहरखान, खोजा सुलतान, सिद्दी फत्तेखान, फत्तेजंग, कारतलबखान, गाझीखान, मनचेहर, भावसिंग, किशोरसिंह, शामसिंह, राजा गिरीधर मनोहर, प्रद्युम्नसिंह, अनिरुद्धसिंह, पुरुषोत्तमसिंह, गोवर्धन गौड, राजा राजसिंह, बीरमदेव, रामसिंह, रायसिंह, अमरसिंह, अरिंदम, द्वारकाजी हे आणि इतर कित्येक सरदार त्यात होते. ह्या सरदारांत खोजा भंगड ह्या नावाचाही एक सरदार होता! काय नाव आहे! भंगड!

खान अहमदनगरास येऊन दाखल झाला. महाराजांस विरोध करणारे अनेक मराठे खानास सामील होऊ लागले. ह्यात सुरजी गायकवाड, दिनकरराव काकडे, खंडागळे बंधु, रंभाजी पवार, सर्जेराव घाटगे, कमळाजी गाडे, जसवंतराव कोकाटे, कमळोजी कोकाटे वगैरे, आम्ही अस्सल नेकजातीचे मराठे म्हणून स्वतःला म्हणवून घेऊन उठल्यासुटल्या मिशांना पीळ घालणारे बहाद्दर होते. इतकेच काय, माहूरच्या उदाराम देशमुखाची विधवा बायकोसुद्धा पदर बांधून शाहिस्तेखानास सामील झाली होती. पतीच्या मृत्यूनंतर तुळशीची पूजा करीत महाराजांस औक्ष चिंतीत पुण्य करण्याऐवजी तलवार कमरेला बांधून ही

बाई खानास सामील झाली. बाईची जात असून तलवार हाती घेतली म्हणून हिचे कौतुक करावे की, स्वराज्याची वैरीण म्हणून शिव्याशाप द्यावेत ? ही खरोखर वाघिणीसारखी शूर होती. औरंगजेबाने म्हणूनच हिला किताब दिला होता—रायबागन! रायबागन म्हणजे राजव्याघ्री!

त्र्यंबकराव भोसले अन् बाबाजी भोसले ही तर खास भोसल्यांच्या रक्ताची औरस औलाद, पण तेही खानास सामील. महाराजांस मारून सुतक धरायला का इतके आतुर झाले होते देव जाणे ! दत्ताजी जाधवराव अन् रुस्तुमराव जाधवराव ही तर महाराजांच्या आजोळची माणसे. आपल्या भाच्याचे कौतुक करायचे सोडून भाच्याचा अन् बाहुणीचा निःपात करायला उठले होते हे कंस ! यादवांच्या घराण्यातच कंस उपजावेत ना ! मराठ्यांचे राज्य स्थापण्याकरिता जिवाचे रान करणाऱ्या महाराजांना मराठ्यांचीच औलाद प्राणपणाने विरोध करीत होती. आमच्याच जातकुळीच्या, आमच्याच रक्ताच्या, आमच्याच नात्यागोत्याच्या माणसांचा स्वराज्याला विरोध, स्वदेशाला विरोध ! मराठ्यांचे सिंहासन येथे निर्माण होताच कामा नये हा यांचा हट्ट ! शिवाजीचा नाशच झाला पाहिजे हा यांचा आग्रह ! शिव शिव ! काय हे आमचे आत्मघातकी जिणे ! अशा ह्या जिवाणूंना कसा प्रकाश दिसणार ! नाहीच दिसणार. कसा दिसेल ? जन्माला येतानाच हट्टाने परमेश्वराजवळ घुबडाचे डोळे अन् गिधाडांची काळिजे मागून जन्माला आले हे ! कसा दिसणार प्रकाश ह्यांना अन् अशांना ? सूर्य उगवला तरीही हे असेच डोळे मिटून स्वकीयांविरुद्ध अभद्र सुरात घुमत राहणार— घु घु उ घूं ऽऽ !

आईसाहेबांच्या मनाला घरे पडत होती. शिवबा पन्हाळ्यात अडकला. दाही दिशांनी वैऱ्यांनी रान उठवले, परके उठले, सगेसोयरेही उठले. गेली पंधरा वर्षे राबून उभ्या केलेल्या स्वराज्याच्या पिकात हे रानरेडे घुसले. रोज नवीन नवीन भयंकर बातम्या येत होत्या. पन्हाळ्याला शत्रूने वेढले होते, राजगडाला चिंतेने वेढले. आईसाहेबांच्या डोक्याला भेगा पडायची वेळ आली.

शाहिस्ताखान नगरहून निघाला. ( दि. २५–२–१६६० ) आणि पाचव्या दिवशी ( दि. २–३–१६६० ) भिवरा ओलांडून पुणे प्रांतात

शिरला. त्याने फारच भयंकर रूप धारण केले. वाटेत भेटणारे एकही मंदिर शिल्लक न ठेवण्याचा निर्धार केला. स्वराज्यातील जनता भीतीने व्याकुळ झाली. मूर्ती खडाखड फुटू लागल्या, जाळपोळीला ऊत आला, लुटालुटीमुळे दर्भाची काडीसुद्धा उरली नाही मेलेल्यांचे श्राद्ध करायला ! स्वराज्यातील कर्ती पुरुष-माणसे महाराजांच्या जिवाभोवती आपल्या देहाचा कोट करून उभी होती. त्यांच्या घरची भांडीकुंडी ठोकरीने उडवीत आणि घरे पेटवीत खान थैमान घालीत होता.

खानाने सोनवडी, सुपे, बारामती, इंदापूर, होळ वगैरे गावांची व परगण्यांची धुळधाण उडविली. तसाच पुढे तो नीरेच्या काठाकाठाने शिरवळाकडे गेला. त्याला दयामाया उरली नव्हती. हा मुलुख शिवाजीचा आहे, बस्स् ! मग तो बर्बाद केलाच पाहिजे, असे ठाम मत ठरवून तो वागत होता. असह्य वेदनांनी पुणे प्रांत कण्हत होता आणि हे सारे खानाच्या फौजेबरोबर आलेल्या हजारो रजपुतांच्या देखत. खानाला सामील झालेल्या शहाण्णव कुळींच्या मराठ्यांच्या नजरे समोर ! त्यांना त्याचे थोडही दुःख होत नव्हते. यात काही वावगे घडते आहे, असेसुद्धा त्यांना वाटत नव्हते. पोरेबाळे उराशी धरून अब्रू बचावण्यासाठी किंकाळ्या फोडीत पळत सुटलेल्या मराठ्यांच्या लेकी-सुनांचे आवाज त्यांच्या बधिर कानांत शिरत नव्हते. जीव बचावण्याकरिता खरडत-रखडत धडपडणाऱ्या वृद्ध स्त्री-पुरुषांच्या लटलटत्या माना पाहून अन् केविलवाण्या विनवण्या ऐकून त्यांचे हृदय थोडेही द्रवत नव्हते. त्यांचे घोडे चौखूर दौडत होते. महाराजांच्या अन् आईसाहेबांच्या हृदयातील स्वराज्यस्थापनेची तळमळ त्यांना कशी कळावी ? देवद्रोही ! देशद्रोही ! धर्मद्रोही ! पापी-हरामखोर अस्तनीतले निखारे हे !

शाहिस्ताखान शिरवळाकडे येत असल्याची खबर राजगडावर आईसाहेबांस गेली. आता ही समुद्राची लाट थोपवायची तरी कोणत्या ढालीने ? राजगडावर फौज तरी कुठे होती एवढी ? तरीही होती ती शे-पांचशे त्यांनी खानावर छापे घालावयास पाठविली. खानाची फौज होती पाऊण लाख ! अन् आईसाहेबांची पाचशे !

आईसाहेबांनी मावळांतील जनतेची जपणूक शक्यतेवढी आधीपासून चालविली होती. देशावरून आलेला खान आता मावळात घुसेल हे लक्षात

घेऊन, त्यांनी ठिकठिकाणच्या देशमुख-देशपांड्यांस आज्ञापत्रे रवाना केली की, आपआपल्या भागांतील प्रजा, गुरे-ढोरे व दाणावैरण घेऊन डोंगर-दऱ्यात ताबडतोब निघून जा. त्याप्रमाणे मावळ-जनता त्यांनी घाई करून वाचविली.

खान शिरवळाहून कापूरवहाळास आला. तेथून राजगड, पुरंदर व सिंहगडाकडे जाण्याचा त्याचा प्रथम विचार होता, परंतु हे डोंगरी किल्ले घेणे पावसाळा तोंडावर असल्यामुळे त्याने रहित केले व तो आपली फौज घऊन, शिवापूर ते गराडे या मार्गावरील वारोडीच्या खिंडीतून म्हणजे गाडेखिंडीतून सासवडास निघाला.

फौज ह्या खिंडीतून जात होती. घंटा-घुंगरांच्या तालावर हत्ती-घोडे चालले होते. ह्याच डोंगरकपाऱ्यात राजगडाहून आलेली मराठी फौजेची टोळकी दबा धरून बसली होती. खानाच्या फौजेचा अजगर वळसे घेत घेत संथपणे खिंड चढत होता. इतक्यात मराठ्यांनी एकदम गनिमाच्या पिछाडीवर हल्ला केला. असंख्य माणसे सपासप उडविली. खानाच्या फौजेत कालवा झाला. बाकीची फौज मराठ्यावर धावली, तेव्हा मराठे डोंगरांत तुरुतुरु पळाले.

खान सासवडला आला. हे छापेबाजीचे तंत्र खानाच्या मागे कायमचेच लागले. खान सासवडला नऊ दिवस राहिला. सारे कऱ्हेपठार त्याने ताराज केले. खानाने मग प्रथम पुण्यास जाऊन पुढच्या हालचाली करण्याचे ठरविले.

सासवडहून खान निघाला. ( दि. १–५–१६६० ). सासवड ते पुणे फक्त दहा कोस आहे. खानसाहेबांस पुण्यास यावयास नऊ दिवस लागले ! खान पुण्यात दाखल झाला. ( ९–५–१६६० ) खानाची फौज पुण्यात शिरली. महाराजांचा पुण्यातील राहता वाडा लाल महाल त्याने ताब्यात घेतला.

मुठा नदीच्या काठावर औरसचौरस दीड कोस खानाची एक लाखाची छावणी पसरली. खुद्द खानसाहेब आपल्या सरदारांसह लाल महालाकडे निघाले. हाच तो शिवाजीचा खासा वाडा, असे समजल्यावर खानाची तबियत फारच खूष झाली. खानाचा आनंद घोड्यावरून हत्तीवर चढला.

खानाने लाल महालाचा उंबरा ओलांडून आत पाऊल टाकले. वाडा विटाळला! लहानपणी महाराजांच्या 'शुभं करीति'ने, आई-साहेबांच्या ओव्या-भूपाळ्यांनी अन् द्विजवरांच्या वेदमंत्रांनी निनादलेल्या वाड्यात, उन्मत्त चढाव करकर वाजवीत खान शिरला. बाल शिवबाचे महन्मंगल श्वासोच्छ्वास अजूनही ज्या महालात दरवळत होते, तेथे शराबी सुस्कारे अन् गुडगुडीच्या धुराचे भपकारे उमदळू लागले. खानाने सबंध वाडा पाहिला. ओटचा, ओसऱ्या, सदरा, हुंड्या-झुंबरांनी सजलेले महाल, चाफेखण, कोठ्या, गच्च्या, दारुणी महालाची जाळीदार दालने वगैरे पाहून खान खूष झाला.

"हमारा अलाहिदा शामियाना खडा करनेकी कुछ जरूरत नही! हम यहीं रहेंगे, यहीं रहेंग!" खानाने आपली मर्जी जाहीर केली.

लगेच नोकरपेशाची धावपळ सुरू झाली. झाडलोट आणि खानांच्या सामानासुमानाची आमदरफ्ती सुरू झाली. रुजमे, गालीचे भराभर उलगडू लागले. हंड्या-झुंबरे धुऊन-पुसुन लख्ख झाली. किनखापी अन् झिरझिरीत पडदे सुटले. कुलाशिलाच्या मराठ-मोळ्या लाल महालाचा रंगमहाल बनला. उगीचच मुरकत मुरकत चालणारे खोजे लाल महालात आले. मागोमाग खानाच्या जनान्याचे मेणे आले. लाल महाल भरला. भोवती मोंगली फौजेची छावणी पसरली.

—पन्हाळ्याचा वेढा आवळतच चालला होता. पखालीसारखे गच्च भरलेले ढग वाढत होते. जणू फक्त सुई टोचायचा अवकाश. एकदा पाऊस सुरू झाला की, ह्या धो धो मावळी पावसाला कंटाळून सिद्दी जौहर वेढा उठवून तरी जाईल किंवा निदान वेढा शिथिल तरी नक्कीच बनेल, असे महाराजांस वाटत होते. शितोडे येऊ लागले. पृथ्वीचा सुगंध घमघमू लागला. धो धो पाऊस सुरू झाला. जणू समुद्रच आकाशातून सांडू लागला. जौहरची फौज भिजली. तंबूत पाणी शिरले. पन्हाळ्याच्या डोंगरावरून पाण्याचे लोट खळाळू लागले. वाऱ्याने तंबू डोलू लागले. कित्येक तंबू मेखा उखडून उडत होते. फौजेची मोठी तारांबळ उडाली, तरी वेढ्यांतील लोक दाढ्या पिळीत आपआपली जागा धरून उभे होते. तोफांचे मोर्चे अन् वेढ्यांतील लोकांनी लावलेले बंदुकांचे मोर्चे अशा पावसात चालवणे अशक्यच होते, पण सिद्दी जौहरने त्याही अडचणीवर

तोंड काढली. दुसऱ्या दिवशी त्याने गवताची झापे उभी केली. खोपटी उभी केली. लोकांना निवाऱ्याला जागा तयार केल्या. पावसाचे पाणी तंबूत शिरणार नाही, अशी व्यवस्था केली. मुसळधार पावसामुळें वेढ्यात थोडासुद्धा ढिलेपणा जोहरने येऊ दिला नाही. त्याचा चिवटपणा जबर होता.

# आईसाहेब

राजगडावर आईसाहेबांना काही काही सुचत नव्हते. पन्हाळ्याचा फास आवळत चालला होता. शाहिस्ताखानाची लाट पुण्यात पोहोचली होती. नेताजीला विजापुरात घुसता न आल्यामुळे त्यानें माघार घेतली होती. नेताजी आता राजगडाकडे येत होता. चांगली बातमी कोणतीही नव्हती. नेताजी पन्हाळ्याचा वेढा फोडील ही आशा विफल झाली होती. आता होणार आहे तरी काय आपले हे समजेना. स्वराज्याची अन् शिवबाची एका घासात आहुती घेण्याकरिता काळ आ करून उभा होता. स्वराज्याचा हक्क सोडून मुकाट्याने दुष्मनाच्या स्वाधीन होण्याशिवाय दुसरा मार्गच उरला नव्हता.

आईसाहेब सदरेवर लोडाशी येऊन बसल्या. मुजरे करून त्यांचे खासगी कारभारी सहा-सात पावलावर नम्रतेने उभे राहिले. आई-साहेबांच्या दोन्ही भिवयांमध्ये दोन उभ्या आठ्या पडल्या होत्या. लांब लांब अंतरावर हुजरेपाजरे चिप्प उभे होते.

" नवी खबर काही ? " आईसाहेबांनी विचारले.

" जी ! पन्हाळ्याखाली इंग्रज टोपीकरांनी तोफा अन् बारुद-खाना आणून गनिमास पेश केला आहे. पुण्यात खानाने खास जातीने लाल महालात तळ दिला आहे. महाराजांस बाहेरून कुमक जाईल, तरच वेढा फुटणं शक्य आहे, पण हिमतीची सारी माणसे अडकून पडली.

सरनौबत हरले. आता नवीन कोणास पाठवावे, तर तशा तोलाचं—! "

" कोणीही नाही ? " एकदम कडक शब्दात आईसाहेबांनी विचारले.

कारभाऱ्यांच्या काळजात भीतीने जलद ठोके पडू लागले. आई-साहेब क्रुद्ध झाल्या होत्या.

" शिवबाला सोडवील असा कोणीही नाही ! – पंत ! " आई-साहेब ताडकन् उठल्या. " आम्ही निघणार ! आत्ताच्या आत्ता हुजूरातीच्या फौजेला हत्यारबंद होऊन हाजीर होण्याचा हुकूम करा ! आम्ही जातीनं निघणार ! " आईसाहेबांनी पदर आडवा खोचला.

" आईसाहेब ! " कारभारी दचकतबिचकत उद्गारला.

" पंत ! " एकदम डोळे वटारून आईसाहेब ओरडल्या—

" हुकुमाचे अर्थ कळतात तुम्हाला ? तावडतोब शिलेखान्यातून आमची हत्यारे आणवा ! " आईसाहेब म्हणाल्या.

आईसाहेबांचा आवेश विलक्षणच होता. आता त्यांच्यापुढे बोलायची कोणाची जुरत नव्हती. कारभारी मुकाट्याने मुजरा करून गेला. हुजऱ्यापाजऱ्यांना आईसाहेब भराभर हुकूम सोडीत होत्या.

कारभारी शिलेखान्यातून हत्यारे घेऊन आले. आईसाहेबांनी बांगड्या पुढे सारून मनगटावर पोलादी दस्ते चढविले, कमरेला शेला बांधून वर समशेर लटकाविली. शेल्यात कट्यार खोचली.

वाड्याबाहेर हुजुरात तयार झाली होती. आईसाहेबांनी पाठीवर ढाल बांधली. गडाच्या नगारखान्यात नौबत दणाणू लागली.

एवढ्यात गडाच्या पाली–दरवाज्यावर खालच्या मेटातून कर्ण्याची इशारत आली. तटा–बुरुजावरचे मावळे रोखरोखून खाली पाहू लागले. मराठी फौज गड चढून वर येत होती. आघाडीला भगवा झेंडा फडकत होता आणि मागोमाग नेताजी पालकराचा घोडा वर चढत होता.

" सरनौबत आले ! सरनौबत आले ! " दोन्ही तळहाताचा कर्णा करून खालच्या बुरुजावरचे लोक वरच्या बुरुजावरच्या लोकांस ओरडून सांगत होते. लगेच गडभर खबर पसरली.

गडाच्या फक्त दिंड्या उघड्या होत्या. मावळ्यांनी सबंध दरवाजा उघडला. गडावरच्या गडबडीत भर पडली.

नेताजी गडात प्रवेशला. त्याच्याबरोबर सिद्दी हिलाल हा शूर सरदारही होता. हा पूर्वी खळोजी भोसल्यांचा गुलाम होता. नंतर विजापूरदरबारच्या पदरी राहिला व आता स्वराज्याच्या सेवेत आपल्या पुत्रासह सामील होऊन नेताजीच्या बरोबरीने शत्रूशी झुंजत होता.

गडावर कूचाची गडबड पाहून नेताजी चमकलाच. आपण महाराजांस पन्हाळयातून सोडवू शकलो नाही, यामुळे तो शरमिंदा झालेला होता आणि आता खुद्द आईसाहेबच पन्हाळयास महाराजांची सुटका करण्यासाठी जात आहेत, असे त्याला समजले, तेव्हा तर त्याने एकदम घोड्यावरून उडी टाकली. तो शरमून गेला. आईसाहेबांपुढे जावे तरी कसे हे त्याला समजेना. पावले राजवाड्याकडे पडू लागली, पण त्याचे मन भीतीने अन् लज्जेनें जळत होते.

" आईसाहेब ! सरनौबत—! " कारभारी नम्र आवाजात म्हणाले.

खाली मान घालून अत्यंत अपराधी मनाने भीत भीत नेताजी एक एक पायरी चढत सदरमहालात येत होता.

" सरनौबत ? " अतिशय रागीट–तीक्ष्ण सुरात आईसाहेब उद्गारल्या. तिखट नजरेने त्या नेताजीकडे पाहात होत्या.

मुजरे करीत करीत नेताजी हळू हळू पुढे गेला. एकच निमिष त्याची नजरानजर आईसाहेबांशी झाली. दहा पावलावरच तो उभा राहिला.

" आपला राजा दुष्मनाच्या वेढ्यात कोंडला गेला असताना दुष्मनाला भिऊन पळून आलात तुम्ही ! शाबास, शाबास, शाबास तुमची ! तुम्ही स्वराज्याचे सरनौबत ! सरसेनापती ! समजली तुमची बहादुरी ! समशेरी लोहाराला का विकीत नाही या पेक्षा ? त्यानं त्यांच्या विळया केल्या, तर बायकांची तरी सोय होईल कांदे-मुळे चिरायला ! तुमचं मराठपण नामोहरम झालं ! आम्हीच जातो पन्हाळयावर जातीनं ! जौहरचा दिमाख तुमच्यापुढं ! आमच्यापुढं नाही ! जौहरचं मुंडकं तोडून माझ्या शिवबाला घेऊन येते मी ! पंत—! " आईसाहेब कोपल्या होत्या. स्वराज्याच्या सरसेनापतीची ही शोभा ! इतरांचा काय पाड ! नेताजीच्या कानात लोखंडाचा रस शिरत होता जसा.

" आईसाहेब ! मी पायाशी आलो ! नका कोप करू, कसूर झाली ! "

" शिववाचून आता एक क्षणही कठीण आहे ! दाही दिशा अरण्यासारख्या वाटताहेत ! मीच लढून सोडवून आणत्ये त्याला ! "

" आईसाहेब ! राग नका करू लेकरावर ! मी जातो असाच आता ! मी गनिमाला भिऊन नाही आलो. पुणे प्रांतावर शाहिस्ताखान मोगल लोटला म्हणून आपला हुकूम घ्यायाला आलो. आत्ता जातो पन्हाळ्यावर, फोडून काढतो जौहराचा वेढा ! आमच्या समशेरी कमनशिवाच्या न्हाईत ! महाराजान्‌ला फुलागत आणून ठिवतो तुमच्या उशाशी ! आई ! तुम्ही समशेर कमरेला बांधली म्हंजी आमची सोभा काय ऱ्हायली ? तुम्ही गडावरून हालायचं न्हाय ! आधी जोहार मारतो, मग येतो मोगलावर. हुकूम द्या ! येसवंत म्हना ! " मुजरे करीत नेताजी म्हणाला.

ØØØ

# नेताजी पालकर

नेताजी लगेच पन्हाळ्याकडे जाण्यास आल्यापावली निघाला, पण आईसाहेबांनी त्याला सक्त हुकूम केला की, आम्ही हुकूम केल्याशिवाय जायचे नाही. नेताजी अन् त्याचे सारे लष्कर फार दमून–थकून गेले होते हे आईसाहेब जाणत होत्या. म्हणूनच आईसाहेबांनी दोन दिवस पूर्ण विश्रांती घेऊन मगच त्याला हुकूम देण्याचे ठरविले. आईसाहेब सर्वांचीच आईसारखी काळजी करीत. त्या रागावल्या, तरी त्यातला अर्थ प्रत्येकाला समजत होता. आता आईसाहेबांच्या रागाचा मागमूसही उरला नव्हता.

पूर्ण विश्रांती घेऊन फौज ताजीतवानी झाल्यावर आईसाहेबांनी नेताजीस कूच करायला परवानगी दिली. नेताजीने आईसाहेबांच्या पायाला हात लावून मुजरा केला व निरोप घेतला.

नेताजी रायगडाहून पन्हाळगडाकडे निघाला. त्याने जाता जाता आकस्मिक वासोटा किल्ल्यावर झडप घातली. किल्लेदार आपल्या अदिलशाही परंपरेला धरून नेहमीप्रमाणे गाफील होता. एकाच बाणाने अचूक उडविलेल्या हिरव्यागार पोपटाच्या डोळ्याप्रमाणे वासोटा किल्ल्यावरच्या हिरव्यागार झेंड्यावरचा चाँदतारा अचूक उडाला! गडावर भगवा झेंडा लागला. नेताजीने गडाचा लगेच बंदोबस्त केला अन् त्वरेने तो पन्हाळ्याकडे दौडला. नेताजीच्या बरोबर त्याचा साथीदार सिद्दी हिलाल हाही होता. हिलालचा मुलगा 'वाहवाह' हाही नेताजीच्या फौजेत होता. वाटेल ते करून जौहरचा वेढा फोडून पन्हाळ्याची वाट मोकळी करण्याचा त्याने निर्धार केला होता.

महाराजांची पन्हाळ्यावर काळजीची शतपावली चालली होती. जौहरला अन् फाजलखानाला जोर चढला होता. पाऊस धो धो पडत होता. तरीही किल्ल्याभोवतीच्या वेढ्यात वीतभरही फट पडत नव्हती. पन्हाळ्याच्या डोंगरावर पाण्याचे मोठमोठे प्रवाह खळाळत होते. भोवतीचे ओढे-नाले भरून वाहत होते. सदैव गार गार अन् सोसाटयाचे वारे वाहात होते. वाहतुकीच्या वाटा गुडघाभर चिखलाने खचून गेल्या होत्या. ह्या सर्व अडचणींतूनही विजापुरी फौजेचा वेढा चालूच होता.

काय करावे हे महाराजांना समजेना. बाहेरची बातमी काहीही कळेना. शाहिस्ताखानाने काय चालवलंय्, आपल्या गडकिल्ल्याची हालहवाल काय आहे, आईसाहेबांची परिस्थिती काय आहे, नेताजी कुठ आहे हे समजत नव्हते. विचार, विचार आणि विचार! पंधरा वर्षांच्या कष्टांवर, हजारो मराठ्यांनी सांडलेल्या रक्तावर, आईसाहेबांच्या मानी महत्त्वाकांक्षेवर पाणी पडायची वेळ आली. महाराजांस काही सुचेना. गडावरचा प्रत्येकजण चिंतेत पडला होता. पण म्हणूनच की काय प्रत्येकाची महाराजांवरची निष्ठा वाढत होती. वेढा पडून तीन महिने होऊन गेले होते.

आणि एक दिवस जौहरच्या अन् फाजलच्या छावणीत गडबड उडाली. स्वारांची चिखलातून धावाधाव सुरू झाली. जौहर स्वतः आपल्या शामियान्याच्या बाहेर उभा राहून धावणाऱ्या लोकांस 'जल्दी, करो, जल्दी करो' म्हणून हुकूम देऊ लागला. त्याचे काही सरदार

दौडत होते. विजापुरी फौजेवर हल्ला आला होता अन् हा हल्ला होता खुद्द नेताजी पालकराचा.

जौहरला खबर लागताच त्याने आपली शिलकी फौज नेताजीवर पाठविली. जौहर फार वाकब्गार सेनापती होता. त्याने वेढा फोडण्याचा मराठ्यांचा डाव ओळखला. ह्या दंगलीची संधी साधून गडावरून कोणी उतरू नये. म्हणून त्याने वेढ्यातला एकही शिपाई हलविला नाही. उलट तोफा–बंदुका ठासून जय्यत राहण्याचे इशारे दिले. तो स्वतःसुद्धा गेला नाही. स्वतः वेढ्यात मोर्च्यावर फिरता राहिला. त्यामुळे वेढ्याचा विळखा नखभरही उलगडू शकला नाही.

लढाईची छुंद माजली. छावणीपासून लांबच विजापुरी फौजेने नेताजीला गाठले. नेताजी, सिद्दी हिलाल आणि हिलालचा मुलगा सिद्दी वाहवाह यांनी दात खाऊन विजापुरी फौजेवर चाल केली. वेढ्यापर्यंत नेताजीला येऊच न देता, लांब अंतरावरच अदिलशाही फौजेने नेताजीला आडवा अडसर घातला. वेढ्याला धक्काही लागला नाही. फक्त लढाईचा कल्लोळ वेढ्यात ऐकू येत होता. भयंकर लढाईस सुरुवात होऊन बंदुकांचा धडाका सुरू झाला.

गडावरून दूरवर हा संग्राम दिसत होता. गडावर आशेची कळी उमलली. आता हीच संधी वेढा फोडायला. महाराज मोठ्या उत्सुक नजरेने लढाई टेहळीत होते. मावळे तटातटांवरून खाली वेढ्यातील हालचाल न्याहाळीत होते, पण मोर्च्यात थोडीही चलबिचल दिसेना. सर्व मोर्चे तस्से कायम होते. इतकेच नव्हे तर, वेढ्यातून गडावर बंदुकांच्या फैरी झडू लागल्या. महाराजांस आशा वाटत होती की ही चालून आलेली आपली फौज वेढ्यापर्यंत येईल. वेढा विस्कटेल अन् ती संधी साधून आपणही खाली चालून जाऊ. महाराज मोठ्या आशेने पहात होते.

नेताजी आणि सिद्दी हिलाल अंगेजणीने अदिलशाही फौजेवर तुटून पडले. दोघांचीही जबरदस्त ताकद शत्रूची आघाडी फोडीत आत आत घुसत होती. एवढ्यात सिद्दी वाहवाहला एकदम जबरदस्त जखम झाली. तो घोड्यावरून किंकाळी फोडून खाली कोसळला. शत्रूने एकदम त्याला वेढले. वाहवाह बेशुद्ध झाला. सिद्दी हिलालच्या कानावर आपल्या

पोराची किंकाळी गेली. हिलालने लगाम खेचून मुलाला सोडविण्याकरिता धाव घेतली. त्याची समशेर पुत्रप्रेमाने तळमळून फिरू लागली, पण शत्रु अफाट होता. शत्रूच्या शिपायांनी जखमेमुळ बेशुद्ध होऊन पडलेल्या वाहवाहास फराफरा ओढीत नेले. रक्ताळलेले त्याचे शरीर दगडा–धोंडयांना ठेचकाळत होते. नेताजी शौर्याची कमाल करीत होता, पण अखेर घात झालाच. वाहवाहास ओढून नेलेले पाहताच सिद्दी हिलालची फौज घाबरून पळत सुटली. नेताजीचा अन् हिलालचा डाव फसला. शत्रूचा जोर जास्तच वाढला.

—आणि महाराजांनी दचकून डोळे विस्फारले ! सारी मराठी फौज पळत सुटलेली गडावरून दिसू लागली. अदिलशाही फौज भयंकर उन्मादाने गर्जत होती. हताश होऊन महाराजांनी मान गदगदा हलविली. बुरुजावरून ते निघून गेले.

नेताजीचा अन् हिलालचा सपशेल पराभव झाला. मराठ्यांचा अजिंक्य सरनौबत पळत सुटला ! दुर्दैवानेच स्वराज्याला वेढा घातला होता.

जौहरच्या अन् फाजलच्या फौजेत ह्या प्रचंड विजयाने भलतीच रग चढली. आता शिवाजी हमखास काबीज होणार, ह्या आनंदाने जो तो बेहोष हसत होता फाजल सुद्धा.

# सिद्दी जौहरच्या शामियान्यात

– पन्हाळा हिरवागार पडला होता. अजगराचा विळखा भोवती होता. मध्यरात्र उलटून गेली होती. आषाढाची शुद्ध चतुर्दशीची रात्र होती ती. पन्हाळ्याच्या वेढ्यातले अदिलशाही हशम डोळ्या तेल घालून जागे होते. आकाशात चंद्र होता, पण काळ्या ढगांआड झाकोळला होता. मशाली घेतलेले गस्तवाले वेढ्यांत फिरत होते. पावसाचे शितोडे येतच

होते. मशाली तडतडत होत्या. सिद्दीजोहर, फाजलखान आणि सर्वच सरदार आलटूनपालटून जातीने जागून वेढ्यांत फिरत होते.

गडावरची मराठी माणसेही पापणी लवू न देता जागी होती. महाराज साऱ्या रात्रभर विचारात गढले होते. बिछान्यावर पडल्यापडल्या त्यांचा अगदी न कळत डोळा लागला. धुराचे खूप खूप मोठे लोळ उसळले.

महाराजांना काहीतरी विलक्षण स्वप्न पडले. ते दचकून जागे झाले. पहाट झाली होती. गडावर पहाटेचा डंका वाजत होता.

स्वप्न अजून डोळ्यांपुढे तरळत होते. सूर्योदय झाला. ढगाआडच ! महाराजांनी आज आता अखेरचा निर्णय घेण्याचे ठरविले. वेढा उठण्याची अन् उठविण्याची आशा अन् प्रयत्न विफळ झाले होते. आता येथून पुढे गडात कोंडून राहाणे म्हणजे घात आहे. काहीही करून बाहेर पडलेच पाहिजे.

महाराजांनी त्र्यंबक सूर्याजी, गंगाधरपंत वगैरे आपल्या मंडळीस तांतडीने सदरेवर येण्यास निरोपांनी फर्मावले.

ही सर्व मंडळी गडावर कुठे ना कुठे कामात गर्क होती. हातची कामे टाकून सर्वजण महाराजांकडे त्वरेने आले.

महाराज सदरेवर लोडाशी टेकून बसले होते. सारेजण मुजरा करून महाराजांभोवती बसले. महाराजांची नजर दरवाजाकडे गेली. त्यांच्या मुखावर स्मित उमटले.

" या ! बाजी ! "

सदरेच्या दरवाजातून मुजरा करीत करीत एक व्यक्ती पुढे आली— सरदार बाजी प्रभु देशपांडे ! शेल्याच्या पट्टीखाली छाती दडली होती. छातीच्या आत कडकडीत निष्ठा दडली होती. म्यानात समशेर दडली होती. समशेरीत पराक्रम दडला होता. शिवशंकराच्या मंदिरात हात जोडताना जो भाव हृदयात असायचा, तोच भाव महाराजांस केलेल्या मुजऱ्यात दडला होता.

मुजरा करून बाजी सदरेवर महाराजांपुढे बसलेल्या मंडळीत बसला. महाराजांचा मनसुबा ऐकायला सर्वजण अत्यंत उत्सुक झाले होते. मसलत अत्यंत गुप्त होती.

दिनांक

## सिद्दी जौहरच्या शामियान्यात

मसलत सुरू झाली.

सूर्य ढगाआड वर वर सरकत होता. एक-दोन-तीन-चार घटका झाल्या.

आणि त्र्यंबकपंत किल्लेदारांच्या बरोबर गंगाधरपंत पत्राच्या थैलीचा गोंडेदार फासबंद आवळीत सदरमहालातून बाहेर पडले. दोघेही हळूहळू बोलत होते. त्या थैलीत खास महाराजांचे शिक्कामोर्तबीचे पत्र होते. पत्र सिद्दी जौहर आणि फाजलखान यांच्यासाठी होते. शरणागतीचे! सपशेल शरणागतीचे! आणि गंगाधरपंत ती पत्राची थैली घेऊन गडाखाली सिद्दी जौहरच्या अन् फाजलच्या भेटीस निघाले होते! महाराजांनी ते पत्र अन् नजराणे घेऊन गडाखाली जौहरच्या छावणीत जाऊन बोलणी करण्याकरिता गंगाधरपंतांची नियुक्ती केली होती.

त्र्यंबकपंत किल्लेदारांनी चार मातबर मराठी ढालाईत गंगाधरपंतांबरोबर दिले. पांढरी चादर अन जियाफतीची तबके दिली. गडावरचे लोकही कुतूहलाने बघत होते. किल्लेदार व गंगाधरपंत ढालाइतांसह गडाच्या दरवाजावर आले.

त्र्यंबकपंतांनी कड्या-कुलपे काढली. दरवाजा उघडला. पुरेपूर सव्वाशे दिवसांनंतर आज तो दरवाजा उघडला जात होता.

पंत गडाबाहेर पडले पांढऱ्याशुभ्र चादरीची दोन टोके उंच धरून एक ढालाईत पुढे निघाला. चादर वाऱ्यावर फडफडू लागली. शरणागतीची ही पांढरी फटक निशाणी होती. मागोमाग पंत व जियाफतीची तबके घेतलेले ढालाईत गड उतरू लागले.

गडाखालच्या वेढ्यांतील हशमांची नजर भिडली. ते टवकारून पाहू लागले. शरणागतीची सफेद चादर उडवीत चार-पाच मराठी माणसे गडाखाली उतरताना अस्पष्ट त्यांना दिसली. खात्री झाली त्यांची. हा हा म्हणता सगळ्या वेढ्यांत ही खबर पसरली. शरणागती! शिवाजीची शरणागती! बेहोष हास्याच्या लकेरी उठू लागल्या. चार महिने पावसात भिजत पडल्याचे आता चीज होणार हे दिसू लागले

जौहरला खबर गेली. तो अन् फाजल धावतच शामियान्याबाहेर आले. खूष! गडी बेहद्द खूष झाले! हे सारे जौहरच्या चिकाटीचे आणि श्रमाचे फळ बरे! —पण अजून पुरते पदरात पडायचय्.

पांढरी चादर फडकत असल्यामुळे पंतांवर कोणीही गोळी वा बाण सोडणे शक्य नव्हते. आता या येणाऱ्या लोकांशी काय काय बोलायचे अन् कसे कसे ठरवायचे वगैरे विचारांची गर्दी फाजलखानाच्या डोक्यात उडून गेली.

अर्ध्या–एक घटकेत गंगाधरपंत गडाच्या पायथ्याशी येऊन पोहोचले. वेढ्याच्या हद्दीवर पोहोचताच जौहरचे शिपाई आडवे आले. आपण गडावरून शिवाजीराजांच्या हुकुमाने बोलणी करण्याकरिता आलो आहो, असे पंतांनी सांगितले. शिपायांनी त्यांस तेथेच थांबवून जौहरला खबर दिली.

" आने दोऽऽ! " जौहरने मोठ्या रुबाबात फर्मावले.

जौहरला अन् फाजलखानाला आतून गोड गुदगुल्या होत होत्या. नवऱ्यामुलाच्या बापाच्या थाटात जौहर लोडाशी टेकला अन् फाजलखानाचा कुर्रा जावयाच्या वर !

पंत शामियान्याशी येऊन पोहोचले. जौहरची माणसे मोठ्या मिजाशीत पंतांकडे पाहात होती. पंत शामियान्यात प्रवेशले. जौहर अन् फाजलखान किनखापी मसनदीवर लोडाशी टेकून बसले होते. पंतांच्या चेहेऱ्यावर केवढी नम्रता दाटली होती ! मुलीचा बापच जणू ! पंतांनी दोघांनाही कुर्निसात केले.

" आयीए ! आयीए जनाबे अली ! " जौहरने पंतांना म्हणत म्हणत त्यांचे स्वागत केले.

पंतांनी लाचार स्मित केले आणि आणलेले नजराणे उभयतास पेश केले. मोठ्या अदबीने त्यांनी नंतर जौहरला पत्राची थैलीही पेश केली. जौहरने ती घेतली आणि पंतांस बसावयास परवानगी दिली.

" फारसनवीस ! " जौहरने पुकारले.

लगेच कुर्निसात करीत जौहरचा फारसनवीस आत आला. जौहरने ती थैली त्याच्या हाती वाचावयास दिली. त्याने वाचली.

महाराजांनी अत्यंत नम्रतेने लिहिले होते की, मी गडाखाली येऊन आपणास भेटावयास तयार आहे. आपण फार थोर आहात. आपणच माझी हिफाजत करावी. मी भयंकर गुन्हे केले आहेत ! विजापुरात नेऊन आपणच मला हजरते अली जिल्हे सुभानीच्या पवित्र

पायावर नेऊन घालावे! मी आजवर केलेल्या तकसिरीची माफी करण्याबद्दल आपणच शिफारस करावी! मला गुलाम करून माझी खिदमत आपणच शहेनशांच्या चरणी नमूद करावी! आपणच केवळ मायबाप आहात! मी गडाखाली येऊन रुमालाने हात बांधून आपल्यापुढे हाजिर होण्यास मुंतजीर आहे! वगैरे वगैरे इत्यादि इत्यादि!

अन् नंतर पंतांची गुळचट जीभ सुरू झाली. आपण फार सावधपणे बोलले पाहिजे, अशी जौहरास आतून टोचणी होती, कारण शिवाजी अतिशय लबाड आहे, तो केव्हा फसवील याचा नेम नाही वगैरे वगैरे उपदेशाचे पेले बादशहाने त्याला विजापुरात चिक्कार पाजले होते.

पण पंत अशा अदबीने अन् कळकळीने बोलत होते की, जणू अडलेला नारायणच! केवढी ती गरिबी! केवढी ती असहाय्यता! केवढी ती कळकळ! केवढी ती बादशाही तख्ताबद्दलची निष्ठा! अन् वकिली सारी महाराजांच्या हातून 'चुकून' घडलेल्या पंधरा वर्षांतील पापांची! खरोखर एखाद्याला वाटावे, अरेरे! शिवाजी किती साधाभोळा आहे! चुकून गैरसमजाने चुका घडल्या त्याच्या हातून! माफ करा बिचाऱ्याला!

जौहर सुद्धा पंतांच्या रिळाला हळूहळू गुंडाळला जात होता! पंतांची वकिली हळूहळू फत्ते होत चालली होती. जौहरने अन् फाजलने महाराजांवर आग पाखडून घेतली, तरी पंतांनी उलटा शब्द उच्चारला नाही. प्रत्येक गोष्ट कबूल करीत होते ते. पंत म्हणजे महा लबाड! अन् लबाड नाही तो वकील कसला? जौहरने अन् फाजलने एक निर्णय पक्का धरून ठेविला होता की, शिवाजीने बिनतक्रार आमच्या स्वाधीन झाले पाहिजे.

"सरकार! ही तर खुद्द शिवाराजांचीच आग्रहाची विनंती आहे की, आपण मला ताब्यात घेऊन विजापुरास चला! राजे रुमालाने हात बांधून आपल्या पायाशी नमूद आहेत!" पंत हात जोडून बोलत होते.

"हां! जल्द अज् जल्द! अभी के अभी!"

"हां मंजूर सरकार! राजे उद्या दुपारी गडाखाली येतील!"— फक्त एकाच दिवसाचा म्हणजे चोवीस तासांचा अवकाश! काय त्यात

विशेष ! चार महिने वेढा घातला, त्यात आणखी चोवीस तास ! अन् शिवाजी आणखी आठ दिवस नमलाच नसता तर— ? अन् एवढे कबूल केल्यावर आणखी काय पाहिजे ? अन् समजा शिवाजीने बोलल्याप्रमाणे न केले, तर आपला वेढा आहेच चालू ! जाईल कुठे तो ? बस्स ठरले !

" मंजूर ! कल आने दो ! लेकिन शिवाजी ये याद रख्खे के अगर वो अिस मुआहिदेके जराभी खिलाफ बर्ताव करेगा तो किसी किस्मका लीहाज न किया जायगा ! हमारे एक इशारेपर चालीस हजार फौज कुर्बान है ! तुम उसे हजार बार बतलाकार उसके गुनाहकी उसे याद दिलाव ! उसको सख्त ताकीद दे दो के वो मुसाहिदे मुताबिक पूरा पूरा अमल करे ! " जौहरने पुन्हा एकवार दम भरला.

" छे छे: ! हुजुर ! असं कसं होईल ! शिवाजीराजांची खात्री झाली आहे की, आपण दारूच्या कोठारावर उभे आहोत ! चुकतो माणूस ! आपल्या न्यायासनापुढे ते गुन्हेगारच आहेत ! पण राजांच्या अंतःकरणात दडलेली शाही तख्तावरची निष्ठा आपणाशिवाय कोणालाही दिसणे शक्य नाही ! न्याय आंधळा असतो ! पण, म्हणून न्यायमूर्तींनीही आंधळं बनावं का ? जिल्हे इलाहीची माफी आपण मिळवून द्याल, याच आशेवर राजे जगताहेत ! "

" मंजूर ! मंजूर ! हम उसकी इंतजारी कर रहे हैं ! " हसून जौहर म्हणाला.

पंत कुर्निसात करून निघाले. वेढ्यांतून जात असताना त्यांची नजर चौफेर भिरभिरत होती.

गडाचे दरवाजे उघडले अन् मिस्किल हास्य झाकीत पंत गडात प्रवेशले. पंत आल्याची खबर महाराजांस गेली.

—जौहरच्या वेढयांत, महाराजांचा वकील आल्यापासून खूपच चुळबुळ सुरू झाली होती. पंतांना परत गडावर जातांनाही सर्वांनी पाहिले होते. शिवाजीचे काय म्हणणे आहे अन् वकिलाच्या भेटीत काय काय ठरले हे समजून घ्यायला प्रत्येक हशम उत्सुक झाला होता. इंग्रज टोपीवाले तर सर्वांत जास्त. वेढ्यांत चर्चा चालल्या होत्या. प्रत्येकाचे कान नव्या बातमीकरिता ताणलेले होते. शिवाजी मगलूब होऊन गेला आहे, याबद्दल कोणालाच शंका उरली नव्हती. एवढ्यात हा हा म्हणता

सबंध चाळीस हजार फौजेत बातमी पसरली ! शिवाजी बिनशर्त शरण ! उद्या तो स्वतः गडाखाली येऊन हुजूरच्या ताबीन होणार ! गडाचाही कब्जा मिळणार ! संपली शिवाजीची जिद्दी ! एकदम सगळा वेढा आनंदाने वेडा झाला !

गेले चार महिने आधी कडक उन्हात अन् नंतर धो धो पावसात धडपडून ते सारे हैराण झाले होते. केव्हा एकदा शिवाजी सापडतोय् अन् केव्हा आपण परत जातोय् असे त्यांना झाले होते. महाराजांच्या शरणागतीने सारी फौज दुहेरी आनंदात बुडून गेली. सारे खूष झाले. जोहर अन् फाजलखानापासून ते पिकदाणी विसळणाऱ्या हुजऱ्यापर्यंत. अन् बेहोष कवाल्यांच्या रंगेल ताना भिरभिरू लागल्या ! अगदी नकळत वेढ्याचा पीळ ढिला होत चालला !

सूर्य काळ्या ढगांआड होता ! त्याची पावले तो टाकीतच होता !

गडावर खलबतखान्यात महाराज आणि भोवती खाशी मंडळी बसली होती. महाराज अत्यंत हळू आवाजात सर्वांस सर्व गोष्टी समजावून सांगत होते. प्रत्येकाच्या चेहेऱ्यावर निष्ठेचे विलक्षण भाव उमटलेले होते. त्यात गांभीर्य होते, काळजीही होती. कुतूहल होते, उत्सुकता होती, हिरिरी होती, आनंद होता. काही विलक्षण साहसाचा नवा डाव महाराज मांडीत होते. मोठीच धाडसाची गोष्ट होती. प्रत्येकाला तेच हवे होते. हौस धाडसाचीच. अगदी गुपचूप, अगदी काटेकोरपणे, अत्यंत सावधपणे, कमालीच्या चपळाईने, पराकाष्ठेच्या धारिष्टयाने गोष्ट पार पाडायची होती. उत्साह तर प्रत्येकाच्या नसानसातून उमलत होता. निष्ठा ? ती कशाला सांगायला हवी ? महाराजांकरिता आत्यंतिक शारीरिक कष्ट हसत हसत सोसण्याची हौस अन् महाराजांवर अत्यंत निष्ठा हेच तर महाराजांच्या मित्रांचे मुख्य लक्षण होते.

खाली जोहर अन् फाजलचे सारे हशम आज रात्री हमखास गाफील बनून राहाणार, याची महाराजांना खात्री होती. निदान त्याच आशेवर महाराजांनी पुढचे जिवावरचे धाडस करायचे योजले होते. प्रत्येकाच्या मनाची मोठी विलक्षण त्रेधा-तारांबळ उडाली होती.

"त्र्यंबकपंत ! तुम्ही गडावरच रहायचं ! गड तुमच्या ताब्यात ! गंगाधरपंत ! तुम्हीही पंतांच्याच दिमतीला राहायचं ! आणि गोदाजी !

तुम्ही आमच्याबरोबर यायचं!" महाराज एकेकाला काम सांगत होते. "वाघोजी, तुम्हीही आमच्या बरोबर यायचं! हिरोजी तुम्हीही! आणि—" महाराजांची नजर बाजीकडे वळली. बाजी आपला सारा जीव कानाडोळ्यांत आणून पुढे झुकला.

"बाजी! तुम्हीही आमच्याबरोबर यायचं!"

केवढा आनंद! बाजीचा चेहरा फुलला!

"महाराज! नाही म्हणाला असतांसा, तर हट्ट धरून बसलो असतो! एवढं जिवावरचं काम अन् मी नको संगतीला म्हणजे काय!"

महाराज त्याही चिंताक्रांत स्थितीत मायेने हसले. काय माणसे ही! ही माणसे महाराष्ट्राचाच संसार थाटण्यासाठी जन्माला आली. स्वतःच्या जिवाची यांना पर्वाच काय! ह्यांच्या एका हातावर तुळशीपत्रे उमलत होती अन् दुसऱ्या हातात निखारा फुलत होता आणि महाराजांना आपल्या मुक्या, निःशब्द प्रेमाने ती विचारीत होती, "महाराज! सांगा, यातलं संसारावर, घरादारावर काय ठेवू?"

धन्य धन्य महाराष्ट्र! धन्य महाराष्ट्राची जातकुळी!

—गडाखाली वेढ्यांत मजा चालली होती!

सूर्य मावळला. रात्र झाली. आकाशात वद्य प्रतिपदेचा चंद्र होता, पण काळ्या ढगांआड त्याचा मागमूसही लागत नव्हता. विजा चमकत होत्या. वीज चमकली की, एका निमिषात सारी सृष्टी लख्ख उजळून निघत होती. गडावर चाललेली मावळ्यांची लगबग, कामाकरिता चाललेली दहा-पाच घोडेस्वारांची धावपळ, तटावरची टेहळणी, अन् दरवाजावर चाललेली झेंड्याची फड्फड् झरकन् झळकून जाई, की लगेच पुन्हा अंधार. पहिल्यापेक्षाही दाट!

रात्री आपल्याबरोबर किती लोक घ्यायचे, हत्यारे अन् सामान काय घ्यायचे, केव्हा निघायचे, कसे निघायचे, कोणत्या बाजूने जायचे, कुणी कुणी काय करायचे, कोणकोणती काळजी घ्यायची, जर आयत्या वेळी काही गडबड उडाली, तर काय करायचे वगैरे सर्व गोष्टींचा खल खलबतखान्यात बसून महाराजांनी, बाजीने अन् इतर सौंगड्यांनी केला. रात्रीचा तो पहिला प्रहर होता. समईच्या मंद प्रकाशात ही मंडळी

महाराजांभोवती बसली होती. केवढे भयंकर धाडस आपण करणार आहोत, याची प्रत्येकाला कल्पना होती. प्रत्येकाचे चित्त अधांतरी धडधडत होते, पण भीतीने नाही—काळजीने !

## पावनखिंड

—त्र्यंबकपंत किल्लेदार सदर हवेलीतून घाईघाईने बाहेर पडले. त्यांच्याबरोबर दोन मावळे तुरुतुरु धावत होते. पंत त्यांच्याशी अगदी हलक्या आवाजात कुजबुजत होते. ते गडाच्या दरवाजाकडे चालले होते. मावळ्यांच्या अंगावर लंगोट्या, पागोटी, घोंगड्या अन् वहाणा या शिवाय काही म्हणता काही नव्हते. ढाली—तलवारी मात्र होत्या. दरवाजापाशी ते आले. पंतांनी कड्या—कुलपे काढून दरवाजाची दिंडी उघडली. टुणकन् उड्या मारून ते दोघे मावळे गडाबाहेर पडले आणि हा हा म्हणतात ते त्या अंधारात कुठे गडप झाले ते पंतांना समजलेही नाही.

ते दोघे मावळे सशासारखे धावत गड उतरत होते. वाट त्यांच्या इतकी पायाखालची होती की, ते थोडेही अडखळत नव्हते.

हे मावळे म्हणजे महाराजांनी शत्रूच्या वेढ्याची टेहळणी करण्याकरिता पाठविलेले अत्यंत विश्वासू हेर होते.

पायथा जसजसा जवळ येऊ लागला, तसे ते दोघे हळूहळू दबत दबत उतरू लागले. त्यांचे कान अगदी कमालीचे तिखट होते. चारी दिशांस पाहात पाहात ते पुढे पुढे जात होते. वेढ्यात गजबज फार नव्हती. लोक आज अगदी निर्धास्त आराम करीत होते. वेढ्याच्या कोणत्या भागातून निसटून जाणे सोईचे अन् कमी धोक्याचे आहे, हे त्यांना टेहळायचे होते. ते दोघे झाडाझुडपांआडून नागासारखे मानेचा फणा उंचावीत जागा टेहळीत होते. काही ठिकाणी चौक्या दाट होत्या.

काही ठिकाणी लोक राहुट्यांबाहेर बोलत बसले होते. काही ठिकाणी राहुट्या विरळ होत्या, पण वाट सोयीची नव्हती.

ते दोघेही डोळे ताणताणून अचूक अन् अगदी मनाजोगती वाट शोधीत होते. अखेर ते एका दरडीच्या आडून टेहळत असता, त्यांना जशी हवी तशी वाट विजेच्या लख्खकन् उजळलेल्या भागात दिसली. ते बराच वेळ थांबले. जास्तीतजास्त खात्री करून घेतली. ह्या बाजूस चौकीचे तंबू अन् मोर्च्यांच्या राहुट्या बऱ्याच होत्या. पण विरळ होत्या. उंच सखल अशी खडबडीत उतरण होती. गजबज फारच कमी होती. दोघेही कुजबुजत होते. ओठांतल्या ओठात. कमीतकमी धोक्याची हीच वाट, असे त्यांना दिसून आले.

गडावर पंत अन् महाराज आतुरतेने त्यांची वाट पाहात होते.

ह्या मावळ्या हेरांनी ती वाट ठरविली अन् पाऊलही वाजू न देता, ते फिरले. डोंगराच्या कुशीत घुसले अन् मग ताड् ताड् उड्या मारीत गडाकडे धावत सुटले. ही वाट त्यांनी पक्की ध्यानात धरली.

गडाच्या दरवाजावर खडा टक् टक् वाजला. पंतांनी दिंडी उघडली. हेरांनी गडात पाऊल घातले.

महाराज आणि बाजी वगैरे मंडळी वाट पाहात सदरेवर बसली होती.

पंत हेरांसह सदरेवर आले. महाराज उत्सुकतेने पुढे झुकले.

"ठरलं महाराज ! कौल उजवा आहे ! " पंत म्हणाले.

महाराजांना मावळ्या हेरांनी सारे समजावले.

"शाबास ! " महाराज उद्‌गारले, "लागा तयारीला !" महाराजांनी चुटकी वाजविली. सर्वजण उठले अन् खलबतखान्याबाहेरच्या अंधारात विलीन झाले.

मध्यरात्र झाली. काळोख मी म्हणत होता. आकाश ढग एकमेकांना दरडावीत धावत होते. सगळा गड जागा होता. लोकांची तयारीची घाईगर्दी चालली होती, पण अंधारात. मशाली न पेटविता गुपचूप. अगदी चोरासारखी.

गडाखाली विजापुरी फौजेला निद्रेने वेढा घातला होता. पहारेकरी गस्त घालीत फिरत होते. बसत होते. पेंगत होते. गेल्या चार महिन्यांचा

शीण आजच प्रत्येकजण न कळत कमी करीत होता. उद्या शिवाजी हाती येणार म्हणून अदिलशाही फौज गोड स्वप्न पाहात झोपली होती. हजारो लोक झोपले होते. हजारो डुलक्या घेत होते. इतक्या बेमालूमपणे ते गाफील झाले होते की, त्यांचे त्यांनाही ध्यानात येत नव्हते, येणे शक्यच नव्हते, आपल्या शामियान्यात सिद्दी जौहर, फाजलखान, सिद्दी मसूद वगैरे खाशी मंडळी मात्र जागी होती. गुडगुडीच्या धुराची वलये अन् हास्याचे फवारे उडत होते. गुडगुडीतल्या पाण्यावर बुडबुडे उठत होते अन् फुटत होते !

मध्यरात्र उलटली. गडावर सदरमहालाबाहेरच्या मैदानात पाचशे निवडक मावळे घोंगडया पांघरून भुतांसारखे बसले होते. सारे हत्यारबंद होते. अक्षर उमटत नव्हते. शिकणे नाही की खोकणे नाही. भुतंच ! पाय फक्त उलटे नव्हते !

आत सदरेवर महाराज निघण्याच्या तयारीत होते. भोवती त्यांचे सारे जिवलग होते. महाराजांनी जगदंबेचे साष्टांग दंडवत घालून दर्शन घेतले. सर्वांनी दंडवत घातले. समयांच्या प्रशांत प्रकाशात अंबा शांत उभी होती. महाराजांनी हात जोडले आणि म्हटले " आईसाहेब ! येतो आम्ही ! तुमच्या मर्जीशिवाय सारं व्यर्थ आहे ! मर्जी असू द्या ! "

महाराजांचा आवाज रुद्ध झाला. निघण्याकरिता ते वळले.

" त्र्यंबकपंत ! आम्ही निघालो ! यश देणार आई आहे. जिवावरचे धाडस आहे. जगदंबेचीच इच्छा दिसते की, संकटांच्या निखाऱ्यांतून आपलं हे स्वराज्याचं सोनं तावून सुलाखून निघावं. एकदा पोत पेटवून हाती घेतला. आता खाली ठेवणे नाही ! येतो ! गड सांभाळा ! "

" महाराज ! गडाची चिंता मनातही आणू नका ! एक पाऊलही पडू देत नाही पुढं गनीमाचं; पण महाराज, तुमच्या जिवाच्या काळजीनच आम्हा सर्वांचा जीव जळतोय् ! "

" वाघाचं जिणं हे असंच असतं ! स्वातंत्र्य हवं असेल, तर शिकाऱ्यांच्या गोळ्या खायचीही तयारी ठेवली पाहिजे ! आपण हे वाण घेतलं ! आपली शिकार झाली तरी चालेल, पण आपली कोणी दया करता कामा नये ! आपल्यावर कोणी प्रेम नाही केले तरी चालेल, पण आपली कोणी कीव करता कामा नये ! " महाराज एक एक पाऊल संथ टाकीत टाकीत बोलत होते.

" महाराज ! आम्ही काय सांगायचे ? पण देवा, जपा ! सारा जीव ह्या पायांशी घोटाळतोय् ! " गंगाधरपंत काळजीच्या पोटी बोलत होते, " महाराज ! मन मोठे वाईट असते ! पण जर फाजलखानाला चाहूल लागली, तर—! "

" फाजलखान ? त्याच्या ' बा 'ला घावलं नाही ते त्याला घावतंय होय ? मग आम्ही कशाला आहोत महाराजांसंगती ? " बाजी प्रभु म्हणाला.

महाराजांचे डोळे गहिंवरल्या नजरेने बाजीवर खिळले.

" जगदंब ! तुम्हा सर्वांसारखी सख्खी भावंडं आम्हाला लाभली ! जगदंबेची कृपा ! गनीमाची पर्वाच वाटत नाही आम्हाला ! "

महाराज सदरेच्या दरवाजात आले. पायऱ्यांच्या पायथ्याशी एक पालखी ठेवलेली होती. महाराज येताच सारे मावळे उठले. चार दणगट मावळे झटकन् मुजरा करीत पुढे झाले अन् पालखीपाशी उभे राहिले.

पन्हाळगडापासून विशाळगड वीस कोस होता. पायी जाण्याशिवाय गत्यंतर नव्हते. महाराजांना पालखीतूनच पळवीत पळवीत न्यायचे, असे बाजीने ठरविले होते. छाताडे फुटली तरी बेहत्तर, पण पालखी टेकवायची नाही. मावळे तर सारे हिरीरीने तयार होते.

महाराज सदरमहालाच्या दरवाजात उभे होते. महालाच्या आत असलेल्या दिव्यांच्या उजेडाच्या पार्श्वभूमीवर महाराजांची मूर्ती गडाच्या तटातटावर अंधारात पहारे करणाऱ्या मराठ्यांना दिसत होती. ते तेथूनच महाराजांना मुजरे करीत होते. प्रत्येकाला तळमळ लागली होती. महाराज निघाले आहेत, वळचणीच्या पालींनो, चुकचुकू नका !

मराठ्यांचा देव निघाला. गडावरचा प्रत्येकजण देवाला साकडे घालीत होता की, " परमेसरा ! महाराज निघाले, आता तूच बोट धरून घेऊन जा त्येस्नी ! पाय धरून मागने हाये बग ! "

महाराज पालखीत बसले. मावळ्यांनी पालखी उचलली.

" जय अंबिका ! " महाराज अलगद उद्गारले. पालखी निघाली. पालखीलगत उजव्या बाजूने बाजी चालला. मावळे मागोमाग निघाले. काही पुढे चालले. त्र्यंबकपंत किल्लेदार अन् गंगाधरपंत दरवाजापर्यंत पोहोचवावयास निघाले. दिवा नाही, दिवटी नाही, हिलाल नाही, मशाल नाही. अगदी मांजराच्या पावलांनी प्रत्येकजण चालला होता. विजा

चमकत होत्या व ढगांचा गडगडाट चालू होता. महाराज पालखीत गोंडा धरून बसले होते.

पालखी दरवाजाशी आली. त्र्यंबकपंतांनी दरवाजाची कुलपे-अडसर काढले. दरवाजा उघडला. मंडळी बाहेर पडू लागली. पालखी दरवाजातून बाहेर निघाली. त्र्यंबकपंतांनी व गंगाधरपंतांनी मुजरे केले. महाराजांनी हात वर केला. चैत्री पाडव्याला ( दि. २–३–१६६० ) महाराज गडावर आले होते, त्यानंतर आज आषाढ वद्य प्रतिपदेच्या रात्री ते गडाच्या दरवाजातून बाहेर पडत होते. पुरेपूर सव्वा चार महिन्यांनंतर. ( दि. १२–७–१६६० ).

दरवाजा बंद झाला.

नेहमीची वाट सोडून आडमार्गाने मंडळींनी उतरावयास सुरुवात केली. ते दोन मावळे हेर अगदी पुढे चालत होते. त्यांच्या मागोमाग बाकीचे किती गुपचूप, किती जपून, किती सावकाश अन् किती झपझप्. त्या गुडुप अंधारात डोळे फाडूनही काही दिसत नव्हते, पण ते हेर पुढे अचूक चालले होते. शिवाय प्रत्येकाला डोंगराची शिर न् शिर माहीत होती. चमकन् वीज चमके. सर्वांच्याच काळजात धस्स होई, आपण जर शत्रूच्या नजरेस ह्या विजेमुळे पडलो, तर—? बाजीचा जीव खालीवर होत होता. महाराज मुखी पुटपुटत होते " जगदंब ! जगदंब ! "

सबंध डोंगर पावसाने ओलाचिंब झाला होता. पाण्याचे मोठमोठे धवधबे धो धो धो, असा गंभीर आवाज करीत, खोल दऱ्यात कोसळत होते. रातकिड्यांनी कर्कश्श सूर धरला होता. काजव्यांची चम्‌चम् चौफेर चालली होती. गार वारा सू सू करीत फोफावत होता. सारे वातावरण भयानक होते. कड्या-कपाऱ्यांतून पाझरणाऱ्या पाण्याचे तुषार सर्वांच्या अंगावर उडत होते. अंग शहारून जात होते. पावसाळ्यात बहरून गेलेली कळंब, कुंद कुड्याची जाळी अंधारात दिसत नव्हती, पण त्यांच्या फुलांचा धुंद घमघमाट सुटला होता. केवड्याच्या वासाने तर रान दरवळले होते.

गडाचा निम्मा डोंगर संपला. बाजीची छाती जास्तच धडधडू लागली. वेढा जवळ जवळ येत चालला. महाराज नजर ताणताणून सगळीकडे सारखे सारखे पाहात होते. शत्रूच्या वेढ्यात मधून मधून मशालीचे पुसट उजेड दिसत होते. बाकी सारे चिडी चिप्प.

हेर अगदी अचूक चालले होते. आला ! वेढा नजीक आला ! आता अगदी जिवाचा करार ! प्रत्येकाचे अंग त्या थंडाव्यातही घामेजले होते. प्रत्येकजण अत्यंत अत्यंत सावधपणे पावले टाकीत होता. काळजी ! काळजी ! काळजी ! ती सारी निधडी छाताडेही धडधडत होती. भीतीच्या मुसळांनी त्यांच्या हृदयाच्या उखळीत कांडण चालविले होते. दणादण मुसळाचे घाव पडत होते. जरा कुठे खुट्ट झाले की, प्रत्येकाच्या काळजात धस्स होत होते. जणू मुसळाचा घाव उखळीच्या काठावरच आदळत होता.

वेढ्यांतल्या चौकी-पहाऱ्यांचे तंबू अन् राहुट्या अस्पष्ट दिसू लागल्या. गवताची झापी दिसू लागली. हेर पुढे नेमके चाललेच होते. आता चौक्यांचे तंबू पन्नास पावले राहिले. प्रत्येकाचा जीव मुठीत आला होता. शत्रूच्या ऐन उंबरठ्यावर होते ते. शत्रूची कुठे गजबज मात्र ऐकू येत नव्हती.

—चाळीस पावले राहिली !—वीस पावले उरली ! अजूनही कुठे गडबड दिसत नव्हती. जिकडेतिकडे सामसूम ! दहा पावले—पाच ! ऐन वेढा ! वेढ्यात पालखी शिरली. सगळीकडे शांतता होती. मावळ्यांची पावले पुढे पडत होती. चोरून चोरून. देवाचे नाव घेत. झप् झप् झप् झप्. शू ऽ ऽ ! काही लोक जागे होते ! आपसात बोलत होते ! पण तंबूच्या आत ! गस्तवाल्यांच्या आरोळ्या ऐकू येत होत्या—पण दूर दूर दूर दूर !

" हुश्शाऽऽर ! " नजीकच आरोळी उठली !! महाराज दचकले. सर्वांनाच दरदरून घाम सुटला ! पण सुदैव ! तंबूच्या पलीकडे ! संपत आली होती वेढ्याची हद्द ! थोडी राहिली. बाजी घामाने थबथबला होता. महाराजांची मान चारी दिशांना सारखी फिरत होती. त्यांच्या कपाळावर घामाचा थर चढला होता. मावळे चाहूल उमटू न देता चपळाईने चालले होते.

संपली ! वेढ्याची हद्द संपली ! शेवटचा तंबू ओलांडला. बाजीच्या हृदयातून आनंदाची झुळूक आरपार गेली, पण भय संपले नव्हते. वेढा मागे पडत चालला. पालखी पळत होती. शत्रू मागे राहिला. चुटकीच्या अंतरावर. आपण सुटलो या आनंदात बाजी होता. मावळ्यांची मने

फुलली होती. आता विशाळगडाच्या रोखाने पावले धावत होती. पालखी घेतलेल्या मावळयांना दम लागला, तरीही ते श्वासांची फुसफुस उमटू देत नव्हते. पालखी पळवीत असता असताच चटकन् ते दुसऱ्या नव्या दमाच्या मावळयांच्या खांद्यावर पालखीचा दांडा देत होते. पालखीची कड धरून बाजी पळत होता. महाराजांनी कृतज्ञतेने जगदंबेला हात जोडले होते.

पालखी वेढ्यापासून अर्धा कोस दूर आली. आता डोंगराची मुरमाड जमीन संपून चिखल सुरू झाला. कितीही काळजी घेतली तरी पावले पचक् पचक् वाजू लागली. अंधारात खाली काही दिसत नव्हते. विजा मधून मधून चमकत होत्या.

आता अंतर खूपच तुटले होते. जवळ जवळ दीड कोस अंतर तुटले होते. आता फक्त साडेअठरा कोस अंतर राहिले होते ! एकदा चार कोस अंतर काटले की, मग गनिमाचे भय कायमचे संपणार, मग अगदी संथ चालून विशाळगडला गेले, तरी काही भय नाही, अशी अटकळ बाजीने बांधली होती.

पावणेदोन कोस अंतर तुटले. पालखी एका दरडीला वळसा घालीत होती. एवढ्यात—! खूपच जोरात अस्मान कडाडले अन् लखलकन् वीज लकाकून गेली ! एकच निमिष ते ! महाराजांच्या छातीत भीतीची ऊर्मी शहारून गेली ! विजेच्या उजेडात एक निमिषभर झरकन् सारे काही स्पष्ट दिसले अन् अन् अन् लांबून एक भयंकर आरोळी उठली,—
" ठाय्‌रो ऽऽऽ ठाय्‌रो ऽऽ ! कौन है वहाँ ! "

सगळेच दचकले ! महाराजांच्या हृदयात वीज चमकून गेली ! बाजीच्या काळजाचे पाणीच झाले ! मावळयांच्या जिभा कोरड्या पडल्या ! त्या आरोळीचा केवढा मोठा प्रतिध्वनी उमटला ! घात झाला ! जौहरच्या फौजेतील दूरवर गस्त घालणाऱ्या छबिन्याच्या हशमांची चार-दोन जणांची टोळी त्या बाजूवर गस्त घालीत असता तिने पाहिले !

" चला पळा पळा ! लौकर लौकर ! " बाजी घाबऱ्या घाबऱ्या मावळयांना घाई करू लागला.

पुन्हा मोठमोठ्याने आरोळ्या उठू लागल्या. आरोळ्यावाले किती आहेत, कुठे आहेत, पायी आहेत की घोड्यावर आहेत हे काही दिसत नव्हते. फक्त मोठमोठ्याने ओरडत होते.

" दुष्मन भाग गयाऽ! दौडोऽ! दौडोऽ! "

मावळ्यांच्या जिवाची धडपड सुरू झाली. पालखीचा वेग वाढला. पालखी हेन्काळत होती. गोंडे हिंदोळत होते. विजा चमकत होत्या. गस्तवाल्यांच्या आरोळ्या उठत होत्या. ते छावणी-वेढ्यातल्या लोकांकरिता ओरडत होते. प्रतिध्वनी उठत होते. काय भयंकर प्रसंग हा! अजून अठरा कोस जायचे होते! अठरा कोस! अठरा कोस!

" बाजीऽ! "

" महाराज! तुम्ही चिंता करू नका!—पळा पळा, चला उचला पाय बाबांनो! " बाजीच्या काळजात चिंता पेटली होती.

गस्तवाले थोडे होते, त्यामुळे पुढे येऊन आडवायची त्यांना छाती होत नव्हती. शिळा उठू लागल्या! धावपळ चालल्याचा आवाज येऊ लागला. गस्तवाले वेडेवाकडे ओरडत ओरडत धावत सुटले. आता वेढ्यातली कुमक येणार! पाठलाग होणार!

मावळ्यांनी पराकाष्टा चालविली.

" बाजी! मी उतरतो! " महाराज म्हणाले.

" नाही नाही, महाराज! ही वाट तुमच्या ओळखीची नाही! आम्हाला सारे ठाऊक आहे. आपल्या लोकांच्या पायाखालची आहे. तुम्ही अगदी हलायचे–पळा पळा माझ्या गड्यांनो! "

आणि खरोखर मावळ्यांनी काही काही उसने ठेवले नव्हते. लोहाराच्या भात्यासारखी त्यांची छाताडे धुसफुसत होती. खाली दोन दोन वीत चिखलाची रबडी भरली होती. पायात काटा मोडतोय् का घोट्यात मुरगळतोय् याचा विचारही ते करीत नव्हते. महाराजांना आपल्या माणसाचे ते कष्ट पाहावत नव्हते, पण ते त्यांच्या निष्ठेचे अन् प्रेमाचे सख्त कैदी होते. आता पाऊसही सुरू झाला.

गस्तवाले हशम ओरडतआरडत छावणीकडे धावत होते. " दौडो दौडोऽऽ! जल्दी करोऽ! दुष्मन भाग गयाऽ! दुष्मन भाग गयाऽ! " घसा फोडून ते ओरडत होते, पळत होते, पडत होते, उठत होते, पळत होते, ओरडत होते, पडत होते!

इकडे मावळे पालखी पळवीतच होते. खूप झपाट्याने अंतर तुटत होते. अडीच कोस, तीन कोस, साडेतीन कोस.

गस्तवाल्यांच्या आरोळ्या जौहरच्या छावणीत अजून पोहोचतही नव्हत्या. ते पळत, ओरडत होते.

पालखी चार कोस गेली. साडेचार कोस गेली !

गस्तवाले वेढ्यानजीक पोहोचले. त्यांच्या आरोळ्या वेढ्यात गस्त घालीत हिंडणाऱ्या पहारेकऱ्यांच्या कानी अस्पष्ट येऊ लागल्या. त्यांनी कान टवकारले. ओरडा स्पष्ट येऊ लागला. त्यांना वाटले बाहेरूनच वेढ्यावर हल्ला येत आहे. त्यांनी लोकांना ओरडून भराभर उठविण्यास सुरुवात केली. लोक घाबरून-धडबडून जागे होऊ लागले. त्यांना समजेचना काय प्रकार आहे तो. मशाली पेटू लागल्या. गडबड उडाली. सिद्दी जौहर, फाजलखान, सिद्दी मसूद, रुस्तुमेजमान वगैरे खाशी मंडळी घाबरून धावत बाहेर आली.

एवढ्यात ' दुष्मन दुष्मन ! ' करीत धापा टाकीत गस्तवाले जौहरच्या शामियान्याकडे धावत आले.

" क्या हुवा ? "

" दुष्मन हुजू ऽ र " धाप लागलेले ते हशम नुसतेच हातवारे करून खुणवीत होते.

" अरे क्या दुष्मन ? कहाँ है ? "

" भाग गया ऽ ऽ भाग गया ऽ ऽ ! " पन्हाळ्याकडे आणि नंतर विशाळगडाकडे हात दाखवून ते म्हणाले.

" आँ ? कौन शिवाजी ? " जौहरच्या अन् फाजलच्या छातीत गोळे उभे राहिले. अन् मग गस्तवाल्यांनी सारे सांगितले !

" या अल्ला ! खुदा ऽ " जौहरने थाडकन् कपाळावर मूठ आपटली अन् त्याने आणि फाजलने अत्यंत संतापून मुठी आवळून आपल्याच लोकांना शिव्या देण्यास सुरुवात केली. साऱ्या छावणीत तारांबळ अन् धावपळ उडाली. टोपीवाले इंग्रज खडबडून उठले. शिवाजी वेढ्यातून पसार झाला हे समजताच ते सारे डोकी धरून मटकन् खालीच बसले ! सारे मनोरे धडाधड कोसळले. भोवती वारा तुफान सुटला.

जौहरभोवती शृंगारपूरकर, सूर्यराव दळवी आणि पालीकर जसवंतराव वगैरे सारे सरदार भीत भीत गोळा झाले. तो संतापाने वेडा झाला होता. त्याने लगेच फौजेस तयार होण्याचा हुकूम दिला. आणि

सिद्दी मसूदला मराठ्यांच्या पाठलागावर जाण्याचा हुकूम केला. सिद्दी मसूद म्हणजे जौहरचा खुद्द जावई होता. मुलीचा नवरा. सूर्यराव दळवी व जसवंतराव यास व इतरही अनेकांस त्याने मसूदबरोबर निघण्याचा हुकूम केला. जौहरच्या डोक्यांत घणाचे घाव दणाणत होते.

—महाराज एव्हाना आठ कोस गेले होते.

सिद्दी मसूद अन् दळवी वगैरे सरदार निघाले. हजारो फौज निघाली. आघाडीला घोडदळ दौडत होते. मागोमाग पायदळ. सबंध वाट अत्यंत खराब होती. अंधार अन् चिखल. तरीही पळत होते. केवळ दैना उडाली होती. त्यातच तुफान धो धो पाऊस.

महाराज नऊ कोस गेले होते.

— इकडे जौहर अन् फाजलखान भयंकर दुःखी झाले होते. ऐन लग्नाच्या आदल्या दिवशी मुलीसह वऱ्हाडच पळून गेले ! आता जर हा शिवाजी सापडला नाही, तर बादशहा काय म्हणेल ? तो शाहिस्ताखान काय म्हणेल ? जग काय म्हणेल ? स्वतः ते दोघेही मुद्दाम वेढ्यातच थांबले. कदाचित् खरा शिवाजी गडावरच असेल ! त्यानी सारे मोर्चे जारीने सुरू केले. गडावरूनही दारूगोळ्याचा मारा जबर सुरू झाला.

—महाराज दहा कोस गेले होते. अजून दहा कोस जायचे होते. मावळे पायी पळत होते अन् सिद्दी मसूद घोड्यावरून पाठलाग करीत होता. मावळ्यांची आतडी पिळवटून निघत होती. ते बाजीचे ऐकत होते, पण महाराजांचे ऐकायला मुळीच तयार नव्हते. घामाने अक्षरशः निथळत होते. पालखी पळवून पळवून त्यांची छाताडे फुटायची वेळ आली होती.

—महाराज अकरा कोस आले. पावसाची सर ओसरली.

—बारा कोस आले. अजून आठ कोस !

सिद्दी मसूद दौडत येतच होता.

— तेरा कोस आले. बाजी सारखा मागे वळून पाहात होता. मशालीच्या उजेडाचे दूरवर अंधारात ठिपके ठिपके नाचताना दिसू लागले. बाजीने ते पाहिले ! गनीम आला ! बाजीची घाई सुरू झाली.

" काय झालं बाजी ? " महाराजांनी चिंतेने पुसले.

" काही नाही महाराज ! दिवस उगवायच्या आत आपण गजापुराची खिंड ओलांडायला हवी म्हणून माझी घाई ! तुम्ही नका वळून बघू ! कोणी येत नाही ! चला चला भाऊंनो ! दमला होय रे ? "

"न्हाई न्हाई ! दमतुया कशापायी ?" पण त्या मावळ्यांच्या अंगातून आता घाम थळथळत होता ! पालखीच्या मागेपुढे मावळे दौडत होते. वरचेवर नव्या दमाचे गडी पालखी घेत होते.

मशालीचे ठिपके जवळजवळ येत चालले. चौदा कोस अंतर तुटले. अंधार हळूहळू कमी कमी होत होता. अजून सहा कोस जायचे होते.

उजाडत चालले. गजापूरची खिंड जवळ येत चालली, पण मागच्या मशालीही जवळ येत होत्या. लांबवर आता घोड्यांच्या टापांची थाड्थाड् अस्पष्ट ऐकू येऊ लागली. महाराज बेचैन झाले. बाजी ऐकेना.

सिद्दी मसूदची फौज भरधाव दौडत–गर्जत येत होती. प्रचंड धरणाची भिंत तडकून जणू पाण्याचा तुफानी लोंढा घोंघावत, फोफावत, फेसाळत येत होता. महाप्रलयाची लाट ! मृत्यूचा फासच बळीचा वेध घेत सरसरत सुटला होता.

खिंड आली. दोन उंच डोंगरांच्या बेचक्यातून उंचावरून अरुंद वाट रिघत होती. हीच ती पावनखिंड ! मावळ्यांनी खिंड चढायला सुरुवात केली. महाराजांनी मागे वळून पाहिले. हजारो घोडे दौडत येत होते ! आता कितीही पळाले तरी विशाळगड गाठणे अशक्य होते ! अजून चार कोस जायचे होते. मसूद अवघ्या अर्ध्या कोसावर येऊन ठेपला !

"बाजी ऽ !" महाराज ओरडले. पालखी ऐन खिंडीच्या मध्यावर पोहोचली. तुफान वावटळ सुटली होती. विजांचा राक्षसी कडकडाट चालला होता. जणू विश्वाला सुरुंग लागले होते.

"बाजी ऽ ! आता पुढे जाणं अशक्य आहे ! दुष्मन आला !" आणि महाराजांनी चालत्या पालखीतून उडी टाकली !

"महाराऽज !"

"नाही नाही नाही ! अरे–तो बघ, तो बघ !" –गनिमाचा गलका ऐकू येत होता. आता गड गाठणं अशक्य आहे हे बाजीला स्पष्ट कळून चुकलं. अखेर गनिमाने गाठलेच ! त्याचे मन व्याकुळ झाले.

विजा किंचाळत होत्या. क्षितिजापलीकडून जमीन अन् अस्मानाच्या दोन्ही ओठांतून वायु एवढी जबरदस्त वादळी फुंकर सतत घालीत होता की, जणू पृथ्वीची गती रोधली गेली होती. नव्हे जणू ती उलट्या बाजूनेच फिरू लागली होती. भयंकर वारा ! आकाशात काळ्या ढगांची

अफाट उधळपट्टी चालली होती अन् त्यामुळे चिडलेले ते ढग दात खाऊन ओरडत होते.

महाराजांच्या अंगावरचा शेला अन् अंगरखा वाऱ्याने वाळून सैरा-वैरा उडत होता. मावळ्यांची गडबड चाललीच होती. वाऱ्यामुळे कितीही मोठ्याने ओरडून बोलले, तरी शब्द उडत होते. ऐकू येत नव्हते. डोंगरावरून पडणारे प्रवाह भिरकावले जात होते. महाप्रलयाचा काळ आला.

" बाजी ! थांबा सारे इथेच ! ही खिंड आपण रोखून धरू ! झुंजू ! बोला. हर हर हर—! " महाराज समशेर उपसून ओरडले.

मावळ्यांनीही समशेरी उपसून आरोळी दिली, पण बाजीने कळवळून एकदम महाराजांचे पाय धरले, " महाराज ! असं नका करूं ! गनीम अफाट आहे ! आपण मूठभर ! गमीन दावा साधील ! तुम्ही गडाकडे जा. मी–मी रोखून धरतो खिंड ! महाराज, एकालाही खिंड चढू देत नाही ! मी अन् अन् माझे हे भाऊ, कारे पोरांनो ? "

मावळ्यांनीही एकदम बाजीस प्रचंड साथ दिली !

" बाजी ऽ ! "

" महाराज ! मला–आता माझे कान बहिरे झाले ! तुमचं काहीही ऐकायला तयार नाही ! गनीम हजारांनी येतोय् ! कापून संपायचा नाही ! महाराज ! मी जिवंत आहे तोवर–नव्हे नव्हे महाराज तुम्ही गडावर पोहोचेपर्यंत मी इथं जिवंत आहे ! नाहीच मरणार ! जा–जा–जा, पाया पडतो ! " बाजी कळवळून बोलत होता. अस्मान अक्राळविक्राळ हसत होते.

महाराजांचे काळीज तिळ तिळ तुटत होते. विजेचे आसूड कडाडत होते.

" बाजी तू—? "

" ती पालखी आणा रे इकडं ! " बाजी रागाने ओरडला.

" मी मोठा का स्वराज्याच्या दौलतीचा धनी मोठा ? आता मुकाट्यानं पालखीत बसा, नाहीतर—! "

" बाजी ! " महाराजांनी बाजीला मिठी मारली.

" राजा ! आम्ही तुझ्याकरिता आमचे जीव झुगारून द्यायचे नाहीत, तर मग—! गनीम आला पायथ्याशी ! " बाजी ओरडला.

जवळजवळ जबरदस्तीने बाजीने महाराजांस पालखीत बसविले.

" उचला ! पळा पळा ! महाराज राग नका धरू ! "

पालखी मावळ्यांनी उचलली. निघाले. शेदीडशे मावळ्यांना पालखीबरोबर जाण्याचा बाजीने हुकूम दिला.

" बाजी ऽ ! पोहोचल्याचे पाच आवाज करीन ! " पळत्या पालखीतून वळून महाराज ओरडून म्हणाले. वाऱ्याने थैमान मांडले होते.

" आणि तोंवर मी इथं उभा आहे ऽ ऽ ! " बाजीने महाराजांस अखरचा मुजरा केला !

" जय भवानी ! "

खिंडीच्या पायथ्याशी मसूदची फौज घोड्यावरून उड्या टाकून उतरली. ती गर्जत होती. समशेरी उपसून ती खिंडीकडे धावत सुटली.

बाजीनेही आपल्या मावळ्यांसह गगनाला भिडणारा जयघोष केला.

" या या ! लेकांनो ! आमचा राजा हवाय नाही का तुम्हाला ? चलारे मर्दांनो ! धोंड्यांनी फोडा डोसकी एकेकाची ! " बाजी गरजला अन् मग काय ! सारी वानरसेना खवळली. खिंडीत होते नव्हते तेवढे धोंडे खाली गनिमावर फेकायला सुरुवात झाली ! मसूदची फौज निम्मी खिंड चढून गेली होती. धडाधड मोठमोठे धोंडे कोसळू लागले. नारळासारखी डोसकी फुटू लागली ! उसाच्या कांड्यासारखी पायाची हाडे मोडू लागली ! प्रचंड फाल्गुनमास सुरू झाला ! धोंड्याखाली चेंदामेंदा झाला साऱ्यांचा ! गड गड गड गड कोलमडत एकेक पायाळ वीर पायथ्याकडे निघाला. उरलेसुरले मागे हाटले ! बाजीला चौपट जोर चढला.

तो मोठ्याने हसत होता, मावळे चेवले होते. गनीम ओरडत होते.

सिद्दी मसूदने चिडून दुसरी तुकडी खिंडीवर सोडली. पुन्हा धडाका सुरू झाला.

—महाराज विशाळगडाकडे झपाट्याने चालले होते.

जौहरची पायदळी फौज सिद्दी मसूदच्या कुमकेत धावत येत होती. दिवस चांगला टळटळीत वर आला होता.

बाजीने सिद्दीचा दुसरा अन् तिसरा हल्लाही लढून परतविला. हातात समशेर घेऊन तो रिंगिणीसारखा शत्रूत घुसत होता. मावळेही कमाल करीत होते. सिद्दीने प्रचंड ओघ खिडीवर चालू ठेवला होता. बाजीच्या अंगावर जखमा जमत होत्या. त्याने हा चौथा जबर जोराचा हल्लाही लढून परतविला. त्याच्या अन् त्याच्या मावळ्यांच्या अंगातून रक्त वाहत होते. अनेक मावळे ठारही झाले होते.

पन्हाळ्यावरून त्र्यंबकपंत जौहरवर दारूगोळ्याची आग पाखडीत होते.

महाराज गडापासून अडीच कोस दूर होते.

सिद्दीने हल्ल्यावर हल्ले खिडीवर चढविण्याचा सपाटा लावला होता. खिडीतला बाजीचा अडसर फोडून पार जाण्याची त्याची शिकस्त चालली होती. खिडीच्या तोंडावर भयंकर रणकंदन सुरू झाले होते. मावळे अन् बाजी गनिमांची मुंडकी सपासप उडवीत होते. प्रेते धडाधड कोसळत होती. नवी कुमक रीघ लावून वर चढत होती. बाजी अन् सारेच मावळे लालीलाल झाले होते. वास्तविक साऱ्या रात्रभर पळून ते कमालीचे दमले होते. तरीही झुंज चालविलीच होती. वाढत्या जोमाने. बाजीने शौर्याची कमाल चालविली होती. एवढा जखमांनी रक्ताळला होता की, तो समशेर फिरविताना वाटत होते की, हा एक तांबडा लाल आगीचा उभा लोळच ठिणग्या उधळीत नाचतोय्. एवढी ताकद कोठून आली ? एकदम तो मुसंडी मारून गनिमाच्या गर्दीत घुसे अन् खडाखड पाच-सात मुंडकी उडवी. डोंगराच्या उतरणीवरून गडगडत सिद्दीचे कित्येक वजनदार हशम मागे मागे सरकत अन मग अचानक कोलमडून, कोलांट्या उड्या मारीत, खिडीच्या पायथ्याशी दाखल होत !

बाजीने हाही हल्ला मारून काढला. आता तो खरोखर इतका कमालीचा शिणला होता की, जिवाच्या करारावर तो उभा होता. तांब्या-तांब्या रक्त त्याच्या अंगातून गळाले होते. कपडे चिंब झाले होते. त्याची मावळी मंडळीही खूप जखमी झाली होती. असंख्य लोक ठार झाले होते. खिडीतून रक्ताचे ओघळ ओघळत होते. हा हल्ला परतविताच त्या निस्त्राण स्थितीतही तलवार उंच करून हसून बाजी ओरडला, " हर हर हर—! " मावळेही ओरडले, " महाऽऽदेव ! "

सिद्दी चडफडत होता. बाजीकडे पाहात तो दात-ओठ खात होता. मुठी आवळीत होता. हा आदमी नाही, सैतान आहे, अशी त्याची खात्री झाली.

मागोमाग येणारे पायदळ मसूदपाशी येऊन दाखल झाले.

महाराज विशाळगडाच्या पायथ्याशी पोहोचले. त्यांच्याही जिवाची उलघाल होत होती. माझा बाजी ! माझा बाजी ! महाराजांनी झपाटयाने गड चढायला सुरुवात केली.

सिद्दी मसूदने आता अगदी निकराचा दात-ओठ खाऊन खिंडीवर हल्ला चढविला.

" या या लेकांनो तुमचे बाप होऊन राहिलो आम्ही ! " बाजीने भवानीचा जयजयकार केला.

गनीम खिंडीवर झुंडीने चालून आला. बाजीचा विळा कोयता सुरू झाला. त्यालाही निसटते फटकारे बसत होते. आता बाजीची शक्ती अखेरचे घाव घालीत अन् झेलीत होती. सीमा झाली ! बाजीचे कान केवळ तोफेच्या आवाजाकडे खिळले होते. त्याची तलवार फिरत होती अन् ओठात शब्द घोटाळत होते, 'म–हा–रा–ज !' त्याच्या डोळ्यात आता कारुण्य उरले होते. त्याच्या निथळत्या रक्ताने खिंड शिंपून निघाली होती.

—महाराज विशाळगडाच्या दरवाजात पोहोचले. ते लहान मुलासारखे धावत होते. तोफखान्याकडे ते धावत होते. मावळेही धावत होते. तोफा उडविण्याकरिता ही घाई !

" आधी आधी तोफांना बत्ती द्या ! लौकर ! आत्तांच्या आत्ता ! " महाराजांनी ओरडून फर्मावले.

—खिंडीवर झोंब उडाली ! बाजीची मुद्रा केविलवाणी झाली, " महाऽराज ! "

—पण लगेच त्याने अवसानाने मावळ्यांना चेतविले, " पाहतां काय, हाणा ! "

मावळ्यांचे हात तरी कुठे थांबले होते ? अजूनही महाराज पोहोचले नाहीत काय ? जगदंबे ! आता किती अंत पाहातेस ?—पण बाजी लढत होता. मावळे लढत होते. एवढ्यात खाडकन् घाव पडला ! आणि–!

" ऑऽऽऽ! म–हा–रा–ज ! " बाजीने आर्त आरोळी फोडली ! बाजीने छातीवर हात ठेवून छाती दाबून धरली ! रक्ताची गंगा त्याच्या हाताखालून वाहत होती. बाजीला शत्रूचा घाव लागला ! बाजीची तलवार ढिली पडली ! बाजीने डोळे विस्फारून पाहिले ! त्याचा तोल सुटला !

" म–हा–रा–ज ! " बाजीची मूर्ती आता भुईवर कोसळणार—!

" धनी ऽऽ! " चार–दोन मावळे थांबले. त्यांनी त्याला सावरले. पण बाजी त्यांना त्वेषाने तुटक्या शब्दांत म्हणाला, " जा–जा ! ल–ढा ! आपला रा–जाऽऑऽऽ! "—आता सारे संपत आले !

अजूनही बाजीची रिकाम्या निस्त्राण हाताची धडपड चालली होती बाकीचे मावळे झुंजत होते. बाजीची प्राणज्योत अखेरची फड्फड् करीत होती. एवढयात—धडाड धड्ड्ड्ड्! —तोफेचा आवाज बाजीच्या कानांवर आला ! बाजी विलक्षण आनंदाने हसला—हसतासुद्धा येत नव्हते धड आता ! दुसरा आवाज झाला ! तिसरा ! चौथा ! मावळे आनंदाने उंच उडया मारीत शत्रूवर अखेरचा हल्ला चढविण्यासाठी तुटून पडले !

पाचवी तोफ उडाली ! बाजीला केवढा कमालीचा आनंद झाला ! त्याचा हात छातीवरून निखळला. घळ्ळकन् रक्ताचा लोंढा बाहेर खळाळला ! हे अखेरचे अर्घ्य ! स्वातंत्र्याच्या सूर्या, प्रसन्न हो ! आता तरी प्रसन्न हो !"

" माझी–कामगिरी–मी बजावली ! महाऽराऽज ! मघा बोललो ! रागावू न–का ! येतोंऽयेतोंऽआता ! मर्दांनो–माझ्या राजाला मा–झा मु–ज–रा सांगा ! महाऽरा–ज ! "

बाजीने मान टाकली ! बाजी गेला, गेला ! मावळ्यांनी तो हल्ला परतविला अन् बाजीचा देह उचलून अन् जखमी मावळ्यांना उचलून खिंडीपलीकडच्या रानात उतरून धूम ठोकली. पावनखिंड पावन झाली !

—विशाळगडावर महाराजांनी पाचवी तोफेला बत्ती दिली अन् त्यांच्या डोळ्यात विलक्षण आर्तता दिसू लागली. जणू ते म्हणत होते, बाजी ! बाजी लौकर ये !

—सिद्दी मसूदची फौज अखेर हताश होऊन पन्हाळगडाकडे हात हालवीत परत गेली !

महाराज अत्यंत आतुरतेनें बाजीची गडावर वाट पाहात होते. त्यांना काही सुचत नव्हते.

—मावळ्यांनी बाजीचे प्रेत डोलीत घालून विशाळगडावर नेले. मावळ्यांच्या माना खाली लवल्या होत्या. आता कोणत्या तोंडानें सांगणार महाराजांना ते !

महाराजांची नजर भिरभिरत होती. बाजी कुठंय् ? बाजी कुठंय् ? मावळ्यांच्या माना खाली पाहिल्या अन् त्यांच्या काळजात चर्रर्र झाले !

" बाजी ऽ ! बाजी कुठंय् ? " महाराज कळवळून ओरडले.

मावळ्यांनी तोंडे हातात झाकली ! एकानें डोलीवरची घोंगडी दूर केली !

" बाऽजीऽऽऽ! " महाराजांनी हंबरडा फोडला.

**ले ख न सी मा.**

म. ग्रं. सं. ठाणे, [illegible]
बाल वाङ्मय [illegible]
दा. क्र. 20.(५ दिनांक ७/४/८२
विषय बा.ली. क्र. ........

BVBK-0402085

scan 9/5/18